म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
सं. क्र. १३७३
१९६५.

REFBK-0014479

# स्वामी विद्यारण्य

## चरित्र आणि कार्य

ग. म. वैद्य

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........



REFBK-0014479

# स्वामी विद्यारण्य

## चरित्र आणि कार्य

ग. म. वैद्य

प्रकाशक :
म. य. जोशी
प्रसाद प्रकाशन
६८९/२४ सदाशिव पेठ, पुणे २

पहिली आवृत्ति
१९६५

मूल्य तीन रुपये

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव पेठ, पुणे ९

# ओळख

इ. स. १९४७ सालापर्यंत सुमारें शेंदीडशें वर्षें भारत आणि भारतीय इंग्रजांचे अमलाखालीं होते. त्या काळीं शाळांत इतिहास शिक्षणाची सोय झाली. शाळांतून आपल्या देशाचाच नव्हे तर इंग्लंडचा इतिहासही शिकविण्यांत येऊं लागला. पण तो सारा एक विशिष्ट हेतु डोळ्यांपुढें ठेवूनच. आपल्यांतील दोष मोठे करावयाचे, गुण फार सूक्ष्म वर्णावयाचे आणि एकंदरीनें आपण भारतीय, त्यांचा धर्म, विद्या, कला हीं सारीं सारीं पाश्चात्यांपेक्षां फार फार कमी दर्जाचीं आहेत हें आपल्या मनावर ठसवून आपला पाणउतारा करावयाचा आणि आपला कमीपणा जगापुढें मांडून इंग्रजाचें राज्य हें भारताला मोठ्या भाग्यानेच लाभलें आहे असें जगाला सांगावयाचें. पण आपल्या देशाचा आणि जनतेचा उज्ज्वल इतिहास कितीही प्रयत्न केले तरी कायमचा कसा बरें दडपून टाकतां येईल ?

आपल्या महाराष्ट्राशेजारीच एक मोठें साम्राज्य स्थापन झालें होतें. त्याची कीर्ति भारतांतच नव्हे तर भारताबाहेर अनेक देशांत पसरली होती. त्या देशांतले प्रवासी किंवा राजप्रतिनिधि या साम्राज्यांत येऊन त्यांनीं राजांचा पाहुणचारही घेतला होता. त्यांनीं प्रत्यक्ष पाहून विजयनगर शहराची, तेथील राजांचीं कीं जनतेचीं जीं वर्णनें लिहून ठेविलीं आहेत तीं आजही उपलब्ध आहेत.

या शिवाय शिलालेख, दानपत्रें, ताम्रपट, वगैरे अनेक साधनें या साम्राज्याचा स्फूर्तिदायक इतिहास सांगण्याला सिद्ध आहेत.

आतां आपला भारत स्वतंत्र असून मोठ्या प्रतिष्ठेनें प्रगतिमान राष्ट्र म्हणून तो जगांत मिरवत आहे. आपल्या देशाचा खराखुरा इतिहास लिहिणें आतां शक्य झालें आहे. तशा तऱ्हेचे अनेक प्रयत्न होतही आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.

विजयनगर शहर हें एका तपस्वी ब्राह्मणाच्या मदतीनें हरीहरराय यानें स्थापन केलें. त्या तपस्वी ब्राह्मणाचें नांव माधव अथवा माधवाचार्य असें

असून तो आमरण ब्रह्मचारी होता. त्यानें केवळ नगर स्थापनेंतच साहाय्य केलें असें नव्हे तर त्या नगरींत हिंदूराज्य स्थापन करविलें आणि त्या राज्याचा मुख्य मंत्री म्हणून सुमारें चाळीस वर्षें म्हणजे स्वतांच्या वयाच्या ऐंशीं ब्यायशींच्या वर्षांपर्यंत काम करून त्या राज्याचें साम्राज्य बनविलें. तें साम्राज्य बलवान केलें आणि मुसलमानांच्या क्रूर अन्याय्य आक्रमणांना तोंड देण्याइतकें समर्थ बनविलें. हिंदूंना आणि हिंदुधर्माला संरक्षण दिलें. यवनांचा पराभव करून त्यांना हिंदूंच्या तलवारीचें पाणी दाखविलें. माधवाचार्य स्वतां रणांगणावर गेले नाहींत हें खरें तरीही या वर घडलेल्या सर्व घटनांचा मुख्यमंत्री माधवाचार्यच सूत्रधार होता यांत बिलकुल शंकाच नाहीं.

माधवाचार्य हे स्वतः वेदवेदान्त पारंगत होते. वेदान्तावरच नव्हे तर राजा आणि प्रजेला उपयुक्त अशा धर्मशास्त्रावर लोकमान्य अशी प्रचंड ग्रंथ रचना त्यांनीं केली. आणि शेवटीं संन्यास घेऊन शृंगेरी येथील मठांतील पीठांवर अधिष्ठित होऊन शंकराचार्य हे पद त्यांनीं भूषविलें. या संन्यासाश्रमांतलें त्यांचें नांव विद्यारण्य हें होतें.

अशा या थोर वंदनीय महात्म्याची माहिती आपणांस असणें अत्यंत अगत्याचें आहे. ती माहिती या छोट्या पुस्तकांत वाचकांपुढें ठेविली आहे.

ही माहिती गोळा करण्यास आणि लिहिण्यास पुरेसा अवधि मिळाला नाहीं. त्यामुळें मनाला एक प्रकारचें असमाधान वाटतें. पण आज नाहीं उद्यां, निदान दुसऱ्या आवृत्तींत याहून खूप माहिती देतां येईल अशी तयारी करावयाची असें मनानें ठरविलें आहे.

प्रसादचे संपादक श्री. मनोहरपंत जोशी यांच्या प्रेरणेनें हें पुस्तक लिहिण्याची इच्छा झाली. तेव्हा हें पुस्तक लिहिलें गेलें याचें सारें श्रेय त्यानांच आहे.

ज्या थोर पुरुषानें आपलें सारें आयुष्य, सामर्थ्य आणि तप हिंदुसाम्राज्य स्थापण्यांत खर्च केलें आणि बुद्धिमत्तेनें अफाट मौलिक ग्रंथरचना करून हिंदु जनतेला कायमचें ऋणी केलें त्या कर्नाटक सिंहासनस्थापनाचार्य विद्यारण्यांना नम्रपणें वंदन करून ही प्रस्तावनारूपी ओळख पुरी करितों.

पुणें
मकरसंक्रांत
शके १८८६

ग. म. वैद्य

# १ प्रस्ताव

श्रीमद्भगवद्गीतेंत भगवंतांनीं म्हटलें आहे नव्हें साऱ्या जगाला आश्वासनच दिलें आहे कीं,

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥**

ज्या ज्या वेळीं खऱ्या धर्माला ग्लानि येते आणि अधर्म प्रवृत्ति वाढत जातात त्या त्या वेळीं त्या प्रवृत्तींचा नाश करण्याकरितां आणि खऱ्या धर्माचा प्रसार करण्याकरितां मी या ना त्या रूपानें अवतार घेतों.

हें भगवंतांचें आश्वासन केवळ भारतापुरतेंच आहे असें नाहीं. सारें जग त्यानेंच निर्मिलें, त्याची काळजी घेणें त्याच्याच हातीं आहे; अर्थात हें आश्वासन भगवंतांनीं साऱ्या जगालाच दिलें आहे. आपण जगांतल्या कोणत्याही देशाचे इतिहासाचें अवलोकन केलें, तरी ही गोष्ट आपणांस स्पष्टपणें दिसून येते. इतिहास मग तो धार्मिक असो, राजकीय असो वा सामाजिक असो.

यहुदी लोकांनीं धार्मिक अनाचार सुरू करितांच येशू ख्रिस्ताचा अवतार झाला. इराणांतील जनतेंत अधर्म प्रवृत्तींना जोर चढतांच झोरोस्तरचा वा झरतुष्ट्राचा जन्म झाला. या गोष्टी कदाचित आपणा सर्वांना माहीत नसतील पण आपल्या देशाचा इतिहास तर आपल्या पूर्ण परिचयाचा आहे. त्यांतील उदाहरणांवरून भगवंतांनीं दिलेलें आश्वासन कसकसें प्रत्यक्षांत आलें तें पाहूं.

आपल्या या भारताची सुवर्णभूमि म्हणून सर्व जगांतील लोकांना माहिती होतीअर्थात येथील सुवर्णाच्या लोभानें या देशावर छापा घालून लुटालूट करावी ही कल्पना लोभी परदेशी-यांच्या मनांत फार जुन्या काळापासूनच बसत असली पाहिजे. ती कल्पना प्रत्यक्षांत आणणारा पहिला पराक्रमी शत्रु मॅसिडोनिचाआचा राजा शिकंदर हा होय. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीच त्यानें या भारतावर स्वारी करून आपल्या लोभी दृष्टीची आणि सामर्थ्याची थोडी चुणूक भारतीयांना दाखविली.

या वेळीं भगवान, आर्य चाणक्यांच्या रूपानें पुढें झाले. त्यांनीं या सुवर्ण भूमीवर येणारें भयंकर संकट ताडलें आणि तें कसें टाळावें याचा विचार करून आपल्या प्रयत्नाला यशाही मिळवून घेतलें. त्या वेळीं मगधावर नंदवंशाचे राजे राज्य करीत होते पण ते अत्यंत दुष्ट स्वभावाचे आणि विलासांत रंगलेले दिसले. त्यांच्या हातून मॅसिडोनिआच्या पराक्रमी शिकंदराला तोंड द्यावयाचें महान कार्य होणार नाहीं हें जाणून त्यांनीं आपल्या हाताखालीं चंद्रगुप्त मौर्य याला तयार केलें आणि त्याच्या हातून दुष्ट राजसत्तेचा निःपात–करविला आपलें सामर्थ्य चंद्रगुप्तानें अशा रीतीनें पणास लावून आत्मविश्वास वाढविला आणि त्याच शौर्यानें आणि शक्तीनें त्यानें शिकंदराला तोंड दिलें इतकेंच नाहीं तर त्यानें त्या परस्थ शत्रूला भारतांतून घालवून दिलें. अशा रीतीनें भगवंतांनीं दिलेलें आश्वासन त्या वेळीं तरी फलद्रूप झालें.

सनातन अथवा वैदिक धर्माची पिछेहाट होत आहे हें पहातांच भगवान आद्य श्री शंकराचार्यांचें रूपानें दक्षिणेंत अवतरले आणि केवळ बत्तीस वर्षांच्या आयुष्यांत केवढी कामगिरी करून गेले! सनातन धर्मावर हल्ला चढविणाऱ्या बुद्ध, जैन वगैरे धर्माच्या पंडितांशीं

त्यांनीं वादविवाद करून त्यांना पराजित केलें आणि सनातन धर्माचा प्रसार करून त्याचें आसन अखंड भारतभर बळकट केलें. यासाठीं त्यांनीं कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत अनेक वार प्रवास केला. मठस्थापना केली, मठ योग्य रीतीनें चालवितील असे शिष्य शिकवून तयार केले, विद्वत्ताप्रचुर ग्रंथ लिहून वैदिक धर्माला उज्ज्वल स्थान मिळवून दिलें. त्यांनीं लिहिलेले ग्रंथ आजतागायत आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत. आणि पुढेंही ते अनंत कालपर्यंत असेंच मार्गदर्शन करीत राहणार आहेत.

इ. स. १००० पर्यंत भारताला परशत्रूपासून त्रास झाला नाहीं. पण त्यानंतर सुमारें तीनशें वर्षें उत्तर भारतांत भयंकर धांदल माजविली, लढाया केल्या, कत्तली करवून लुटालुटींनीं संपत्ती गोळा केली, स्त्रियांची विटंबना आणि बळजबरीनें मुसलमानीकरण या गोष्टींनीं मुसलमानांनीं धिंगाणाच घातला. हिंदूंचीं छोटीं मोठीं राज्यें रसातळास गेलीं. हिंदूंचीं देवालयें नष्ट करून तेथें मशिदी उभारल्या ! देवमूर्ति फोडून टाकल्या !

या काळांत दक्षिणेंत यादव राजे देवगिरी येथें राज्य करून प्रजारक्षण करीत होते. प्रजा सुखांत होती तरीपण त्याही काळीं जनतेंत धार्मिक असमाधान असावें असें दिसतें त्यामुळेंच महानुभावादि नवीन नवीन पंथ निघूं लागले होते. त्यांचा परामर्श घेऊन जनतेंत सद्धर्माचा प्रसार व्हावा म्हणून भगवान श्री ज्ञानेश्वर रूपानें अवतरले.

धर्मासंबंधीं सारे ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिलेले होते. ते संस्कृत पंडितच वाचूं शकत अगर त्या विषयावर विवरण वा चर्चा करूं शकत. सामान्य जनतेला संस्कृत भाषेचें ज्ञान नसल्यामुळें त्यांना धर्मग्रंथ वाचतां येत नसत; यामुळें जनता अज्ञानानें धर्मविमुख

झाल्यास नवल तें कोणतें ? या संकटाला तोंड देऊन सामान्य जनतेची श्रद्धा खऱ्या धर्मावर दृढ करण्यासाठींच भगवंतांचा अवतार होता. त्यांच्या जन्मानेंच रूढिचुस्त लोकांच्या मनावर जबरदस्त हादरा बसला. पण रूढि म्हणजे धर्म नव्हे हेंच त्यामुळें सिद्ध झालें.

त्यांचा स्पर्शही विटाळाचा मानणारेच त्यांच्या पवित्र आचरणानें, दिव्य ज्ञानानें, बुद्धिमत्तेनें आणि अमानुषी सामर्थ्यानें चकित होऊन शेवटीं त्यांचे शिष्य वा अनुयायी झाले ! ज्ञानेश्वरीसारखा प्रचंड ग्रंथ मराठी भाषेंत म्हणजेच लोकभाषेंत लिहून त्यांनीं सामान्य जनतेला वेड लाविलें, भक्तिमार्गाचा प्रसार केला आणि हें सारें केवळ वयाच्या एकवीस वर्षांचे अवधींत. त्यानंतर त्यांनीं या पृथ्वीवर जगण्याची इच्छाही धरली नाहीं. आपलें कार्य झालें असें म्हणून भावांचा निरोप घेतला. आणि जिवंत समाधि घेतली ! हें सारें चरित्र ज्ञानदेव अमानुषी जीवन जगले असेंच सांगत नाहीं का ?

मुसलमानी राजांनीं उत्तरेंत आपला अम्मल पक्का बसविल्यावर त्यांची दुष्ट दृष्टि दक्षिणेकडे वळली. दिल्लीहून अल्लाउद्दीन खिलजी केवळ आठ हजार सैन्य घेऊन देवगिरीच्या रामदेवरावावर चालून आला. खरें म्हणजे रामराजा हा मोठा पराक्रमी राजा होता असें इतिहासच सांगतो, त्यानें आजूबाजूचीं अनेक छोटीं मोठी. राज्यें जिंकलीं होतीं. फार काय पण त्यानें एकदा वाराणशी मधून मुसलमानांनाही हाकून दिलें व तेथें एक सुवर्णमंदिर बांधलें असें वर्णन इतिहासांत आढळतें. असें असूनही त्या राजाला अल्लाउद्दीनाला तोंड देतां आलें नाहीं. एवढ्या मोठ्या राजाजवळ आठ हजार सैन्याला तोंड देण्याचें सामर्थ्य नसावें हा शुद्ध गाफिलपणाच होय ! याचे परिणाम मात्र फार भयंकर झाले आणि ते साऱ्या हिंदु प्रजेला भोवले !

यादवांचें राज्य गेलें, अफाट संपत्ति दिल्लीला रवाना झाली. कत्तली झाल्या, देवळांच्या मशिदी घडल्या, मूर्तींचा चकनाचूर झाला व त्यांना मशिदीच्या पायऱ्यांत बसावें लागलें, स्त्रियांची विटंबना आणि पळवापळव होऊन जुलमानें मुसलमानीकरणही सुरू झालें. गोवध होऊं लागला! बहामनी नांवाचें मुसलमानी राज्य स्थापन झालें. पुढें तें फुटून त्याचीं पांच राज्यें झालीं. हिंदूंचे अवर्णनीय हाल झाले! या नरकवासांत हिंदूंनीं तीन साडेतीनशें वर्षें काढलीं! त्यानंतर भगवंतांनीं शिवछत्रपतींच्या रूपांत जगावर अवतार घेतला! महाराष्ट्र स्वतंत्र करून हिंदूंना गुलामगिरींतून सोडविलें! त्यांचें मुसलमानीकरण थांबलें, आयाबहिणींवरील संकटें दूर करून हिंदू स्त्रियांची अब्रू राखिली! अशा रीतीनें भगवंतांनीं आपलें वचन राखलें यांत शंकाच नाहीं.

मुसलमानांचे क्रूर अत्याचार महाराष्ट्रावरून पुढल्या प्रदेशांत सरकले. दिल्लींच्या बादशहांनीं दक्षिण भारतांत मोठमोठीं सैन्यें घेऊन स्वाऱ्या करून त्यांची वाट लाविली. कत्तली, लुटालूट, स्त्रियांची पळवापळव सुरू झाली; देवमंदिरें नेस्तनाबूद झालीं आणि यवनांच्या साऱ्या अत्याचारांना दक्षिण भारत बळी पडला. या वेळीं भगवंतानें आपलें आश्वासन कसें आणि कोणत्या रूपानें पाळलें तें पाहूं.

## २ दक्षिण भारतावरील मुसलमानी हल्ले

मुसलमानी हल्ले होण्यापूर्वी भारताचा दक्षिण विभाग तीन प्रमुख राज्यांत विभागला होता. तत्पूर्वी म्हणजे अकरा बाराव्या शतकांत हा भूप्रदेश चालुक्य राजांचे अमला खालीं होता. कालांतरानें त्यांचें साम्राज्य नष्ट होऊन त्यांत तीन नवीं राज्यें अस्तित्वांत आलीं. उत्तरेकडील भाग यादवांचे सत्तेखालीं गेला त्यांची राजधानी देवगिरी येथें होती. विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडे नर्मदेपासून कृष्णानदीपर्यंत यादवांचें साम्राज्य पसरलें होतें. त्या राज्याच्या आग्नेय दिशेला काकतीय वंशाचे राजे करीत होते त्यांची राजधानी वारंगळ ही झाली. तिसरें राज्य होयसळांचें. त्यांची राजधानी द्वारसमुद्र ही होती. त्यांचे ताब्यांत सारा कर्नाटक प्रांत होता.

होयसळांच्या राज्याची उत्तरसीमा कृष्णानदी ही होती. याशिवाय कावेरी नदीच्या खालच्या बाजूला एक छोटेसें राज्य होतें. तेथें पांड्य वंशाचे राजे राज्य करीत होते. मदुरा ही त्यांची राजधानी. त्यांचें राज्य दक्षिणेला कन्या कुमारीपर्यंत पसरलेलें होतें. त्याशिवाय अनेक चिमकुलीं संस्थानवजा राज्यें सत्ता गाजवीत होतींच. अनागोंदी, कदंब, पल्लव, केरळ, चोल हीं त्यांतल्या त्यांत नांव घेण्यासारखीं होतीं.

तिन्ही प्रमुख राज्यांच्या सीमा एकमेकांना भिडल्यामुळें त्यांच्यांत नेहमीं तक्रारी चालत. स्नेह, सलोखा, ऐक्य हीं त्यांना माहीतच

नव्हतीं, कारण अनेक शतकें हिंदु राज्यें सत्ता चालवीत होतीं. परस्थ शत्रूंचा ढंगा त्यांना माहीत नव्हता; त्यामुळें शेजार शेजारच्या राज्यांनीं एकी करावी, मित्रत्वानें नांदावें याची त्यांना आतांपर्यंत कधींच जरुरी भासली नव्हती.

पहिली टोळ धाड देवगिरीवर पडली ती इ. स. १२८४ या सालीं. तेथील राजानें फार मोठी खंडणी देऊन दिल्लीचें मांडलिकत्व पतकरलें. पण दरसाल खंडणी भरणें बंद केल्यामुळें दिल्लीच्या सुलतानानें आपला सरदार मलिककाफूर यास देवगिरीवर पाठविलें. त्यानें राजास पकडून दिल्लीला नेलें. कल्पनातीत संपत्ति खंडणी देण्याचें कबूल करून रामदेवरावानें आपली सुटका करून घेतली.

दक्षिणेंतील राज्यांतील नांदणारी सुस्थिति आणि राजांचे तिजोरींत आणि लोकांच्या घरांत नांदणाऱ्या संपत्तीनें मलिककाफूरच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यानें दरसाल एक एक राज्यावर स्वारी करून लूट मिळविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें इ. स. १३०७ मध्यें देवगिरीचा पाडाव केल्यावर तो वारंगळच्या राजावर चाल करून गेला. तेथील राजा प्रतापरुद्रदेव याचा पराभव करून त्याजपासून त्यानें जबर खंडणी वसूल केली. दिल्लीच्या बादशहाचें मांडलिकत्व पतकरून दरसाल खंडणी देण्याचें मान्य करून त्या राजानें आपली कशी बशी सुटका करून घेतली.

इ. स. १३१० सालीं मलिककाफूरनें होयसळ राजावर स्वारी केली. तेथील राजा वीर बल्लाळ याचा पराभव करून त्यानें त्याची राजधानी द्वारसमुद्र हस्तगत केली. या वेळीं त्या राजानेंही मोठी खंडणी दिली आणि दिल्लीच्या सुलतानाचे राजनिष्ट मांडलिक म्हणून जगण्याचें मान्य केलें. केवढी अफाट संपत्ति गोळा केली होती पहा! दिल्लीला गेल्यावर त्यानें गणती

केली तेव्हां त्याला आढळलें कीं, या एकाच खेपेंत त्याला ३१२ हत्ती, १२००० घोडे, ७६००० मण सोनें, मोत्यांच्या व जड जवाहिरांच्या असंख्य पेट्या! केवढी संपत्ति होती दक्षिणेंत नव्हे आपल्या या भारतांत!

अशा रीतीनें दक्षिण भारत दिल्लीच्या बादशहाचा मांडलिक बनला. पण ही स्थितीही फार दिवस टिकली नाहीं. इ. स. १३१८ सालीं दिल्लीच्या बादशहानें देवगिरीवर स्वारी करून तेथील राजा हरपाळदेव यास पकडून जिवंत सोलून ठार केलें! **आहे कीं नाहीं मुसलमानी मानवी सहृदयतेचा नमुना**! देवगिरी राज्यावर मुसलमान सुभेदार नेमून तें राज्य दिल्लीच्या राज्यास जोडलें अशा रीतीनें आपला महाराष्ट्र परतंत्र झाला! मुसलमानांच्या गुलामगिरींत खितपत पडला!

राहतां राहिलें पांड्य राजाचें राज्य! मलिककाफूराच्या नशिबानें तेथील राजपुत्रांत भांडण लागून एकानें तर त्याचेंच साहाय्य मागितलें! तेथील राजा मारवर्मन याच वेळीं मृत्यु पावला. त्याच्या दोन मुलांत गादीसाठीं तंटा लागला. राजपुत्र जटावर्मन यानें अल्लाउद्दीन खिलजीकडे मदत मागितली. त्याला मदत करण्याच्या मिषानें मलिककाफूर मोठें सैन्य घेऊन दक्षिणेंत आला. त्यानें राजपुत्र जटावर्मन सुंदर याच्या बाजूनें त्याचा भाऊ वीरवर्मन याशी लढा दिला. त्याचा पराभव करून त्यानें जटावर्मनला गादीवर बसविलें! मात्र तो आतां दिल्लीचा मांडलिक बनला. अशा रीतीनें त्यानें आपलें स्वातंत्र्य गमाविलें!

मलिककाफूर तेवढ्यावर थांबला नाहीं. तो लुटालूट करीत थेट रामेश्वरपर्यंत गेला. आपल्या विजयाची खूण म्हणून त्यानें तेथें एक मशीद बांधली आणि इस्लाम धर्माचा झेंडा फडकवीत वाटेंत

लुटालूट करून अफाट संपत्ति गोळा करीत तो पुन्हा दिल्लीला गेला!

इ. स. १३२२ सालीं दिल्लीचा बादशहा महमद तघलख यानें वारंगळ राज्यावर स्वारी केली. तेथील राजा प्रतापरुद्रदेव यास पकडून त्यानें त्याला दिल्लीला नेलें आणि तें राज्य खालसा केलें! त्या ठिकाणींही त्यानें आपला हस्तक म्हणून एक मुसलमान सुभेदार नेमिला.

या एकाच खेपेंत त्यानें राज्य खालसा करून तेथें एका मुसलमान सुभेदाराची नेमणूक केली. इ. स. १३२४ मध्यें त्यानें मदुरेच्या राज्यावर हल्ला चढविला. राजधानी मदुरा काबीज करून त्यानें तेथेंही मुसलमान सुभेदाराची नेमणूक केली. आणखी पुढें जाऊन त्यानें इ. स. १३२७ मध्यें श्रीरंगपट्टण काबीज केलें.

त्याचें आक्रमण एवढ्यावरच संपलें नाहीं. त्यानें आणखी पुढें जाऊन द्वारसमुद्रावर हल्ला चढविला. तेथील राजाचा पराभव करून त्याची सत्ता नष्ट केली. इ. स. १३३४ सालीं त्यानें अना-गोंदीच्या राजावर स्वारी करून तें राज्य जिंकलें. महमद तघलख बादशाहाला हा मुलुख इतका आवडला कीं, अनागोंदी राज्यांतील जुन्या राजाचे किल्ल्यांतच त्यानें आपला मुक्काम ठोकला आणि दोन वर्षेंपर्यंत तो तेथेंच राहिला. लढाईंत राजघराण्यांतील सर्वच संबंधितांचा नाश झाला. इब्नबतूताच्या मतें राजाच्या अकराही मुलांना मुसलमान बनविण्यांत आलें!

अशा रीतीनें केवळ पंचवीस वर्षांत सारा देश—दक्षिण भारत मुसलमानी सत्तेखालीं गेला!

कित्येक बखर लेखकांच्या मतें या लढाईंत महंमद तघलखाला अना गोंदीच्या राजाचे सहा वृद्ध अधिकारी एका महालांत लपून

बसलेले आढळले. बादशहानें त्यांना कैदेंत ठेविलें. त्या अधिकाऱ्यांकडून राजाच्या तिजोरीचा सुगावा काढून तींतून अगणित संपत्ति त्यानें मिळविली !

बादशहा दोन वर्षे दक्षिणेंत राहिल्यानें त्याचा उत्तरेकडील अंमल ढिला पडला. कित्येक सुभेदार स्वतंत्र झाले. त्यांनीं बादशहाचा अंमल झुगारून दिला. यामुळें बादशहाला दिल्लीला परतणें भाग पडलें. त्यानें अनागोंदी येथें मलिक नबी या तुर्क सरदाराला सुभेदार नेमलें. त्याला भरपूर सैन्याचीही मदत दिली आणि तो दिल्लीला निघून गेला. लढाईंत पकडलेले सहा कारभारी कैदी म्हणून त्यानें आपल्याबरोबर दिल्लीला नेले !

दक्षिणेंतील लोकांनीं बादशहा येथून जातांच बंडखोरीला सुरुवात केली. मुसलमानी अमलाला ते पूर्णपणें कंटाळले होते. त्यांत हा मलीक नबी मोठा जुलमी सुभेदार होता. त्यानें हिंदू प्रजेवर अत्याचार करण्यास सुरुवात केली. लोक चिडले आणि त्यांनीं सुभेदाराला येथून पळून जाणें भाग पाडलें !

मलीक नबी देवगिरी नव्हे दौलताबादच्या सुभेदाराकडे आश्रयास गेला. तेथून त्यानें सारी हकिकत बादशहास कळवून "काय करावें" असा सल्ला विचारिला. या वेळीं सैन्य जमवून पुन्हा दक्षिणेंत स्वारी करणें बादशहाला शक्य नव्हतें. त्यानें आपल्या मंत्रिमंडळाला सल्ला विचारिला. त्यांनीं सल्ला दिला कीं, त्या "परिस्थितींत कोणीही परका सरदार सुभेदारी करूं शकणार नाहीं. अनागोंदीहून सहा कैदी आणले आहेत. त्यांतील एक सर्वांत वृद्ध आहे त्यालाच राजा म्हणून नेमून पाठवावें. बाकीच्यांना त्याचे मंत्री म्हणून नेमावें. मात्र तिकडे जाण्यापूर्वी आपण दिल्लीच्या बादशहाशीं राजनिष्ठ राहूं अशी त्यांजकडून शपथ घेववावी."

महंमद तघलखाला हा विचार मानवला. त्यानें मलीक नबीला परत बोलावलें. आणि त्या सहा कैद्यांची सुटका करून त्यांजकडून राजनिष्ठेची शपथ घेवविली. त्यांतील सर्वांत वृद्ध ज्याचें नांव देवराव होतें-कोणाचें मतें हरिहर होतें—यास प्रमुख म्हणजेच अनागोंदीचा राजा नेमिलें. इतरांना त्याचे हुकूम पाळण्याची आज्ञा देऊन बादशहानें त्यांची रवानगी अनागोंदीकडे केली.

मुसलमानी जुल्म, कत्तली, पळवापळव आणि लुटालूट यांनीं गांजलेली हिंदु जनता नव्या हिंदु राजाची सत्ता मान्य करण्यास एकदम खूष दिसली. दिल्लीहून आलेल्या त्या माणसाचें नांव देवराव होतें असें कोणी म्हणतात, कोणी 'हरिहरप्पा होतें असेंही सांगतात. हा मूळच्या अनागोंदीच्या राजाच्या मंत्रिमंडळांत एक मंत्री म्हणून नेमला गेला होता. अर्थात 'राज्यव्यवस्था' त्याला अपरिचित नव्हती. तो राज्यभार वाहण्यास समर्थ होता. त्यानें जनतेच्या हिताकडे लक्ष देऊन राज्यांत शांतता नांदविण्याची पराकाष्ठा केली. त्याच्याबरोबर आलेल्या राज्याधिकाऱ्यांनींही त्याला राजनिष्ठ राहून भरपूर साहाय्य केलें.

या गोष्टीसंबंधीं अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. त्यांचा परामर्ष शेवटीं घेऊं. ग्रंथ आणि शिलालेख यां आधारें हा "देवराव" कोण होता हें पाहूं.

# ३ यादव कुळांतील संगम राजा

होयसळ राजाचा संगम राजा नांवाचा एक मांडलिक राजा होता. म्हैसूर राज्यांतल्या शिमोगा प्रांतांत कलास येथें तो राज्य करीत होता. होयसळ राजाचा तो एक जवळचा नातेवाईकच होता. संगम नांवाजलेला वीर असून त्यानें होयसळ राजाला अनेक वेळां साहाय्य केलें होतें. तो शूर होता तसाच उदार आणि धार्मिक ही होता. त्यानें दिलेलीं अनेक दानपत्रें आढळून आलीं आहेत.

दक्षिणेकडे चेल, चोल वा इतर राजे यांनीं होयसळ राजांची कुरापत काढली, त्या वेळीं संगमानें त्यांना जेरीस आणून होयसळांशीं तह करणें भाग पाडलें. त्यानंतर त्यानें तंजावर व श्रीरंगपट्टण हीं जिंकून आपल्या ताब्यांत आणलीं. तो एकदां रामेश्वरच्या यात्रेला गेला होता. त्या वेळीं त्यानें केलेल्या दानधर्माचा उल्लेखही अनेक शिलालेखांत आढळतो. तो मोठा प्रजाहितदक्ष असून त्याची प्रजा त्याच्यावर अत्यंत खूष होती.

नेल्लूर येथील दानपत्रांत त्याचा उल्लेख कसा केला आहे पहा. हें दानपत्र एपिग्राफिका इंडियाच्या नेल्लूर नं. १९ पृ. १२१ वर दिलें आहे तें असें.

**सोमवंश्या यतः श्लाघ्याद्यादवा इति विश्रुताः**
**तस्मिन् यदुकुले श्लाघ्ये सोभून् श्री संगमेश्वरः**
**येन पूर्वविधानेन पालिता सकलाः प्रजाः**

या संगमाच्या वेळीं होयसळ राज्याला मुसलमानांच्या हल्ल्याची फारशी झळ लागली नव्हती. याचा संगम, संगमेश, संगमेंद्र, संगम नृपेंद्र अशा अनेक नांवानी उल्लेख केलेला आढळतो.

संगम राजाच्या राणीचें नांव शारदा असें होतें. तिलाही मागांबिका, गौरांबिका, कामाक्षी अशीं दुसरीं नावें मिळालीं होतीं. नेल्लूरच्या दानपत्रांत तिचा उल्लेख मागांबिका या नांवानें केलेला आढळतो. तिच्या पोटीं पांच पुत्र जन्माला आले. पहिला हरिहरप्पा, दुसरा बुक्क, तिसरा कम्प, चौथा मारप्पा व पांचवा मुदप्पा अशीं त्यांचीं नांवें होतीं. हे पांची पुत्र मोठे शूर पराक्रमी निपजले असा उल्लेख पुढील श्लोकांत आहे.

**तस्मादुद्भवन् पंचतनयाः शौर्यशालिनः**
**कल्पावनिरूहा : पूर्वं कलशाम्बुनिधेरिव ॥**

**आदौ हरिहरः क्ष्माभृदथ कम्प महिपतिः**
**ततो बुक्कमहिपाल : पश्चान्मारयमुद्दपौ ॥**

एपि. इं. खं ३ पृष्ठ २५

या संगम राजाच्या वंशाची विशेष आणि थोडी विस्तारपूर्वक अशी माहिती एपिग्राफिआ कर्नाटिका खंड १० बागेपल्ली ७० मध्यें देण्यांत आली आहे. ती अशी :—

**चतुस्समुद्राधिपतेस्सुतोऽभूत् ततश्चतुः**
**षष्ठिकलाप्रवीणः**
**नाम्नायदुः कोऽपि नराधिपेंद्रो धाम्ना**
**प्रथातीत-भुजः-प्रतापः ॥ ११ ॥**

तद्वंश मुक्तामणयो बभूवुश्चतुर्विधै-
स्सहिता महीपाः
यदोः प्रतापहिमयानुनास्ता प्रतिपदा-
रश्मित चंद्रिकासीत् ॥ १२ ॥

तेषां कुले कश्चन बुक्कनामा तेजो-
दुरापस्समभून्महीपः
मागाम्बिका तस्यबभूव राज्ञी
मेदिन्यदन्वत्तनयाधिविन्न ॥ १३ ॥

तस्याऽभवत् संगमनाम-धेयः
सरस्वतीगीत भुजापदानः
शौर्ये समाहुः किल कर्तवीर्यं
धैर्ये हिमाद्रिं महसीह सूर्यम ॥ १४ ॥

मानाम्बिका तस्य बभूव पत्नी
महेश्वरस्येव महीध्रकन्या
विदर्भपुत्रीव नलस्य विष्णो
र्लक्ष्मीरिवेंद्रस्थ पुलोमजेव ॥ १५ ॥

तेनोदपाद्यन्त सुता महिष्यां
तस्यां प्रशस्याकृतिना नृपेण
पञ्चाहित-क्ष्मापति-कुंजराणां
पञ्चाननाः पञ्च शराभिरूपाः ॥ १६ ॥

हरिहर-राय-कम्प-धरणीपति-बुक्क मही-
परिवृढ-मार-भूरमण-मुद्गनृपाः-खलु ते
अनघ गुणेषु नवखंडमहीश्वरताम्
अभजत पूर्वजस्स युधिष्ठिरवन्महसा ॥ १७ ॥

**सो ऽ यं विजित्याखिल–दिग्विभागान्**
**सुत्राम–धामांग–कलिंग--पूर्वैः**
**उपास्यमानः क्षितिपैश्च सर्वाम्**
**उर्वीमशात् कुंजर--कोण--पुर्याम् ॥ १८ ॥**

या वरील उताऱ्या वरून संगमवंशाची थोडी अधिक माहिती मिळते. हा लेख कानडी लिपींत पण संस्कृत भाषेंत दिला असून संग्रहाच्या २९८ व्या पानावर दिला आहे;

या संगमाला पांच मुलगे असून त्यांत हरिहर सर्वांत वडील होता. होयसळच्या राज्यांत तो मोठा माननीय सरदार गणला जात असे. याचे वेळीं मुसलमानांनीं द्वारसमुद्रावर स्वारी केली आणि तेथील राजा वीरबल्लाळ याची सत्ता संपुष्टांतच आणिली. पण त्या राज्याचें भाग्य कीं, राजाचा पाडाव करून त्यावर मुसलमानीं सुभेदार नेमला नव्हता. वीरबल्लाळ राजा म्हणून कसा बसा दिवस काढीत होता. पण यवनांची धाड पुन्हा कधीं कोसळेल याचा नेम नव्हता.

वरंगळचे राजकारणी मुसलमान सुभेदार इतर सुभेदारांशीं संगनमत करून राहिलेल्या हिंदुराज्यांवर मुसलमानी सत्ता स्थापण्याच्या प्रयत्नांत आहेत अशी वार्ता होयसळ राजांना कळली. आतां त्यांचेंच एक हिंदुराज्य राहिलें होतें अर्थात हा धोका त्यांनाच होता. ते घाबरून गेले. त्यांना ही वार्ता वारंगळ येथील राजे प्रतापरुद्रदेव यांच्या कृष्ण नाईक या नांवाच्या मुलाकडून कळली. आपल्या राज्याचा नाश झाल्यावर हा कृष्ण नाईक वारंगळ नजीकच एका ठिकाणीं गुप्तपणें राहात होता. वारंगळच्या मुसलमानांनीं चालविलेल्या चळवळींकडे त्याचें पूर्ण लक्ष होतें!

तेथील बातम्या आपल्याला कळाव्या म्हणून त्यानें कित्येक हुशार गुप्त हेरही नेमले होते. त्यांच्या खलबतांच्या गुप्त बातम्या ते या कृष्णनायकाला कळवीत !

त्या बातम्यांचा इत्यर्थ म्हणजे लवकरच होयसळ राज्यावरच यवनांचें मोठें संकट येणार हाच होता.

## ४ महामंडलेश्वर

राजा वीर बल्लाळ हा एकटाच हिंदु राजा अस्तित्वांत होता. बाकीं सारींच राज्यें मुसलमानीं सत्तेनें काबीज केलीं होतीं अर्थात् आपल्यावर मुसलमानी धाड पडली तर कोणताही राजा आपल्या मदतीला येणार नाहीं याची जाणीव त्याला होती. मुसलमानांच्या प्रचंड फौजेपुढें आपलें काय चालणार? हें जरी खरें असलें तरी आपल्या रक्षणाची आपण कांहीं तरी तजवीज केली पाहिजे. असें ठरवून त्यानें राज्याचा नीट बंदोबस्त करण्यास सुरुवात केली.

मुसलमानांची धाड उत्तरेकडून येणार अर्थात राज्याच्या उत्तर सीमेवर कोणीतरी पराक्रमी, अनुभवी अशा शूर पुरुषाची नेमणूक केली पाहिजे असें ठरवून राज्यांतील सर्व शूर अधिकाऱ्यांच्या गुणावगुणांचा काळजीपूर्वक विचार करून त्यानें हरिहरप्पाची त्या कामीं निवड केली आणि उत्तरेकडील मुलुखावरील "महा-मंडलेश्वर" या पदावर त्याची नेमणूक केली.

हरिहरप्पा हा यापूर्वी वरंगळच्या काकतीय राजांच्या पदरीं मोठ्या हुद्यावर होता. त्याचा मधला भाऊ बुक्क हाही त्या राज्यांत कोषाधिकारी होता. त्या वेळीं ते दोघे बंधु हुक्क व बुक्क या नांवांनीं ओळखले जात. त्यामुळें त्यांना त्या राज्यांतील सर्व मुलुखांची चांगलीच माहिती होती. पण इ. स. १३२३ मध्यें तें राज्य मुसलमानी अत्याचाराला बळी पडलें. तें राज्य बादशहाच्या सत्तेखालीं गेल्यावर त्या दोघां बंधूंनीं मोठ्या सावधगिरीनें तेथून सुटका करून घेतली!

यानंतर ते दोघे बंधु अनागोंदी येथील राज्यांत आले. तेथील राजा जंबुकेश्वर यानें त्या बंधूंची पात्रता ओळखून त्यांना आपल्या राज्यांत मोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या. त्यांत हरिहरराय याला तर त्यानें मुख्य दिवाणच नेमिलें. त्यानें तेथील कारभार मोठ्या इमानें इतबारें करून नांव कमाविलें. त्याच्या कर्तबगारीची राजाला पूर्ण जाणीव झाली. प्रजेलाही त्याच्या प्रजानुरंजनाचा प्रत्यक्षच अनुभव आला. अनागोंदी राज्यांत तो अत्यंत लोकप्रिय अधिकारी-दिवाण म्हणून गाजला !

पण अनागोंदीच्या राज्यावर महंमद तघलखाची धाड आली ! राजानें बारा वर्षें टिकाव धरला आणि लढा दिला. पण शेवटीं राजा आणि त्याचे शूर शिपाई यांनीं आपल्या स्त्रिया-मुलांचा स्वहस्तें नाश करून ते लढतां लढतां मुसलमानांच्या तलवारींना बळी पडले ! याही प्रसंगीं मोठें अवधान राखून हरिहर राय निसटला आणि आपल्या घरीं म्हणजे होयसळ राज्यांत येऊन राहिला. :

हरिहर रायाचें हें असें पूर्ववृत्त होतें आणि त्यामुळेंच वीर बल्लाळानें त्याला महामंडलेश्वर या जागेवर नेमिलें. नेमणूक होतांच त्या जागेवर हजर होऊन उत्तर सीमा रक्षणाची जबाबदारी स्वीकारण्या-साठीं तो लागलीच निघाला. जातां जातां वाटेंतच अनागोंदी शहर लागलें. त्या शहराची हाल-हवाल काय आहे हें एक वार पाहून जावें म्हणून तो त्या नगरींत शिरला. तेथील परिस्थिति अवलोकन करून त्याचें हृदय शतशः विदीर्ण झालें !

राजा जंबुकेश्वर रणांत पडला. उरल्या सुरल्या राण्या सती गेल्या. त्यांच्या अकराही राजपुत्रांना जुलमानेंच मुसलमान बनविण्यांत आलें ! ही झाली राजाची स्थिति. प्रजेची अवस्थाही तीच. सैन्यानें साऱ्या जनतेची लुटालूट केली. असंख्य लोकांची कत्तल

केली. सैन्यानें स्त्रिया पळविल्या. बादशहाच्या आज्ञेनें देवळें पाडून त्या ठिकाणीं मशिदी उभारण्यांत आल्या. देवांच्या मूर्ती फोडून रस्त्यावर फेकून दिल्या गेल्या. यवनांच्या या क्रूरपणाला घाबरून लोक पळून गेले! गांवेंचीं गांवें ओस पडलीं! स्वर्गाचें स्मशान बनलें अमरपुरीची नरकपुरी बनली! जाळपोळ लुटालूट! कोठेंही नजर पडो तिला नाशाचें दृश्य दिसायचें!

हरिहरनें हें पाहिलें! त्याची अक्कल गुंग झाली. अरेरे! ही मानवी कृती कीं राक्षसी! हेंच त्याला समजेना! रस्ते ओस पडलेले! बाजारपेठा लुटून उघड्या पडलेल्या! जिकडे जावें तिकडे दीर्घ आक्रंदन चाललेलें! अरेरे!

हें सारें दृश्य पाहून त्याचें अंतःकरण फाटूनच गेल्यासारखें झालें! त्याला दीनजनांचा कळवळा आला! रागानें तो तडफडला! आणि हताश होऊन अश्रू गाळूं लागला! या साऱ्यांचा कोणीच त्राता नाहींना? आपण हिंदुप्रजा यवनाहातीं बकऱ्याप्रमाणें चरचरा कापली जाण्याकरितांच जन्माला आलों का? या दीन दुबळ्या हिंदु प्रजेचें रक्षण करणारा कोणी जन्माला आला नाहीं ना?

ज्या देवानें भगवद्‌गीतेंत आमच्या रक्षणाचें आश्वासन दिलें त्याला ही आमची दीनावस्था दिसत नाहीं का? आमच्यावर होणाऱ्या अत्याचारांचें त्याला कांहीं वाटत नाहीं का? मग धर्मावर अन् देवावर विश्वास तरी कशाला ठेवावयाचा! असे विचार त्याच्या मनांत डोकावूं लागले! त्यानें परमेश्वराची करुणा भाकली आणि "आम्हां हिंदूंचें रक्षण कर" अशी मनांतल्या मनांत त्याची विनवणी केली.

त्या शहरांत जास्त थांबणें हें धोक्याचें होतें. म्हणून तो मोठ्या दुःखानें पुढील मार्गाला लागला!

## ५ विद्यारण्य स्वामींची भेट

हरिहरप्पा आपल्या कामावर रुजू झाले. होयसळ राज्याच्या उत्तर सीमेचा बंदोबस्त करून यावनी टोळधाडीला कसें तोंड देतां येईल या कामांत ते गुंग झाले. वरवर ते आपल्या कामांत गुंग झाल्यासारखें दिसत असले तरी त्यांचें अंतःकरण आंतून जळत होतें. क्षणोक्षणीं ते देवाला आळवीत होते: "भगवंता आम्हां हिंदूंना सामर्थ्य दे! या राक्षसी अत्याचारांना तोंड देऊन त्या दुष्ट व क्रूर परकीयांना आम्ही घालवून देऊं इतकें सामर्थ्य आम्हांला दे!"

हरिहराला शिकारीचा मोठा नाद होता. तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेला मोठमोठीं जंगलें होतीं. शिकारीच्या फार सोईचीं होतीं तीं. कदाचित् तेथील राजांनीं शिकारीसाटीं योग्य म्हणून तीं जंगलें तशींच राखून ठेवलीं असतील ही. रोज कामानें आलेला शीण घालविण्यासाटीं, मन उत्साहित करण्यासाठीं ते शिकारीला निघत. यासाठीं त्यांनीं कांहीं कुत्रेही बाळगिले होते. शिकारीच्या कामांत ते अगदीं वस्ताद होते. इतके कीं, त्यांनीं एकदोन वेळां वाघसिंहावरही हल्ला करण्यास कमी केलें नव्हतें!

विद्यारण्य स्वामींच्या कालज्ञान पुस्तकांत पुढील उल्लेख आढळतो. हरिहरप्पा यांच्या शिकारीविषयीं हा उल्लेख आहे.

**तुंगभद्रां नदीं तीर्त्वा दक्षिणे दिग्विभागके**
**विपिने तु परिश्रान्तं दृष्ट्वा क्षुद्रमृगं पुनः**

**शशस्य ग्रहणार्थाय भटाः श्वानचयं ततः**
**अमुचंस्तेष्वेभि ग्रस्तौमृगया नभ्यदुद्रवन्**
**प्रपलाय्य गतः श्वानाः स मृगोऽन्तर्दधे पुनः**
**तदाश्चर्यं मन्यमाना मृगयाजीविनो भटाः**

हा उतारा 'विजयनगरच्या इतिहासाची' आणखी उपलब्ध साधनें. या ग्रंथांतून घेतला आहे.

हरिहरप्पा एके दिवशीं शिकारीसाठीं निघाले. बरोबर दुसरीही कांहीं मित्रमंडळी होती. तुंगभद्रा नदी ओलांडून तिच्या दक्षिणेला असलेल्या जंगलांत ते शिरले. दाट जंगलाचा भाग लागतांच त्यांना एक ससा दिसला. लागलीच त्यांनीं आपल्या शिकारी कुत्र्यांना त्याला पकडून आणण्याची नित्याप्रमाणें आज्ञा केली. आज्ञा होतांच कुत्राही मोठ्या वेगानें सशावर धावून गेला. पण आपल्या आटोक्यांत कुत्रा आला असें पाहून सशानेंच त्याच्यावर उडी मारली आणि कडकडून चावा घेतला! कुत्र्याला जणूं प्राणांतिक वेदना व्हाव्यात तसा तो किंचाळू लागला आणि धन्याकडे घाबरून परत आला. हें पाहून हरिहराला मोठें आश्चर्य वाटलें! त्यानें पुनः त्या सशावर हल्ला करण्याचा कुत्र्याला इशारा दिला; पण व्यर्थ! तो कुत्रा एक पाऊलही त्या बाजूला टाकीना इतका त्या सशाचा त्याला धाक वाटूं लागला. थोड्या वेळानें तो ससाही झाडींत पळून गेला आणि दिसेनासा झाला.

हा चमत्कार पाहून हरिहराला मोठें आश्चर्य वाटलें. नेहमीं वाघालाही न भिणारा कुत्रा आज सशाला भितो याचें त्यांना मोठेंच नवल वाटूं लागलें! कुत्र्याची चाहूल ऐकतांच ससा जीव घेऊन जंगलांत पळून जावयाचा; त्यानें आज उलटून कुत्र्यावर हल्ला

करावा! याचें त्यांना मोठें नवल वाटलें! हा काय चमत्कार आहे! कीं ही भुताटकीच आहे. सशाच्या रूपानें कोणी भूत तर नव्हतें आलें! असे विचार करीत ते नदीकांठानें परत यावयास निघाले! हें काय गौडबंगाल आहे याचाच सारखा ते विचार करीत होते, पण त्यांना कांहीं उलगडा होईना.

थोड्याच वेळानें त्यांच्या समोरून एक दिव्य पुरुष येत असलेला दिसला. तो जवळ येतांच हरिहर घोड्यावरून खालीं उतरले. तोंच ती विभूति त्यांच्या अगदीं जवळ येऊन ठेपली. कपाळावर भस्माचा आडवा शुभ्र पट्टा ओढलेला, अंगावर शुभ्र वस्त्र पांघरलेलें, पायांत खडावा, आणि तेजःपुंज चेहरा! हरिहरानें त्यांना अत्यंत आदरपूर्वक नमस्कार केला व तो जवळच उभा राहिला.

त्या दिव्य विभूतीनें हरिहर वांकला असतां त्याच्या डोकीवर दोन्ही हात ठेवून त्याला आशीर्वादपूर्वक अभिवादन केलें. कोण होती ही दिव्य विभूति? एक तपोबलानें सूर्याप्रमाणें तेजस्वी दिसणारा ब्राह्मण!

हरिहराचेंच नव्हे तर दक्षिण भारताचें भाग्य उजळलें! म्हणूनच या तपस्वी मुनींचें त्यांना दर्शन झालें! ही विभूति म्हणजे तपोधन ब्राह्मण माधवाचार्य होत. हरिहरासारख्या क्षत्रियवीराला राज्यलक्ष्मी मिळवून देणारी हीच विभूति. कर्नाटकांत नवीन स्वतंत्र हिंदुराज्य स्थापन करण्याची स्फूर्ति देणारी हीच ती लोकोत्तर विभूति! हाच युगकर्ता थोर महात्मा! दक्षिण भारताचा भाग्यविधाता नव्हे सर्वच भारताचा हा नव ज्ञानेश्वर! कर्नाटक सिंहासन स्थापनाचार्य या बिरुदावळीनें भारताच्या इतिहासांत चमकणारे माधवाचार्य ते हेच! विजयनगरची स्थापना करून त्या राज्याचें मंत्रिपद स्वीकारून त्याला महत्पदास चढविणारे माधवाचार्य ते

हेच. भविष्यकाळीं संन्यासदीक्षा घेऊन शृंगेरीपीठाचे जगद्गुरु म्हणून थोरपणा पावलेले विद्यारण्यस्वामी ते हेच !

या महापुरुषाचे रूपानें आपणांस देवच भेटला असें हरिहरांना वाटल्यास नवल तें कोणतें ! आशीर्वाद दिल्यावर त्या तेजस्वी विभूतीनें हरिहराची ममताळूपणें विचारपूस केली. हरिहरानें आपल्या नांवगांवांची माहिती देऊन नुकत्याच पाहिलेल्या चमत्काराचें वर्णन करून म्हटलें, " मुनिवर्य, काय असावें या चमत्कारांतलें इंगित ? "

माधवाचार्यांनाही ती हकीकत ऐकून मोठें नवलच वाटलें. ती जागा आपण प्रत्यक्ष पहावी अशी त्यांना इच्छा झाली. ते म्हणाले, " वीर पुरुषा, त्या जागेवरच आपण जाऊं म्हणजे सांगतां येईल यांतलें रहस्य ! ते दोघेही त्या शिकारीच्या जागीं आले. माधवाचार्यांनीं ती जागा अगदीं नीट न्याहाळून पाहिली. खालीं वर सर्व बाजूला आपली दिव्य दृष्टि फेकून या चमत्काराचा उलगडा करण्यासाठीं डोळे मिटून एकदोन मिनिटें त्यांनीं अंतरदृष्टि जागृत केली आणि त्या दृष्टीने त्यांना या कोड्याचा उलगडा झाला.

ते एकदम म्हणाले, " हरिअप्पा, ही जागा खचितच पुण्यभू आहे ! पराक्रमी वीरांच्या वसतिस्थानाला योग्य अशीच आहे ! तुला हा चमत्कार या भूमीनें दाखविला यावरून तूंही मोठा भाग्यशाली आहेस. ह्या ठिकाणीं तूं आपला राजवाडा बांध.हो राजवाडाच तूंच येथला पहिला राजा व्हावयाचा आहेस ! येथें भविष्य काळीं मोठें हिंदुसाम्राज्य उभें राहाणार असून तें उभें करण्याचा मान तुला मिळावयाचा आहे. या स्थानाला त्या विशाल जग प्रसिद्ध हिंदु साम्राज्याची राजधानी होण्याचा मान मिळणार आहे. तर त्वरा कर. आणि या ठिकाणीं स्वतःचा वाडा बांधून खूप मोठें शहर वसव. तावडतोब कार्याला लाग ! विरूपाक्ष देव तुला अनुकूल आहे. त्याच्या

कृपेनें सर्व मांगल्याचा तुझ्यावर वर्षावच होणार आहे म्हणाना ! येथें तूं पाहिलेला चमत्कार हा दैवी शुभ संदेश आहे ! देशाच्या आणि जनतेच्या भावी उत्कर्षाचें व लोकोद्धाराचे तें एक सुमंगल चिन्ह आहे विस्मृत साम्राज्य By Sewell Robrt pages 299–300 नेल्लूर आणि कोल्लार येथील शिला लेखांत असाच मजकूर थोड्या फार फरकानें दिलेला आढळनो !

## ६ विद्यानगरची पायाभरणी

माधवाचार्यकृत कालज्ञान या ग्रंथांतल्या पुढील उताऱ्यांत या संबंधींच्या अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे. तो हा उतारा पहा.

तुगभद्रानदीतीरे हस्तिकोणाव्हये पुरे
निवसन्तौ कदाचित्तौ मृगयामनोत्सुकौ
तुंगभद्रां नदीं तीर्त्वा दक्षिणे दिग्विभागके
विपिने तु परिश्रान्तं दृष्ट्वा क्षुद्रमृगं पुनः
शशस्य ग्रहणार्थाय भटाः श्वानचयं ततः
अमुचंस्तेष्वाभिग्रस्तौ मृगयानभ्यदुद्रुवन्
प्रपलाय्य गताः श्वाना स मृगयोऽन्तर्दधे पुनः
तदाश्चर्यं मन्यमानाः मृगयाजीविनो भटाः
पालयोः समाचख्युः तद्वृत्तान्तं तु तत्र तौ
विज्ञापयत आर्याय गुरवे विश्रुताय च
विद्यारण्याय मुनये वेदव्यासकृपावते
तच्छ्रुत्वा वचनं योगी समायातस्तदन्वितः
तां स्थलीं स समीक्ष्याय राजधानीं महाभुज ।
तद्वंशजानामन्येषां कर्तुमेवोपचक्रमे
धात्रब्दे सितसप्तम्यां वैशाखे मासि भास्करे
दिक्संख्या युक्तबाणाद्विचंद्रयुक्तशकांन्विते
रचिता नगरी रम्या पुरुषाकृति शालिनी

या उताऱ्याचा समावेश विजयानगरच्या इतिहासाचीं आणखी उपलब्ध साधनें या ग्रंथांतल्या सोळाव्या पानावर केला आहे.

या उताऱ्यांत हरिहर शिकारीस गेला, कुत्र्याला सशानें चावा घेऊन त्याला घाबरविलें. ही कथा हरिहरानें माधवाचार्यांना सांगितली. त्यांनीं त्या पुण्यभूमीवर शहर वसविण्याची कल्पना हरिहराला सांगितली आणि ती कल्पना नुसती सांगूनच ते स्वस्थ बसले नाहींत तर लवकरच शुभमुहूर्त पाहून त्या शहराची कोनशिला आपल्या हस्तें बसविली. तो दिवस म्हणजे शके बाराशें अठ्ठावन-मधील वैशाख महिन्याची शुक्ल पक्षांतील सप्तमी हा होय. त्या दिवशीं रविवार होता. या संवत्सराचें नांव 'धातु' असें होतें. शालिवाहन शके १२५८,

हरिहर आणि माधवाचार्य यांची भेट होऊन नवें शहर वसविलें जाणार आहे ही बातमी हां हां म्हणतां सगळीकडे झाली. किती तरी लोकांना ही कल्पना आवडली. हरिहर घरच नव्हे, तर राजवाडा बांधायला कधीं सुरुवात करितो याची वाटच लोक पहात होते. राजवाड्याच्या पायाचा दगड बसविला. हा समारंभ पुष्कळांनीं पाहिला, अनेकांनीं ऐकला आणि निरनिराळ्या धंदेवाइकांनीं मोठ्या उत्साहानें या नव्या होऊं घातलेल्या शहरांत येऊन राहाण्याचें ठरवून जागा मिळविली आणि त्यांतील किती तरी लोकांनीं धनिकांनीं आणि जहागिरदारांनीं घरें बांधण्यास सुरुवातही केली. वठून गेलेले तरूवर वसंतागमनानें कोमल पल्लव फुटल्यामुळें जसे एकदम उठून सुंदर दिसूं लागतात त्याप्रमाणें ही जागा नवनव्या बांधल्या जाणाऱ्या हवेल्यांनीं, वाड्यांनीं आणि घरांनीं शोभिवंत दिसूं लागली! त्या जागेला भाग्याचा बहर आला.

अन् कोणता होता तो भूभाग? तुंगभद्रा नदीच्या दक्षिण कांठचा

तो प्रदेश म्हणजे रामायण कालांतली ती किष्किधा नगरी! भगवान श्रीरामानें आपल्या पदस्पर्शानें पवित्र केलेली ती भूमि! रामभक्त अंजनीसुत हनुमंताची ती जन्मभूमि; समोरच हेमकूट आणि ऋष्यमूक पर्वत अद्याप ताठ उभे राहून सुग्रीवादि कपि कुलोत्पन्न वीरांनीं केलेल्या पराक्रमांची आठवण देत होते. जवळच मातंगाश्रम आणि शबरीचें स्थान. श्रीरामचंद्रांनींहीं ज्याचें सुंदर वर्णन करून आपलें दुःखी कष्टी मन प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला असें पंपा सरोवर! शेजारींच जानकी जलाशय! वृक्षलतादिकांनीं गजबजलेली ही निसर्ग सुंदर भूमि माधवाचार्यांना एकदम पसंत पडली आणि हरिहरांना खूप आवडली.

माधवाचार्यांनीं जागा पाहिल्यानंतर दिलेला सल्ला ऐकून हरिहराचें अंतःकरण अगदीं हरखून गेलें! थोड्या वेळानेंच त्यानें आचार्यांचा निरोप घेतला. नंतर तो आपल्या वसतिस्थानीं गेला आणि आचार्य आपल्या आश्रमांत गेले. दोघांचींही मनें आनंदानें बहरलीं होतीं. झालेली ही हकीकत आपल्या बंधूंना आणि हित-चिंतकांना कधीं एकदां सांगेन असें हरिहराला झालें होतें. त्यानें झालेली सर्व हकीकत आपल्या बंधूंना सांगितली आणि ते सारे पुढील गोष्टींची जुळवाजुळव करण्याच्या मार्गास लागले!

आचार्य भगवान विरूपाक्ष मंदिरांत जाऊन मोठ्या भक्ति भावानें त्याची स्तुति करीत समाधि लावून बसले! यानंतर माधवाचार्य आणि हरिहर यांच्या वारंवार गांठी भेटी होऊन पुढील कार्या-विषयीं चर्चा आणि बेत होऊं लागले. हरिहराची आचार्यांवर निःसीम श्रद्धा बसली आणि आचार्यांनाही हरिहराविषयीं प्रेम वाटूं लागलें! माधवाचार्यांनीं मंगल मुहूर्त ठरविला आणि हरिहरानें सर्व तयारी केली!

गुरुवंश महाकाव्यांत यासंबंधीं पुढील दोन श्लोक आढळतात.

**नागेष्वर्के नमितनृपतेश्शालिवाहस्य याते**
**धातोरब्दे शुभसमुचिते मासि वैशाख मासि**
**शुक्ले पक्षे सुरगुरुयुते सोम्यवारे सुलग्ने**
**सप्तम्यां श्री विजयनगरीं निर्ममे निर्ममेंद्रः**

यांत स्पष्टपणेंच सांगितलें आहे की, या दिव्य पुरुषानें म्हणजेच माधवाचार्यानें विजयनगरी निर्माण केली. त्या निर्माणकार्याचा आरंभ धातु संवत्सरांतील वैशाखमासांतील शुक्ल सप्तमी सोमवार या दिवशीं झाला ! हा पायाचा दगड बसविण्याचा समारंभही माधवाचार्यांच्या पुण्यमय पवित्र हस्तेंच झाला ! वरच्या सारखाच आणखी अनेक ठिकाणीं या गोष्टीचा उल्लेख आढळतो. विरूपाक्ष पंडितांनीं केलेल्या बसव पुराणांत संधि ६३ श्लोक १–२ यांतही असाच उल्लेख आहे. तें पुराण अर्थात तेथील लोक भाषेंत म्हणजे कानडींत आहे.

या शुभकार्याला सुरुवात करण्यापूर्वी माधवाचार्य शृंगेरीला गेले. झालेली सर्व हकीकत त्यांनीं मठाचे अधिष्ठित शंकराचार्य श्री भारतीतीर्थ यांचे कानावर घातली. त्यांचा आशीर्वाद घेऊनच त्यांनीं कामाला सुरुवात केली. निवडलेल्या जागीं स्वतः उपस्थित राहून शहराची अत्यंत काळजीपूर्वक आखणी केली आणि आखणीप्रमाणें मांडणी होत आहे इकडे काळजीपूर्वक लक्ष दिलें. यामुळें लवकरच हें सुंदर आणि प्रशस्त शहर उठून शोभूं लागलें

कोनशिला समारंभ फारच मनोवेधक आणि शास्त्रोक्त पद्धतींना अनुसरून पार पडला. त्याचें सविस्तर वर्णन विजयनगर वृत्तांत या मथळ्याखालीं थोडक्यांत सारांशरूपानें कानडींत देण्यांत आलें असून तें विजयनगर इतिहासाच्या नवीन उपलब्ध साधनें यांत

पान १३।१४ यांत दिलें आहे. त्याचा मराठी गोषवारा असा:—

तुंगभद्रा नदीच्या कांठावर आधींच वसलेल्या अनागोंदीच्या रानांत हरिहर हा शिकारीस गेल्या वेळीं तेथें सशानें त्याच्या शिकारी कुत्र्यावर हल्ला करून त्याला पिटाळून लावलें, इतकेंच नाहींतर त्याचा पाठलागही केला. यावरून त्या स्थानाचें माहात्म्य फार मोठें आहे असें जाणून तेथेंच नगरस्थापना करावी असें ठरवून माधवचार्यांनीं त्याच जागीं विजयनगरचा पाया घातला.

पायाभरणीचा समारंभ मोठ्या थाटामाटानें करण्यांत आला. त्यासाठीं शुभमुहूर्त ठरविला आणि वर सांगितल्याप्रमाणें धातुनाम संवत्सरीं ( १२५८ शके ) वैशाख महिन्यांतल्या सप्तमीच्या दिवशीं रविवारीं सुप्रभातींच हा समारंभ घडवून आणला. भारतीकृष्णतीर्थांनीं या प्रसंगीं श्री. विद्याशंकरांची स्थापना करून सुप्रसिद्ध शिल्पकार जक्कणाचार्य यांच्याकडून देवालय बांधविलें.

माधवाचार्य हे थोर तपस्वी होते. तपोबलानें त्यांनीं मंत्रसामर्थ्य संपादन केलें होतें. त्यांनीं पुढील साम्राज्य स्थापनेला बळकटी यावी म्हणून शृंगेरी व विजयनगर या दोहोंसाठीं एकत्र यंत्र लिहून तें मंत्रसिद्ध केलें. नंतर हरिहर राय यास सिंहासनावर बसविण्यापूर्वी आपणच सिंहासनावर अधिष्ठित होऊन तें पवित्र केलें. हरिहरराय याजकडून शृंगेरी येथील श्रीमठ, छत्र, धर्म, अग्रहार व परमहंस सत्र या सर्वांना त्यानें मिळविलेल्या कर्नाटक राज्यांतील घाटाखालील व घाटावरील सपादलक्ष जमीन समर्पण करून घेतली. नंतर रायाला त्या पवित्र सिंहासनावर बसवून त्याला पट्टाभिषेक केला. आणि त्याला राजचिन्हें, बिरुदावलि, मोत्यांचा किरीट, मोत्याचें सिंहासन वगैरे समारंभपूर्वक अर्पण केलें.

नंतर हरिहरराय यानें माधवाचार्य यांचा मोठा सत्कार केला.

त्यानें स्वामींना मोत्यांच्या उच्चासनावर बसविलें आणि त्यांचें यथाविधि पूजन केलें. नमस्कारादि करून सर्व प्रकारानें आपला आदर व्यक्त केला. आपली विरुदावलि माधवाचार्यांनींही चालवावी म्हणून मोत्यांचे किरीट, मोत्यांचें पीठासन सुवर्णाच्या पादुका वगैरे साहित्य रायानें त्यांस अर्पण केलें.

त्यानंतर माधवाचार्यांनीं व्यासांकडून मिळविलेल्या योगसिद्धीला आवाहन करून म्हटलें, "हे सिद्धि, या माझ्या नूतन नगरीजवळ द्रव्याभाव आहे यासाठीं या नगरीवर पावणेचार घटिका सुवर्णवृष्टि कर." त्यांची सिद्धि फलद्रूप होऊन नव्या नगरीवर चार घटिका सोन्याचा पाऊस पडला! लोकांच्या घरादारांवर पडलेलें सोनें त्या त्या घरमालकांनाच दिलें. इतरत्र पडलेलें सोनें गोळा करवून तें राजभांडारांत आणून राजाचें भांडार समृद्ध केलें.

त्यानंतर हरिहररायांना 'श्रीमद्राजाधिराज' राजपरमेश्वर, 'अप्रतिम प्रतापवीर नरपति' ही विरुदावली अर्पण करून श्री. विरूपाक्ष हीं अक्षरें कोरलेलीं हिऱ्यांची अंगठी साशीर्वाद भेट दिली.

हें झाल्यावर शृंगेरी येथील श्री विद्याशंकर, श्री शारदाचंद्र मौलीश्वर स्वामींच्या सेवेसाठीं व छत्रधर्मासाठीं अग्रहार इनाम करवून दिलें. त्याबरोबरच ब्राह्मणांना व अग्रहाराला तीस हजार वराई स्वास्थ्य नेमून दिलें. वराई हें सोन्याचें नाणें (होन). हें नाणें विजय-नगरांत चालू होतें. शके १२६३ विक्रमनाम संवत्सरे यावर्षी श्री. विद्याशंकर देवालय बांधण्यांत आलें. हें काम सुप्रसिद्ध शिल्पकार जक्कणाचार्य यांच्या मुलाकडून करविण्यांत आलें. त्याच शिल्पकारानें शृंगेरी, बेल्हर व हळेबीडु या तीन स्थळीं देवालयें बांधून दिलीं.

## ७ महामंत्री श्रीमन्माधवाचार्य

पराशर माधव या ग्रंथांत माधवाचार्यांचा उल्लेख केला आहे तो असाः—

**इंद्रस्याङ्गिरसो बलस्य सुमतिः शैव्यस्य मेधातिथिः**
**धौम्यो धर्मसुतस्य वैन्यनृपतेः स्वौजा निमेः गौतमिः**
**प्रत्यग्दृष्टिररुन्धतीसहचरो रामस्य पुण्यात्मनो**
**यद्वत्तस्य विभोरभूत् कुलगुरु मन्त्री तथा माधवः॥**

देवराजा इंद्र त्याला गुरु बृहस्पति, बळी राजाचा गुरु सुमति, हरिश्चंद्राचा मेघातिथि, धर्मराजाचा धौम्य महर्षि, धर्मसुत वैन्यराजाचा स्वौजा, निमीचा शतानंद ( गौतमि ), रामाचा अरुंधतीपति वशिष्ठ हे कुलगुरु ज्या त्या राजाला योग्य सल्ला देऊन यश मिळवून देत त्याप्रमाणें विजयनगरच्या हरिहर भूपालाचा माधव हा कुलगुरु आणि मंत्री आहे.

या श्लोकांत माधवाचार्यांचें किती महत्त्व होतें हें तर सांगितलेंच आहे पण राजालाही गुरूचें महत्त्व फार असतें. हें सांगितलें आहे. गुरूच राजाला मार्गदर्शन करितो तो केवळ सल्लामसलत देतो किंवा मंत्रतंत्रांनींच साहाय्य करितो असें नाहीं. द्रोणाचार्य हे कौरवपांडवांचे गुरु होते. त्यांनीं त्याप्रमाणें त्यांचे चिरंजीव अश्वत्थामा, तसेंच कृपाचार्य यांनीं ब्राह्मण असूनही प्रसंगीं क्षात्रतेज प्रकट केलें व शिष्यांना साहाय्य केलें.

राज्य चालविण्यांत वा त्याचें रक्षण करण्याचे कामीं क्षत्रियांना

विशेष महत्त्व आहे ही गोष्ट कोणीही मान्य करील आणि म्हणूनच क्षत्रियांनीं राजेपण सांभाळावें असा समाजानें दंडकच पाडला. क्षत्रिय हातांत तलवार घेऊन रणांगणावर उभा राहिला म्हणजे शौर्यानें लढतो, धैर्यानें शत्रूला टक्कर देतो आणि आपलें युद्ध कौशल्य पणास लावून विजयश्रीनें विभूषित होऊनच परततो ! त्याला अपयश घेऊन परततां येतच नाहीं. त्यापेक्षां लढतां लढतां तो रणांगणावर देहविसर्जन करून स्वर्गाला जातो !

युद्धकला आणि पराक्रम या त्यालाच प्राप्त झालेल्या ईश्वरी देणग्या असतात आणि यांत तो श्रेष्ठत्व मिळवितो; पण राजकारण हा विषय जरा वेगळाच पडतो. तो त्याच्या ब्राह्मण मंत्र्यावर सोंपविणें हेंच त्याला हिताचें वाटतें. असा फार प्राचीन काळापासूनचा अनुभव आहे. वरच्या श्लोकांत दिलेलीं सारीं उदाहरणें हाच त्याचा पुरावा, असा हा इतिहास निदान आम्हां आर्यांचा इतिहास आहे.

माधवाचार्य हे विजयनगरचे पहिले पंत अमात्य म्हणजे मुख्य प्रधान. राजा हरिहरचा त्यांच्यावर संपूर्ण विश्वास होता. त्यांना विचारल्याशिवाय तो कोणतीच गोष्ट करीत नसे. त्यांची पहिली भेट झाली तेव्हांच हरिहरनें निश्चय केला तो शेवटपर्यंत पाळलाही त्यामुळें ते दोघे वशिष्ट-श्रीरामाचा जणूं अवतार असे शोभले.

योगीश्वर याज्ञवल्क्य यांनीं शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे कीं, ‘ब्रह्मणो हि क्षत्रं जायतें–’ याचा अर्थ असा कीं, तेजस्वी ब्राह्मणच शूर व पराक्रमी क्षत्रिय उत्पन्न करूं शकतो. ब्राह्मण ही तेजस्वी क्षात्रवीर निर्माण करण्याची मायकूस आहे.

विजयनगरची स्थापना झाली. हरिहर भूपाल झाला. यापुढें हा राज्यशकट कसा हांकावा याविषयीं त्या दोघांत वाटाघाटी चालत.

आपल्या राज्याची सत्ता बळकट कशी होईल, आपलें सामर्थ्य कसें वाढेल याचा सतत खल करून उभयतांच्या विचारें ठरेल त्या मार्गानें ते प्रयत्न करीत असत, पण प्रत्येक गोष्ट दोघांच्या विचारानेंच घडत होती.

या वेळची परिस्थिती थोडी चमत्कारिकच होती. दक्षिण भारतांत हिंदूंचें स्वतंत्र सत्ता असलेलें एकही राज्य नव्हतें. जीं कांहीं वरवर हिंदूचीं दिसणारीं राज्ये होतीं. ती सारीं मुसलमानी सत्तेचे दासच अशीं होतीं. बादशाहाच्या केवळ कृपेवरच त्यांचें अस्तित्व आधारलेलें होतें नांवाला मात्र ते बादशाही मांडलिक राजे म्हणवीत होतें. आजूबाजूला इस्लामी सत्ता रूढ होऊन आपला देश लुबाडला जात होता, कोणाही हिंदूचें जीवित सुरक्षित नव्हतें, लुटालूट, कत्तल स्त्रियांची पळवापळव व विटंबना हाच कार्यक्रम प्रत्यहीं सगळीकडे चाललेला दिसत होता. राज्यसत्ताच या गोष्टी घडवीत होती, यामुळें हिंदू जनता आंतून चिडलेली होती, संतापलेली होती आणि त्या संतापाचा कधीं स्फोट होईल याचा नियमच नव्हता.

याची जाणीव माधवाचार्यांना अगदीं बरोबर सोळा आणे होती. हिंदू जनतेच्या या मनोवृत्तीचा बरोबर फायदा करून घ्यावयाचें त्यांनीं ठरविलें. देशांतील असंख्य सैनिक हिंदू-राज्यें नष्ट झाल्यामुळें बेकार होऊन भटकत होते. त्या साऱ्यांना आश्रय देऊन त्यांची सैन्यांत नवीन भरती करून, खूप मोठी सेना त्यांनी तयार केली. तिला योग्य शिक्षण देण्याचा आणि योग्य वळण लावून त्यांच्या शक्तीचा विधायक कामाकडे उपयोग करून घेण्याचा कार्यक्रम त्यांनींच आयोजित केला.

राजाचे हेर देशीं आणि विदेशीं पाठवून परिस्थितीचा कानोसा घेऊन त्याला अनुसरून आपलें धोरण ठरविण्याची त्यांनीं प्रथा

सुरू केली. वारंगळ, अनेगोंदी, देवगिरी, पांड्य, चोल वगैरे देशांतील मुसलमानी सत्तांमुळें पदभ्रष्ट झालेले सरदार, सुभेदार जहागिरदार, इतर वजनदार लोक यांच्या जवळ एकनिष्ठ दूतांकरवीं संधीन बांधून आपल्या राज्यांत येऊन राहण्यास त्यांनीं त्यांस उत्तेजन दिलें.

हिंदूंना संघटण केल्याशिवाय तरणोपाय नाहीं, एक झाल्याशिवाय त्यांचा धर्म आणि देश यापुढें अस्तित्वांत राहाणे कठीण याची जाणीव करून ती त्यांना पटवून देणें जरूरच होतें; हें महत्त्वाचें कार्य त्यांनीं केलें. आपसांतील द्वेष, तेढ, मत्सर, चुरस हीं सारीं टाकून देऊन हिंदुधर्माच्या रक्षणार्थ, हिंदुसमाजाच्या उद्धारार्थ–आपल्या स्त्रियांच्या अब्रूच्या रक्षणार्थ, एक होण्याचा जणू महामृत्युंजय असा मंत्रच त्यांनीं सर्वांना गुप्तपणें उपदेशिला.

या कामीं हरिहर व माधवाचार्य यांना मोठी मदत झाली ती शृंगेरी पीठाचे आचार्य श्री. विद्यातीर्थ आणि भारती तीर्थ स्वामी यांचीच. दक्षिणेंतील देशांवर, तेथील जनतेवर त्यांचें फार मोठें वजन होतें. त्याचा या वेळीं हरिहराला फार उपयोग झाला. माधवाचार्यांमार्फत श्री. स्वामी वेळोवेळीं राजाला योग्य मार्गदर्शन करीत. तो प्रसंगच तसा नाजूक पण आणीबाणीचा होता. धर्मावर–हिंदुधर्मावर भयंकर संकट गुदरलें होतें. तो जगतो कीं, यावनी आक्रमणाला बळी पडतो याचीच भ्रांत उत्पन्न झाली होती. यामुळें हरिहराला हाताशीं धरून हें संकट टाळण्याचा प्रयत्न सुरू झाला. यासाठीं पीठाकडून लागेल ती मदत देण्याचें त्याला आश्वासन मिळालें, इतकेंच नाहींतर प्रसंगविशेषीं पीठाची संपत्तीही त्याचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं खर्ची पडूं लागली. याप्रमाणें हरिहराला सर्व बाजूंनीं मदत मिळूं लागून त्याचें कार्य दिवसेंदिवस जोरानें चालू झालें.

त्याचे मार्ग सुलभ झाले. उदयोन्मुख विजयनगराला मिळालेला पीठाचा पाठिंबा मोठा परिणामकारक ठरला. या साऱ्या गोष्टी गुप्तपणेंच चालत. माधवाचार्य हे जणूं राजा व त्याचे साहाय्यकर्ते यांच्या मधला दुवाच होते म्हणा ना!

कर्नाटकांतील विजयनगरचें नवें सिंहासन स्थापन करण्याचा पाहिला मान माधवाचार्यांना मिळाला यामुळें लोक त्यांना "कर्नाटक सिंहासन स्थापनाचार्य" या बहुमानानें गौरवपूर्वक संबोधूं लागले. नुसते राज्यमंत्रीच नव्हे पण राजाचे कुलगुरु होण्याचा मानही त्यांना मिळाला. याप्रमाणें माधवाचार्य हे कर्नाटक सिंहासन स्थापनाचार्य, राजगुरु व विजयनगरराज्याचे महाप्रधान या नात्यानें सर्व मान्य झालें.

## ८ माधवाचार्यांचा पूर्ववृत्तांन्त

शृंगेरी येथील मठ आणि पीठ हीं आद्य श्री शंकराचार्यांनींच स्थापन केलीं होतीं. त्या पीठांतील आसनावर विद्वान संन्याशी अधिष्ठित होऊन धर्मप्रसाराचें कार्य करीत असत. मठस्थापने-पासून आज तागायत ही परंपरा चालू होती. त्यांत कधींच खंड पडला नाहीं. याचें कारण दक्षिणेंतल्या हिंदूराजांनीं धर्मनिष्ठेनें त्यांचा परामर्श घेण्याचें काम अव्याहत चालू ठेविलें होतें. आजू-बाजूच्या हिंदू जनतेला मार्गदर्शन करणें, शिक्षणाची सोय मठांतच लावणें, स्वतः विद्यादानादि पुण्यकर्मं अविरत करीत राहणें, हीं कार्यें या पीठाकडून चालत आणि त्यासाठींच तर त्या पीठांची स्थापना झाली होती.

त्याच मठांत राहणारा ब्रह्मचारी माधवाचार्य शृंगेरीहून निघाला आणि आनेगोंदीला काय चाललें आहे हें पहाण्यासाठीं तुंगभद्रेच्या कांठानें चालला असतां त्याच्या मनांत पुढील विचार चालले होते! दक्षिणेंतील बहुतेक हिंदुराज्यें नष्ट झालीं. हिंदुराज्यांवरच नव्हे तर आपल्या सनातन धर्मावर फार भयंकर संकट आलें आहे. आपले मठ, देवळें आणि धर्म यांचें अस्तित्व कांहीं झालें तरी आपला देश हिंदुराजांच्या राजवटींत असण्यावरच आहे. सारा दक्षिण हिंदुस्तान मुसलमानी अमलाखालीं गेला याचा सरळ अर्थ, सारा दक्षिण भारत मुसलमान झाला, आज झाला नसला तरी उद्यां तो होणार; आपखुपीनें झाला नाही तर जबरीनें केला जाणार. आपल्या

प्राणाहून प्रिय अशा या मठाचे जागीं मोठी मशीद उभारली जाऊन तेथें आचार्यांऐवजीं कोणा मुल्लाची प्रतिष्ठापना केली जाणार आणि मग आज ऐकू येणाऱ्या वेदमंत्रांच्या घोषाऐवजीं तेथें बांग पुकारला जाणार ! केवढें घोर संकट येत आहे हें ! छे ! यावेळीं आपण कांहीं तरी जोरदार प्रयत्न करून हें संकट टाळलेंच पाहिजे ! ”

इकडे येण्यापूर्वी आपण भुवनेश्वरी देवीजवळ हें संकट नाहींसें करण्यासाठीं तपश्चर्या करावी असें त्यानें ठरविलें आणि श्री भुवनेश्वरीच्या देवळांत समाधि लावून बसला. त्याच्या उत्कट प्रार्थनेनें आणि एकनिष्ठ भक्तीनें देवी प्रसन्न होऊन त्याला म्हणाली, “ तपस्वी ब्राह्मणा, तूं या जन्मीं धनवान होण्याचा योग नाहीं. लक्ष्मीदेवी तुझ्या गत पापांमुळें तुझ्यावर रुष्ट झाली आहे. पण तूं ज्याला हातीं धरून सिंहासनावर बसवशील तो पुरुष राजैश्वर्य खचित भोगील असा मी तुला वर देतें ! ”

माधवाचार्य आपण दरिद्रीच राहणार या देवीच्या सांगण्यानें थोडे खिन्नच झाले पण आपण एकाद्या पात्र पुरुषाला राजा करून त्याचेकडून आपल्या धर्मावर येऊं घातलेलें, अगदीं दाराशीं येऊन ठेपलेलें संकट दूर करूं शकूं या विचारानें त्याला थोडें समाधान वाटलें. तसा प्रयत्न करण्याच्या विचारानेंच तो आज या रस्त्यानें चालला होता.

होयसळांनीं उत्तर सीमेचें रक्षण करण्यासाठी महामंडलेश्वर या हुद्दयावर नेमलेला, आनेगोंदीचा माजी प्रधान हरिहर हाच या कामाला लायक आहे. असें विचार करून त्यांनीं ठरविलें आणि त्याला भेटण्याच्या उद्देशानेंच ते नदीकांठानें चालले होते. पुढील वृत्तांत आपण वाचलाच आहे.

देवीच्या पुढें तप करणारा, राज्य मिळवून देऊं शकणारा हा ब्रह्मचारी माधव कोण आणि कोठला याची माहिती मिळवूं या

तुंगभद्रा नदीच्या कांठीं किष्किंधा ऊर्फ हंपी क्षेत्राजवळच्या अनेगोंदी या छोट्याशा गांवांत मायण नांवाचे एक गरीब ब्राह्मण राहात होते. त्यांच्या पत्नीचें नांव होतें श्रीमती. त्यांना तीन मुलगे झाले. त्यांचीं नांवें त्यांनीं माधव, सायण आणि सोमनाथ अशीं ठेविलीं होतीं. सोमनाथ हा धाकटा भाऊ; याला भोगनाथ असेंही म्हणत. हे कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय शाखेचे तेलगू ब्राह्मण. त्यांचें गोत्र भारद्वाज व सूत्र बोधायन असें होतें. ते मूळचे आंध्र प्रांतांत राहाणारे. माधवाचार्य मंत्री पदावर असतांना पराशरस्मृति व्याख्या हा ग्रंथ त्यांनीं रचिला. त्याचे आरंभींच त्यांनीं स्वतः विषयीं वरील बहुतेक माहिती दिली आहे. माधवाचार्यांचा जन्म शके १२१७ इ. स. १२९५ यावर्षी झाला. पराशर माधव ग्रंथांत ते म्हणतात.

**श्रीमती जननी यस्य सुकीर्तिर्मायणः पिता ।**
**सायणः सोमनाथश्च मनोबुद्धी सहोदरौ**
**यस्य बोधायनंसूत्रं शाखा यस्यच याजुषी**
**भारद्वाजकुलं यस्य सर्वज्ञः स हि माधवः**

नेल्लूर येथील एका शासन पत्रांत वरील माहितीला पुष्टी देणारीं पुढील वाक्यें आढळतात :—

स्वस्तिश्री ।: श्रीमाई जननी पिता तव मुनि बोधायनो मायणो । ज्येष्ठो मायण...भूष्णुरनुजः श्री भोगनाथः कविः ।

भोगनाथ तथा सोमनाथ हा मोठा कवि होता अशी माहिती यावरून मिळते. सायणाचार्यांनींही आपल्या ग्रंथांत तसा उल्लेख केलेला आढळतो, बिटूगुंट येथील शासनांत पुढील मजकूर आढळतो. " इति भोगनाथ सुधिया संगमभूपालनर्मसचिवेन श्रीकंठपुर समृद्ध्यै शासन पत्रेषु विलिखिताः श्लोकाः " यावरून हा संगम भूपालाचा विनोदमंत्री असून मोठा बुद्धिमान होता. श्रीकंठ-

पूरच्या समृद्धीसाठीं त्यानें शासन पत्रां ( आज्ञा पत्रां ) त श्लोक लिहिले असें आपणांस कळून येतें. हा मोठा विरक्त होता. आपल्या मोठ्या भावा अगोदरच म्हणजे माधवाचार्यांचे अगोदरच यानें संन्यासाश्रमांत प्रवेश केला. संन्यासाश्रमांतलें याचें नांव भारतीतीर्थ असें होतें.

याशिवाय मायणांना एक कन्या पण असावी असें दिसतें. तिचें नांव सिंगला असें असून ती रामरस यांस दिली होती. तिच्या पोटीं लक्ष्मीधर देव या नांवाचा एक मुलगा झाला. याशिवाय माधवांना आणखी एक भाचा होता असा उल्लेख सांपडतो. त्याचें नांव अहोबल पंडित असें होतें. हा सिंगलेचा मुलगा कीं, दुसऱ्या एकाद्या अज्ञात बहिणीचा मुलगा हें ठरविण्याइतका पुरावा कोठें मिळत नाहीं.

तो संस्कृत व तेलगू या दोन्ही भाषांचा जाडा पंडित समजला जात असे. त्यानें तेलगू भाषेचें एक मोठें व्याकरण लिहिलें आहे मात्र तें व्याकरण संस्कृत भाषेंत लिहिलें आहे. या व्याकरण ग्रंथांत त्यानें माधवाचार्यांचे धाकटे बंधु सायणाचार्य यांनीं लिहिलेल्या धातुवृत्तिसुधानिधि या ग्रंथाचा मोठ्या आदरानें उल्लेख केला आहे.

हा अहोबलपंडित तेलगू म्हणजे आंध्रपंडित असावा असें त्याच्या वरील ग्रंथावरून अनुमान करितां येतें आणि यावरून माधवादि त्याचे मामा आंध्र असावे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. माधवाचार्यांचे धाकटे बंधु सायणाचार्य हे एका ठिकाणीं आपला उल्लेख “ अस्माकमांध्राणाम् ” असा करून आपण आंध्रप्रांतीय असल्याचें स्पष्ट करितात. सायण्णा हें नांवही तेलगूच आहे यावरून “ मायण ” हे मूळचे कर्नाटकांतले नसून आंध्र प्रांतांतले तेलगू असावेत.

या कुटुंबाला दारिद्र्यांतच दिवस काढावे लागले. अर्थात माधवाचार्य यांचें बालपण फार गरिबींत गेलें. त्या दारिद्र्याला कंटाळूनच त्यांनीं भुवनेश्वरीपुढें उग्र तपश्चर्या केली. दीर्घ तपश्चर्येनंतर देवी प्रकट झाली पण तिनें द्रव्याचें बाबतींत त्यांची संपूर्ण निराशा केली ! "या जन्मीं तुझ्या नशिबांत संपत्ति नाहीं" असें तिनें त्यांना स्पष्टपणें बजाविलें !

पण या आपत्तीमुळें विद्या संपादन करण्यांत या तिन्ही भावंडांनीं बिलकुल अडथळा येऊं दिला नाहीं. उलट दारिद्र्यामुळें आलेला कमीपणा विद्वत्ता संपादन करून भरून काढावा व मोठेपण मिळवावें असा त्यांनीं निश्चय केला आणि तो कृतींतही उतरविला. बरींचशीं थोर माणसें लहानपणीं दारिद्र्यांतच खितपत पडलेलीं आढळतात. दारिद्र्य हें जणूं त्यांना कसास लावूनच पहात असतें. त्या कसोटीस उतरूनच त्यांना मोठेपण प्राप्त होतें ! मायणाचे तिन्ही मुलगे या कसोटीला चांगलेच उतरले !

हे तिघेही बंधु वेदशास्त्रादि सर्व विद्यांत पारंगत झाले, ग्रंथरचना करूं लागले आणि विद्वानांच्या सभांतून चर्चा चाले त्यांत भाग घेऊं लागले; इतकेंच नव्हे तर या सभांत विजयी होऊन नांव मिळवूं लागले. त्यांची विद्वत्ता पाहून पंडित माना डोलवूं लागले ! शंकराचार्यांनीं आपल्या अल्प आयुष्यांत केवढी प्रचंड ग्रंथरचना करून ठेविली हें त्यांनीं पाहिलें. त्यांचेंच अनुकरण शक्य तितकें आपणही करावें असें मनोमन ठरवून निश्चयानेंच ते त्या मार्गाला लागले.

यांचें सारें शिक्षण शृंगेरी येथील मठांतच झालें. पूर्वी विद्या शिकण्यासाठीं विद्यार्थ्यांना गुरुगृहीं अगर मठांत जाऊन रहावें लागे. अर्थात असे विद्या शिकविणारे मठही विद्वान् गुरूंनींच चालविलेले असत. त्यांना राजाश्रय असे अगर अशा मठा साठीं अग्रहार

म्हणून राजांकडून कित्येक गांवें दिलेलीं असत. त्या गांवाच्या उत्पन्नावर असे मठ चालत. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठीं गुरुसेवे-शिवाय कांहीं द्यावें लागत नसे. त्यांच्या खाण्या-पिण्याची सारी सोय मठांत करीत असत.

माधवाचार्य आणि त्यांचे बंधु यांचें प्राथमिक शिक्षण कोठें झालें या विषयी कांहींही माहिती उपलब्ध नाहीं. पण वेदाध्ययन आणि शास्त्राध्ययन हें कोणत्या गुरूकडे झालें व कोठे झालें याविषयीं त्यांच्या ग्रंथांत वा अन्य स्थळीं त्याचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांना भाष्यकार आणि ग्रंथकार अशा मोठ्या योग्यतेला चढतां आलें इतकें उच्च शिक्षण देणारे मुख्य गुरु शृंगेरीचे विद्यातीर्थ हे होत. या शिवाय भारती तीर्थ, शंकरानंद यति आणि श्रीकंठ यांनीं या बंधुत्रयाला शिक्षण देण्याचे कामीं हातभार लावलेला दिसतो. त्या थोर गुरुदेवांची थोडी फार माहिती करून घेणें आवश्यकच आहे एरवीं त्यांच्या शिष्यांना मिळालेलें शिक्षण व प्राप्त झालेलें थोरपण याची पूर्ण कल्पना येणें शक्य नाहीं. यासाठीं त्या गुरुदेवांची माहिती करून घेऊं.

मोठ्या आदरानेंच केला आहे. गुरुर्देवो महेश्वरः हें वचन माधवाचार्यांच्या अंतःकरणाला बरोबर पटलें होतें तें या गुरूमुळें!

अनुभूति-प्रकाश या ग्रंथांत माधवाचार्य म्हणतातः—

**अंतः प्रविष्टः शास्तेति अंतर्यामिश्रुतीरितः**
**सोऽस्मान् मुख्यगुरुः पातु विद्यातीर्थ महेश्वरः**

जीवन्मुक्ति विवेक या ग्रंथांतही त्यांनीं आपल्या गुरूचा मोठ्या आदरानेंच उल्लेख केला आहे. हा पहा त्यांचा तो श्लोक,

**जीवन्मुक्ति विवेकेन तमोहार्दं निवारयन्**
**पुमर्थमखिलं देयात् विद्यातीर्थ महेश्वरः**

सर्व दर्शनसंग्रह या ग्रंथात आपल्या गुरूंचा उल्लेख कसा केला आहे पहा.

**पारंगतं सकल दर्शन सागराणाम्**
**आत्मोचितार्थचरितार्थित-सर्व लोकम्**
**श्रीशाङ्गर्पाणि तनयं निखिलागमज्ञम्**
**सर्वज्ञविष्णुगुरुमन्वहमाश्रये ऽ हम् ॥**

या श्लोकांत गुरूचा उल्लेख विद्यातीर्थ या नांवानें न करितां पूर्वाश्रमींच्या सर्वज्ञ विष्णु या नांवानें केला आहे. पूर्वाश्रमांतही त्यांचा परिचय असून त्यांच्याविषयीं माधवाचार्यांच्या मनांत पूज्यबुद्धि होती असें अनुमान कोणीं काढलें तर त्यांत कांहीं चुकलेंसें होणार नाहीं.

जैमिनीय न्यायमाला विस्तार या आपल्या ग्रंथा तही माधवाचार्यांनीं आपल्या गुरूचें सादर स्मरण केलें आहे. ते पहा काय म्हणतातः—

**प्रणम्य परमात्मानं श्रीविद्यातीर्थरूपिणम्**
**जैमिनीय न्यायमाला श्लोकैः संगृह्यते स्फुटम् ।**

माधवाचार्यांचे अनुज सायण हेही ह्या विद्यातीर्थांचे शिष्य होते. त्यांनींही आपल्या ग्रंथांत त्यांचा मोठ्या आदरानेंच उल्लेख केलेला आढळतो. ऋग्वेद भाष्यारंभीं ते आपल्या गुरूंना या प्रकारें वंदन करितात.

**" यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत्**
**निर्ममे तमहंवन्दे विद्यातीर्थं महेश्वरम्**

इतकेंच नाहींतर प्रत्येक अष्टकाचे शेवटीं तो ग्रंथ त्या गुरुदेवाला त्यांनीं समर्पण केला आहे.

याप्रकारें दोघांही बंधूंनीं आपल्या गुरूबद्दल ठिकठिकाणीं आदर-व्यक्त करून आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावलें आहे यांत शंकाच नाहीं.

एवढ्यावरच न थांबतां आपल्या गुरूदेवांच्या पश्चात् विजय-नगरच्या राजाकडून सांपत्तिक साहाय्य मिळवून शिल्पकलेंतील विविध सौंदर्यानें नटलेलें मंदिर शृंगेरी येथें बांधविलें आणि त्या मंदिरांत गुरुदेवांची ' विद्याशंकर ' नांवाची सुंदर शिवलिंग स्थापना करून आपल्या परमपूज्य गुरुमाऊलीचें स्मरण जगालाही कायमचें होत राहील अशी त्या ठिकाणीं सर्व व्यवस्था करून ठेवली आहे. हें मंदिर साध्यासुध्या शिल्पकारानें बांधलें नसून त्या काळीं शिल्पकलाशास्त्रांत नांवाजलेल्या जक्कणाचार्यांकडून बांधविण्यांत आलें. त्याचें शिल्पसौंदर्य काय वर्णावें ? कलाकुसर अत्यंत सुंदर अतएव मनोहर आहे पण तें अप्रतिम सौंदर्य आणि मनोहारित्व वर्णन करायचें सामर्थ्य शब्दांत कोठून येणार ? आजही प्रेक्षकांना तें सौंदर्य आपल्या दिव्यत्वानें मोहून टाकीत आहे. आपल्यालाही हा आनंद उपभोगितां येईल पण त्यासाठीं शृंगेरीला जाऊन प्रत्यक्ष दर्शन घेतलें पाहिजे. आपल्या गुरूंच्या ठायीं माधवाचार्यांची नव्हे

विद्यारण्यांची केवढी अढळ निष्ठा होती! त्या निष्ठेमुळेंच असलें अप्रतिम स्मारक त्यांना करितां आलें!

## २ भारतीयतीर्थ

विद्यातीर्थ हे इ. स. १३५६ नंतर लवकरच ब्रह्मीभूत झाले. त्यांच्यानंतर भारतीतीर्थ हे धर्मपीठाधिष्ठित झाले. हें भारतीतीर्थ याच विद्यातीर्थ सरस्वती यांच्या आठ प्रमुख शिष्यांपैकीं एक होते. ते शृंगेरी मठांत राहून आपल्या गुरूंची सेवा करीत ज्ञानार्जन करीत होते. त्यांच्याजवळ माधवाचार्य च त्यांचे बंधु यांचें शिक्षण झालें. हे भारतीतीर्थही मोठे जाडे विद्वान होते. सर्व शाखांत ते पारंगत होते. प्राचीन वेदविद्याविशारद होते. या भारतीतीर्थांना अद्वैत ब्रह्मानंद असें दुसरें नांव मिळालेलें दिसतें. विद्यातीर्थांचे आणखी एक शिष्य शंकरानंद यति हेही आठ प्रमुख शिष्यांपैकींच होते. त्यांनीं लिहिलेल्या बृहदारण्य कोपनिषद्दीपिकेवरून आपणाला त्यांची माहिती कळून येते. प्रारंभींच्या श्लोकांतच ते म्हणतात।:—

काञ्चीपीठजुषः कठोर धिषणा निर्धूत दुर्धूर्वहत् :—
द्वैतिव्रात दुराग्रहभयान् मायाविदूराक्रियान्
आचार्यान् मम चंद्रमौलिचरणध्यानैकतानाशायान्
विद्यातीर्थमहेश्वरान् हृदि सदाःविद्योतमानान् भजें ॥ १ ॥
सच्छात्रत्वेऽपि साक्षाद्गुरव इव दयामेदुराये पुनर्माम्
गूढेष्वर्थेषु गाढं विवरणसरणेश्चक्रुरात्तप्रवेशम्
भारत्यानन्दतीर्थापर विरुदवहान द्वयब्रह्मसौख्यान्
बुद्धान् सिद्धान् प्रबुद्धानपि हृदि सततं भावये ब्रह्म-
भूतान् ॥ २ ॥

**द्वैतध्वान्तनिकुन्तनाहरधिपैः शिष्यैर्विशिष्याष्टभि**
**र्विष्टभ्याद्वय विष्टराष्टकमितः श्री माधवाद्यै र्बुधैः**
**स्पष्टं यो व्यदधिष्ट शिष्ट परिषत्स्व द्वैतमेवाद्वय**
**ब्रह्मानंद मुनीश्वरं तमनघं वन्दे विरूपाक्षगम् ॥ ३ ॥**

या उताऱ्याचा सारांश असा कीं, अत्यंत दुराग्रही द्वैतवाद्यांस आपल्या बुद्धिप्रभावानें पराजित करणारे आणि चंद्रमौलीश्वराच्या चरणाचें एकतानतेनें ध्यान करणारे आणि तेजःपुंज असे काञ्ची-पीठाधीश्वर गुरुवर्य महेश्वररूपी विद्यातीर्थ यांचें मी सदैव भजन करितों. भारतीतीर्थ तर माझे सतीर्थ्य साध्यायी ( गुरु असून सहाध्यायी ) असें असतां साक्षात् गुरूप्रमाणें ते मजवर दया करीत, ब्रह्मविद्येच्या गूढ रहस्यांत त्यांनींच मला निष्णात केलें आणि विवरण सरणींत माझा प्रवेश करून दिला. अद्वय ब्रह्मानंद हें त्यांचें दुसरें नांव आहे. त्या ज्ञानवृद्ध वयोवृद्ध ब्रह्मस्वरूपी सिद्धभारत्यानंदतीर्थांचें ध्यान मी अंतःकरणांत नित्यशः करीत असतों. या निष्पाप विरूपाक्ष स्वरूपी ब्रह्मानंद मुनीश्वरांनीं माधवाचार्यांसारखे विद्वान आणि द्वैतान्धकारविनाशाविषयीं सूर्यासारखे तेजस्वी आठ शिष्य बरोबर घेऊन आठ अद्वैत सांप्रदायी मठ स्थापून द्वैतमताचा उच्छेद केला. आणि शिक्षित समाजाला अद्वैत सिद्धान्त मानवेल—रुचेल आणि पचेल, असें केलें. या मुनिवर्यांच्या स्तुतींतच त्यांच्या ब्रह्मनिष्ठेला प्राधान्य दिलेलें आहे.

वर लिहिल्याप्रमाणें माधवाचार्यांनीं गुर्वाज्ञेनें दुर्मताचे निरसनार्थ आठ ठिकाणीं आठ मठ कर्नाटक देशांत स्थापिले. कारण त्या वेळीं शंकराचार्यांनीं स्थापिलेला श्रृंगेरी मठ लिंगायतांचे प्राबल्यामुळें दुर्बल झाला होता. त्याचा उद्धार विद्यारण्यांनीं करून प्रबल मुसल-मानी सत्तेचे निवारणार्थ हरिहर व बुक्क राजांकडून विजयनगरचें

साम्राज्य स्थापिलें. यास्तव कर्नाटक सिंहासन स्थापनाचार्य हें बिरुद श्रृंगेरी मठाधिपति विद्यारण्य मुनींना प्राप्त झालें. तें आज तागायत त्यांच्या मायन्यांत व चोपदरांचे मुखांतून प्रत्यहीं ऐकावयास मिळत आहे. श्रृंगेरी मठाचे मुद्रेंत विद्याशंकर हें पद आहे तें विद्यातीर्थ आणि शंकरानंद या गुरुद्वयाच्या नांवांतील पूर्वार्ध मिळून झालें—बनविलें—आहे.

याशिवाय उपनिषद् समुच्चयदीपिकेच्या शेवटीं शंकरानंदानीं म्हटलें आहे, "श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य आनंदात्म पूज्यपाद शिष्य" या वचनांवरूनही आनंदात्म ऊर्फ भारतीतीर्थ हे शंकरानंदाचे गुरु होते हें स्पष्ट होतें !

हे भारतीतीर्थ मठाधीश असतांना विद्यातीर्थांप्रमाणेंच विजयनगर राज्याला त्यांनीं सर्व प्रकारें साहाय्य मिळवून दिलें. माधवाचार्य मंत्रिमहाशय असतांनाही त्यांनीं नानाप्रकारें सल्लामसलत देऊन योग्य मार्गदर्शन केलें. शृंगेरी मठाचें सर्वच प्रकारचें साहाय्य विजयनगर राज्याला मिळत होतें आणि तें रास्तच होतें. कारण सारा दक्षिण भारत मुसलमानी अमलाखालीं गेला होता. तेव्हां हिंदुधर्म अर्थात शृंगेरीचा मठही धोक्यांतच होता आणि यामुळेंच त्या धर्मपीठानें सर्व प्रकारचें साहाय्य देऊन हें राज्य बलवान केलें.

माधवाचार्यांनीं पराशर माधव या आपल्या ग्रंथाच्या आरंभींच पुढील श्लोक लिहिला आहे.

**लब्ध्वामाकलयन् प्रभावलहरीं श्री भारतीतीर्थतो ।**
**विद्यातीर्थमुपाश्रयन् हृदि भजे श्रीकंठमव्याहतम् ॥**

या श्लोकांत माधवाचार्यांनीं आपल्या श्री विद्यातीर्थ व भारतींतीर्थ या दोन्ही गुरूंचा तर आदरपूर्वक उल्लेख केलाच आहे पण त्याशिवाय श्रीकंठनाथ याही गुरूंचा उल्लेख केला आहे यावरून

ते पराशर माधव लिहित असतांना विद्यातीर्थांप्रमाणेंच भारतीतीर्थही त्यांना गुरुस्थानीं होते असें दिसतें. तसें कशाला ? हा पुढें उद्‌धृत केलेला श्लोक या विषयीं आपली खात्री करून देईल.

**सर्वेषां तु प्रथम सुखदं भारतीतीर्थमाहुः**
**सद्‌भावान्मे विमलमनसो निर्णये शक्तिरस्ति**

भारतीतीर्थ हे आपले मार्गदर्शक गुरु आहेत हें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे.

या भारतीतीर्थांनीं "वाक्सुधा व वैयासिक न्यायमाला" हे मौल्यवान ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं वैयासिक न्यायमाला हा ग्रंथ ब्रह्मसूत्रांवर लिहिला असून त्यांतील विवेचन सुलभ आणि मनोवेधक आहे. याच भारतीतीर्थांनीं माधवाचार्यांना संन्यासदीक्षा देऊन संन्यासाश्रमांतलें विद्यारण्य हें नांव दिलें. बुक्क भूपाल कैलासवासी झाल्यावर म्हणजे इ. स. १३७६–७७ या वर्षीं माधवाचार्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. हे भारतीतीर्थ इ. स. १३८० सालीं ब्रह्मीभूत झाले आणि त्यांच्यामागून विद्यारण्यच त्या पीठावर अधिष्ठित झाले !

## ३ श्रीकंठस्थान

श्रीकंठनाथ हे माधवाचार्यांचे तिसरे गुरु होत. तिघांही बंधूंना ते गुरुस्थानीं होते. याबाबत माधवाचार्य यांच्या पराशर माधवांतील श्लोक वर दिलाच आहे. याच गोष्टीचा उल्लेख सायणाचार्यांनीं पुढील श्लोकांत केला असून तो श्लोक एपि. इंडिआ याच्या तिसऱ्या खंडांतील पृष्ठ १३८ वर नं. ११९ खालीं दिला आहे. तो श्लोक असा :—

**स्वामी संगमभूपतिः करश्रीकंठनाथो गुरुः**
**भारद्वाज कुलेश सायण गुर्णैस्त्वत्तस्त्वमेवाधिकः**

माधवाचार्यांचे सर्वांत धाकटे बंधु भोगनाथ यांचेही ते गुरु होते याबद्दल अलंकार सुधानिधि या ग्रंथांत पुढील श्लोक आढळतो.

**श्रीकंठश्चगुरुः परोऽपि गुरवो लोकत्रयेप्यद्भुतम्**
**भक्ताधीन भवांश्च दैवतः महो सर्वेप्यमी देवता**

श्री कंठनाथ हे कांची पुरमचे राहणारे शैवमताचे कट्टे अभिमानी आणि प्रचारक होते. शैव पंथाचे नामांकित पंडित अशी त्यांची ख्याति होती. ते कोणत्या कुलांत आणि कोणत्या ठिकाणीं जन्मले, त्यांनीं अध्ययन कोठें आणि कोणत्या गुरूपाशीं केलें याविपयीं फारशी माहिती मिळत नाहीं तरी पण कांचीपुरांत वेदशास्त्रादिकांचे गाढे पंडित आणि तत्त्वज्ञानाचे अधिकारी आचार्य म्हणून विद्वानांच्या सभांतून त्यांना मोठा लौकिक प्राप्त झाला होता. विद्यातीर्थ, भारती तीर्थ, वेदान्तदेशिक व अक्षोभ्यतीर्थ यांचे ते समकालीन होते. पुढें त्यांना उदयगिरीच्या संगमभूपतीचे गुरुदेव होण्याचा अपूर्व मानही मिळाला होता.

शैवमताचे परमश्रेष्ठ रहस्य राजाला समजावून दिलें. त्यांच्या बोधामृतानें परमसंतुष्ट होऊन त्यांना हा मान राजाकडून प्राप्त झाला. इतकेंच नव्हे तर त्यांचें नांव संस्मरणीय करावें म्हणून विटूगुंट या गांवाचें नांव बदलून त्याला श्रीकंठपुर हें नांव देऊन आपल्या वडिलांच्या पारलौकिक कल्याणार्थ बहुश्रुत विद्वान ब्राह्मणांस तो गांव दान देऊन त्याचें दानपत्र करून दिलें, असें पुढील शासन पत्रावरून दिसतें. त्या शासनपत्राचे शेवटीं पुढील मजकूर आहे.

**शाकाब्दे नागशैलद्युमणिपरिमिते दुर्मुखाब्दे तृतीये**
**मासि श्रीसंगमेंद्रो गुरुहित निरतस्संगमे चन्द्रभान्वोः**
**प्रादात् प्रत्यब्दकालेनिजपितुरमरत्त्वाप्तये विटूगुंट**
**ग्रामं त्रिंशान्मिताभ्यः श्रुतिपथनिरताभ्यो महीदेवताभ्यः**

**विद्गुंटमितीह प्रथितापरनामशालिनस्तस्य**
**प्रकट्य तिस्म यमिन्द्रप्रायः श्रीकंठपुरम् इति प्रख्याम्**

एपि. इंडि. खंड ३ पृष्ठ २९

## ४ श्रीशंकरानंद यति

माधवाचार्यांचे चौथे गुरु श्रीशंकरानंदयति हे होत. यांची माहिती पुण्यश्लोक मंजिरी या ग्रंथांतील पुढील श्लोकांवरून कळून येते.

**श्रीमध्यार्जुनबालचंद्रमखिराट् सूनुर्महेशाव्हयः**
**विद्यातीर्थपदान्नियम्य समयेष्वद्वैतमुद्योतयन्**
**अध्यास्त प्रतिकामकोटि शरदो द्वात्रिंशतं देहिनाम**
**द्वैतध्वान्तनिवारणो नवमठीनाथो नवश्शंकरः**

यावरून शंकरानंदयतींचें पूर्वाश्रमीचें नांव महेश असून त्यांच्या वडिलांचें नांव बालचंद्र मखिराट असें होतें. त्यांचें जन्मस्थान मध्यार्जुन हें असून विद्यातीर्थ सरस्वती यांजवळ वेदशास्त्रांचा त्यांतल्या त्यांत वेदान्त शास्त्राचा सखोल अभ्यास त्यांनीं केला होता. विद्यातीर्थांचे जे प्रमुख दहा शिष्य होते त्यापैकीं हे एक असून आद्य श्री शंकराचार्यांच्या अद्वैतमताचे ते कट्टे पुरस्कर्ते होते.

विद्यातीर्थ तपश्चर्येसाठीं हिमालयांत गेले होते. कांहीं काल तेथें राहून गुरुसेवा करून गुरुदेवांच्याच आज्ञेनें ते पुन्हा कामकोटि येथें परत आले. तेथील कामकोटीपीठावर आरोहण करून शांकर मताचा देशभर प्रसार करण्यासाठीं यांनीं आटोकाट प्रयत्न केला. त्या वेळीं त्या भागांत माध्वसांप्रदायाचा प्रचार जोरांत चालू होता. त्या प्रसाराला त्यांना तोंड द्यावें लागलें. ती कामगिरी त्यांनीं अत्यंत यशस्वी रीतीनें पार पाडली, आणि जनमतावर अद्वैताची ठसठशीत छाप बसविली.

दा. क्र.

त्या वेळीं शृंगेरी मठाचें वर्चस्व अगदींच ओहोटीस लागलें होतें. त्या मठाचें नांव अन् कीर्ति जेमतेमच टिकून होती. शृंगेरीपेक्षां कामकोटी मठाचें प्राबल्य व लौकिक फार मोठा होता. विद्यातीर्थ, भारतीर्थ, शंकरानंदतीर्थ यांसारखे जाडे विद्वान त्या पीठावर आरूढ होऊन त्या पीठाची कीर्ति आणि मानसन्मान त्यांनींच वाढविला आणि अद्वैत मताचे ते आधारस्तंभ होऊन राहिले होते. या शंकरानंदांनीं आपले गुरु विद्यातीर्थ यांच्या आज्ञेप्रमाणें अद्वैतमतप्रसारार्थ पुण्यगिरी, शिवगंगा, अवनी, संकेश्वर, कोल्हापूर, हंपी, विरुपाक्ष इत्यादि आठ मठांची स्थापना केली. नववा मठ कामकोटीचा. त्या मठाचे ते प्रमुखाचार्य होते. त्यांच्या हाताखालीं त्यांनीं स्थापन केलेले आठही मठ होते म्हणून यांना "नवमठीनाथ" या बिरुदानें उल्लेखिलें जात असे. हे मोठे तपस्वी व विद्वान होते.

यांनीं अनेक वैदिक ग्रंथांवर भाष्यें रचिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं आनंदाश्रमांत छापूनही प्रसिद्ध झालीं. त्यांचीं नांवें (१) ईशावास्यदीपिका (२) केनोपनिषद् दीपिका (३) प्रश्नोपनिषद्दीपिका (४) मांडूक्योपनिषद् दीपिका (५) तैत्तिरियोपनिषद दीपिका (६) बृहदारण्यकोपनिषद् दीपिका. अद्याप छापिलीं नाहींत.

**श्वेताश्वतरोपनिषद् दीपिका, नारायणोपनिषद् दीपिका**

याशिवाय शंकरानंदी नांवाची गीता व्याख्या ही प्रसिद्ध आहे. त्यांचा सर्वांत मोठा ग्रंथ 'अनेकोपनिषद् सारभूत "आत्मपुराण" हा आहे.

पंचदशीच्या आरंभीं पुढील श्लोक आहे. त्यावरून हे शंकरानंद माधवाचार्यांचे गुरु होते हें स्पष्टपणें कळून येतें.

**नमः श्री शंकरानंदगुरुपादांबुजन्मने**
**सविलास महामोहग्राहग्रासैक कर्मणे**

**तत्पादाम्बुरुहद्वन्द्व सेवा निर्मल चेतसाम्**
**सुखबोधाय तत्त्वस्य विवेकोऽयं विधीयते**

त्याचप्रमाणें नृसिंहोत्तरतापनीयोपनिषद् भाष्याच्या शेवटीं शंकरानंद शिष्यश्री विद्यारण्यविरचितम् असा स्पष्ट खुलासा केला आहे. त्यावरून श्री विद्यातीर्थांचे खालोखाल श्री शंकरानंदाविषयीं त्यांचे मनांत गौरव होता असें सिद्ध होतें. "विवरण प्रेमसंग्रह" या त्यांच्या ग्रंथांत पुढील श्लोक आढळतो.

**श्रीशंकरानंद पदं हृदब्जे**
**विभ्राजते तद्यतयो विशन्ति ॥**

यावरून शंकरानंदाविषयीं त्यांच्या मनांत केवढा आदर वसत होता हें स्पष्ट दिसतें. जरी शंकरानंद आणि भारतीतीर्थ यांपासून माधव विद्यारण्यास विद्या प्राप्त झालीं होती तथापि त्यांचें श्रीविद्यातीर्थ मुनींविषयीं अत्यंत प्रेम होतें. या शंकरानदांनींच माधवाचार्यांना विद्यारण्य हें नांव दिलें असें म्हणतात.

अशा थोर ज्ञानी, तत्त्वज्ञान, आत्मज्ञान या विषयांत पारंगत जणू ज्ञानदेवच अशा गुरूजवळ माधवाचार्यांनीं वेदवेदान्ताचें अध्ययन केलें; त्यांचे धाकटे बंधुही त्यांचेच शिष्य होते.

# १० भाग्यशाली हरिहर राय

विजयानगरच्या नव्या राज सिंहासनावर राजा हरिहरराय हे आरूढ झाले. आणि त्यांना माधवाचार्य तथा विद्यारण्य स्वामी यांनीं सिंहासनाधिष्ठित केलें याविषयीं खालीं दिलेला श्लोक एपिग्राफिका इंडिया खंड दुसरा श्रृंगेरीय पृ. ३६२ वर दिला आहे, तो असा :—

**पंपातीरनिवासः श्री विरूपाक्षप्रसादतः**
**तपोबलेन लोकानामनुग्रहविधित्सया**
**निर्माय विद्यानगरं नृपं हरिहराधिपम्**
**गोदेवद्विजरक्षणार्थमभ्यषिंचन्नृपासने ॥**

पंपातीरीं वसणाऱ्या श्री विरूपाक्ष देवाच्या प्रसादाने आणि आपल्या तपोवलानें लोकांवर अनुग्रह ( कृपा ) करण्याच्या इच्छेनें माधवाचार्य यांनीं विद्यानगर उत्पन्न केलें आणि त्या ठिकाणीं राज-सिंहासन स्थापून देव, ब्राह्मण, आणि गोमाता यांच्या रक्षणासाठीं हरिहर नांवाच्या राजाला त्या सिंहासनावर बसवून अभिषेक केला.

यावरून असें दिसतें कीं, माधवाचार्यांनीं पाया घातलेल्या त्या नगरीचें नांव “ विद्यानगर ” असें होतें. आणि तें श्रृंगेरी मठस्थ आचार्यांच्या म्हणजेच विद्यातीर्थ यांच्या साहाय्याचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यासाठीं ठेवलें असावें—त्या वेळीं माधवाचार्य यांना विद्यारण्य हें नांव मिळालेलेंच नव्हतें. तें त्यांनीं संन्यास-दीक्षा घेतली त्या वेळीं म्हणजे विद्यानगर स्थापन केल्यानंतर बऱ्याच

वर्षांनीं मिळालें. पुढील श्लोकांत हें नगर विद्यारण्यांनींच बसविलें असा स्पष्ट खुलासा केला आहे.

**विद्याभिधान नगरी विजयोन्नत शालिनी**
**विद्यारण्यकृता तस्यां राजसिंहासने स्थितः**

हा श्लोक एपि. कर्नाटिका खंड ४ था मुलबागल १५८ ग्रंथाच्या १३५ व्या पानावर दिला आहे. यावरून आपल्याला कळून येतें कीं, विद्या नांवाचें शहर विजयांनीं उन्नतीला पोंचलेलें तें विद्यारण्य स्वामीनीं स्थापन केलें. तेथील राज सिंहासनावर ( हरिहर भूपति ) आरूढ झाले.

विद्यारण्यांनीं नव्हे माधवाचार्यांनीं स्थापन केलेल्या त्या नगरीचें मूळ नांव विद्यानगर हेंच होतें. असें वरील दोन्ही श्लोकांवरून स्पष्ट होतें. पहिला राजा हरिहर याचे कारकर्दीत हें मूळ नांवच रूढ होतें. त्याकाळीं विजयानगर हें नांव विशेष प्रसिद्ध नव्हतें असें दिसतें. पुढें बुक्क राजानें मोठ मोठे विजय मिळविले; पांड्य, चोल वगैरे राजांशीं लढून त्यांना शरण येणें भाग पाडलें; मदुरेच्या तुर्क सुभेदाराचा पराभव करून त्यांचे राज्य जिंकलें या व अशा अनेक विजयांचें स्मारक म्हणूनच या राज धानीला विजयनगर हें नांव देण्यांत आलें असावें; निदान त्यानंतर हें नांव विशेष प्रसिद्धि पावलें आणि लोक व्यवहारांत रूढ झालें.

या नगरीला आणखीही कित्येक नांवें असल्याचें दिसतें. शिला लेखांत आणि शासन पत्रांत या शहराचा उल्लेख आणखी अनेक नांवांनीं केलेला आढळतो. तीं नांवें अशीं:– ( १ ) विद्यानगर ( २ ) विजयनगर ( ३ ) कुंजरकोण ( ४ ) हस्तिनावती ( ५ ) होसपट्टण ( ६ ) विरूपाक्षपट्टण ( ७ ) हंपी (८) आनेगोंदी या आठ

नांवांनीं या शहराचा वेगवेगळ्या ठिकाणीं जरी उल्लेख केलेला आढळत असला तरी विजयनगर हेंच नांव इतिहासांत प्रामुख्यानें उपयोगांत आणलेलें आढळतें.

विद्यानगरची स्थापना होऊन त्या ठिकाणचे अभिषिक्त राजे आपल्या राजवाड्यांत राहूं लागले. त्या वेळीं त्यांच्या आजू बाजूची परिस्थिती अशी होती. आनेगोंदीचें राज्य नष्ट होऊन त्या ठिकाणीं महंमद तघलख बादशहानें नेमलेला सुभेदार मलिक नबी राज्य कारभार चालवीत होता. हिंदु राजघराणें तर नष्टच झालें होतें. मुसलमान सुभेदार अत्यंत क्रूर आणि हिंदुधर्म द्वेष्टा होता त्यानें हिंदूंना त्राहि भगवान करून सोडलें, लोक अत्यंत चिडून गेले. तरी पण त्यांच्यांतलें स्वातंत्र्य प्रेम जागृत होतें; या मुसलमानी अत्याचारांनीं तें उफाळून वर आलें. आणि त्यांनीं सुभेदाराला त्रास देण्याला सुरुवात केली.

माधवाचार्य ही परिस्थिति उघड्या डोळ्यांनीं पहात होते नव्हे त्यांनीं तेथील लोकांना सुभेदाराविरुद्ध–मुसलमानी–अम्लाविरुद्ध–बंड करण्याला सर्व प्रकारें साहाय्य केलें. त्याचा परिणाम होऊन आनेगोंदी राज्यांत बंडाचा वणवा पेटला. लोकांच्या मनांतला राग आणि संताप यांचा स्फोट होऊन लोकांनीं तेथील सुभेदाराला आनेगोंदींत राहणें अशक्य करून टाकलें. वरंगळच्या कृष्णदेवरायानेंही लोकांना पुष्कळ प्रकारें चेतवणी दिली. आपला जीवच धोक्यांत आहे असें पाहून मलिक नबी पळून दौलताबादला गेला ! आणि त्यानें तेथून दिलीस पोबारा केला.

दिल्लीला गेल्यावर त्यानें सारा वृत्तांत बादशाहाला विदित केला. या वेळी बादशहा मोठ्या अडचणींतच होता. उत्तरेकडचाच बंदोबस्त करण्यासाठीं त्याला फौजेची अन् विश्वासू सेनापतींची गरज होती.

यावेळीं दक्षिणेंत सैन्य घेऊन स्वत: जाणें अगर दुसऱ्या पराक्रमी लायक माणसाला पाठविणें त्याला शक्य नव्हतें.

विजयनगरला राजा झालेला हरिहर हा पूर्वी आनेगोंदी राज्यांत मोठा लोकप्रिय दिवाण होता ही गोष्ट बादशहाला माहीत होती. त्यालाच आपला सुभेदार म्हणून आनेगोंदीला नेमावें असें ठरवून त्याप्रमाणें त्यानें हरिहराला आज्ञापत्रही पाठविलें. माधवाचार्यांच्या राजकारणाला असें यश मिळून हरिहर राजाला भविष्यकाळच्या प्रगतीचा हा शुभशकूनच झाला यांत संशय नाहीं. परिणामीं राजा व प्रधान या दोघांनाही पुढील पराक्रम करण्यास विशेषच स्फूर्ति आली.

राज्यस्थापना झाल्यापासून दोन वर्षांनींच म्हणजे इ.स. १३३८ सालीं हरिहरानें दक्षिण कानडा प्रांतावर स्वारी केली. मोठा पराक्रम गाजवीत तो पश्चिम समुद्रापर्यंत मुलूख काबीज करीत गेला.

कर्नाटकांतील बराच मुलूख पहिल्या सपाट्यालाच जिंकून त्यानें आपलें राज्य कलादगीपर्यंत विस्तारलें. तो प्रदेश सुरक्षित राखण्यासाठीं त्यानें बदामीचा किल्ला बांधवून आपल्या एका पराक्रमी सरदाराची तेथें कायमची नेमणूक केली. ही गोष्ट इ. स १३४० चे सुमारास घडली असें इतिहास सांगतो.

इ. स. १३४२ सालीं होनावरच्या जलालुद्दीन नांवाच्या सुभेदारानें हरिहराचें वाढतें सामर्थ्य पाहून त्याच्या विरुद्ध आपण कांहीं करूं शकणार नाहीं अशी खात्री झाल्यानें त्याचें मांडलिकत्व मान्य केलें. यामुळें दक्षिण कानडाचा मंगळूरपर्यंत कोकण विभाग हरिहराचे सत्तेखालीं आला. या लढाईंत हरिहराचा धाकटा भाऊ मारप्पा वडेयर यानें विशेष पराक्रम केला. त्याच्या शौर्यामुळेंच हरिहराला जय मिळत गेले.

वरंगळ येथें त्यावेळीं बादशाही सुभेदार कारभार पहात असे. प्रसंगविशेषीं त्याच्यापासून उपद्रवही होई. हरिहरानें मोठें सैन्य घेऊन वरंगळवर हल्ला चढविला आणि सुभेदाराचा पराभव करून त्यास पिटाळून लाविलें तो अत्यंत महत्त्वाचा मुलूख विजय-नगरच्या राज्याला जोडण्यांत आला.

अशा रीतीनें विजयनगर साम्राज्याचा वृक्ष जोरानें फोफावूं-वाढूं लागला. मदुरेला तुर्की राजा राज्य करीत होता. त्याचें आणि द्वारसमुद्राचा राजा वीर बल्लाळ यांचें वैमनस्य विकोपाला जाऊन त्याचें पर्यवसान मोठ्या भयंकर लढाईंत झालें. वीर बल्लाळदेव मोठें सैन्य घेऊन शत्रूवर चाल करून आला. कृष्णाकांठीं हा एकच मुसलमान सुभेदार अम्मल गाजवीत होता. त्याला घालवून सारा प्रदेश हिंदू राजाच्या अंमलाखालीं आणावा असा वीर बल्लाळाचा उद्देश होता. या कार्यासाठीं वीर बल्लाळानें एक लाख सैन्य तयार केलें होतें. आणि एवढ्या सैन्यानिशीं त्यानें मदुरेवर चाल केली.

मदुरेचा सुभेदार ग्यासुद्दीन यानें तुर्की सैन्याची मोठी जमवा-जमव केली आणि तोही वीर बल्लाळाला तोंड देण्यास सिद्ध झाला. दोन्ही सैन्यांची गांठ त्रिचनापल्लीजवळ पडली. हिंदू सैन्य मोठ्या जोमानें लढलें आणि ग्यासुद्दीनाचा आतां पराभव होणार अशा ऐनवेळीं तुर्की सैन्यानें वीर बल्लाळाला सर्व बाजूंनीं कोंडींत पकडलें आणि अखेरीस त्याला ठार मारलें. राजा लढाईंत पडल्या-मुळें हिंदू सैन्य घाबरलें आणि त्यानें रणांगणांतून पळ काढला. पण तुर्कांनीं त्या पळपुट्या सैन्याची मोठ्या प्रमाणावर सरसहा कत्तल केली. वीर बल्लाळाचा म्हणजेच हिंदूंचा पराजय झाला आणि मदुरेच्या सुभेदाराचा म्हणजेच मुसलमानांचा जय झाला. ही गोष्ट इ. स. १३४२ या वर्षी घडली. पुढें वीर बल्लाळ चौथा हा

गादीवर बसला. त्यानंतर थोड्याच दिवसांत तोही एका लढाईत पडला. या वंशाला पुढें कोणी वारस नाहींसा झाला. अशा रीतीनें होयसळ राजांचें राज्य उघडें पडलें.

राजवंशांत कोणी वारस नाहीं असें पाहून दुसऱ्या अनेक नातेवाईक लोकांनीं आपला हक्क सांगून गादी बळकावण्याचा प्रयत्न केला आणि राज्यांत गोंधळ उडवून दिला. यावेळीं माधवाचार्य आणि विद्यातीर्थ यांची मुत्सद्देगिरी आणि लोकांवरील वजन यांचा विशेष प्रभाव पडून तें राज्य हरिहरासच मिळालें. विजयनगरांतील उत्तम राज्यव्यवस्था पाहून जनतेनें हरिहराचें स्वामित्व मान्य केलें आणि द्वारसमुद्राच्या राज्याचा सारा मुलूख विजयनगरचे अंमलाखालीं आला.

यावेळीं हरिहरानें आपला पराक्रमी भाऊ बुक्क याला द्वारसमुद्र येथें सुभेदार किंवा महामंडलेश्वर म्हणून नेमिलें. त्यानें अनेक बंडखोरांचें पारिपत्य करून त्या राज्यांत शांतता प्रस्थापित केली. राजा हरिहरानें त्याला चांगलेंच साहाय्य दिलें. यामुळें एकामागून एक प्रांत यांना आपल्या नव्या राज्याला म्हणजे विजयनगराला जोडतां आले. या सर्व प्रसंगीं त्यांना तलवार गाजवावी लागली. मुत्सद्देगिरी लढवावी लागली. त्यांच्या मनमिळाऊ वृत्तीनेंही त्यांना पुष्कळ साहाय्य मिळवितां आलें या कामीं माधवाचार्य यांचा ते सतत सल्ला घेत होते.

इ. स. १३४३ मध्यें त्यांना कोलार प्रांत जिंकून राज्यास जोडतां आला. इ. स. १३४४ मध्यें त्यांनीं म्हैसूर आणि अनंतपूर हे भाग जिंकून आपल्या राज्याला जोडले. इ. स. १३४५ सालीं त्यांनीं चित्रदुर्ग प्रांत हस्तगत केला. आणि पुढल्याच वर्षी म्हणजे इ. स. १३४६ सालीं कडूर प्रांत आपल्या राज्यास जोडला. अशा

रीतीनें एकामागून एक प्रांत जिंकून त्यांनीं विजयनगर साम्राज्याचा विस्तार केला, आपल्या पराक्रमानें आजूबाजूच्या राज्यांवर वचक बसविला. या साऱ्या लढायांत हरिहराचा धाकटा भाऊ बुक्क यानें आपली तलवार गाजवून सिंहासनावर आपला भावी हक्क प्रस्थापित केला. यानंतर शिमोगा प्रांतही त्यांनीं जिंकून राज्यास जोडला.

अशारीतीनें क्षणाक्षणाला, प्रति दिवसाला विजयनगरची प्रगति होत होती, कीर्ति सगळीकडे पसरत होती. राज्य वाढत होतें. त्यामुळें हिंदू जनतेचें होऊं घातलेलें उच्चाटन थांबलें आणि हिंदूंचा जीव भांड्यांत पडला!

वरंगळचा मुसलमान सुभेदार इमद–उलमुल्क याचा पराभव करून तें राज्य विजयनगराच्या साम्राज्यास जोडलें. मुसलमान सुभेदार वारंगळ सोडून पळाला आणि दौलताबाद येथें राहून-त्यानें दिल्लीच्या सुलतानास हरिहरच्या दांडगाईची आणि त्यानें चालविलेल्या दिल्लीच्या बादशहा विरुद्धच्या चळवळींची माहिती दिली. आणि त्याचा बंदोबस्त बादशहानें करावा अशी विनंती ही केली.

विजयनगरचा हरिहरराय बादशहाच्या दृष्टीनें त्यानें नेमलेला सुभेदार वा मांडलिक राजाच होता. पण आतां तो दिल्लीपतीला विचारीतही नव्हता वा मांडलिक म्हणून खंडणीही देत नव्हता. आतां स्वतंत्र राजा म्हणूनच जगांत वावरत होता. नवीन नवीन प्रदेश जिंकून आपल्या हिंदू राज्याचा विस्तार करीत होता. दिल्लीच्या बादशहाच्या दृष्टीनें त्याचें हें वर्तन गैर अतएव दिल्लीच्या बादशाहीच्या अधिकाराला विघातक होतें आणि मुसलमानी धर्माच्या दृष्टीनें अधर्माला उत्तेजन देणारें होतें. त्याचा कडक रीतीनें बंदोबस्त केलाच पाहिजे असा विचार करून बादशहा महंमद तघलख हा

स्वतः मोठी फौज घेऊन दक्षिणेंत उतरला आणि त्यानें विजय-नगरवर मोठ्या धडाक्यानेंच हल्ला केला.

हरिहर आणि माधवाचार्य कांहीं स्वस्थ बसले नव्हते. त्यांच्या गुप्तहेरांनीं याविषयीं त्यांना आधींच बातमी दिली होती. या वेळीं आपणही कडेकोट तयारी करून बादशहाची रग जिरवावयाची आणि आपल्या म्हणजे हिंदूंच्या सामर्थ्याची चुणूक दाखवून बादशाही हल्ल्यांना प्रतिबंध करावयाचा असा निश्चय हरिहरराय यानें केला. आणि मुसलमानी सैन्याला तोंड दिलें. दोन्ही सैन्यांची गांठ इ. स. १३४४ सालीं पडली आणि घोर संग्राम माजला. हिंदु सैन्य या वेळीं मोठ्या निकरानें लढलें आणि त्यानें बादशहाच्या तुर्की सैन्याला चांगलाच हात दाखविला. भयंकर रणकंदन झालें. त्या तुंबळ युद्धांत हिंदूंचा पूर्ण विजय झाला.

विरूपाक्षदेवानें जणू हिंदूंचा कैवार घेऊन हरिहराची बाजू उचलून धरली आणि विजयश्री प्रसन्न होऊन तिनें हरिहराच्या गळ्यांत माळ घातली. दिल्लीचा, त्या प्रचंड शूर सेनेचा, त्या क्रूर टोळ-धाडीचा संपूर्ण पराभव झाला. आणि दिल्लीचा बादशहा सैन्य घेऊन दिल्लीला परतला. आतांपर्यंत मुसलमानी सैन्याचा असा समज होता कीं, हिंदू सैन्य म्हणजे भित्रे लोक! पळपुटे लोक त्यांचा आपण हां हां म्हणतां पराजय करूं! आणि आतांपर्यंत त्यांनीं दक्षिणेंत विजयही मिळविले होते. पण यावेळीं सर्व पालटलें. मुसलमानांना हिंदूंच्या शौर्याची आणि पराक्रमाची थोडी फार कल्पना आली.

हरिहर यानें मिळविलेला हा मोठा आणि महत्त्वाचा विजय होय. या विजयानें त्याच्या सामर्थ्याची आजूबाजूच्या राजांना पूर्ण कल्पना आली आणि त्यामुळें आपसांत चालणाऱ्या कुरबुरी बंद झाल्या. ही

सारी हकीकत एपि. इंडिया खंड ३ रा पान २४ वर दिली आहे.

या प्रसंगानिमित्त रचलेला पुढील श्लोक ध्यानांत ठेवण्यासारखा असून तो दिल्लीश्वराला पराजित केलें हें सांगण्यासाठींच प्रामुख्यानें रचलेला दिसतो.

**तत्र राज हरिहरो धरणीमशिषाच्चिरम्**
**सुत्रामसदृशो येन सुरत्राणः पराजितः ॥**

येथें सुरत्राण हा शब्द दिल्लीच्या बादशहाचा निदर्शक आहे.

या विजयाचे परिणाम फार दूरवर झाले आणि हिंदूंच्या शौर्याचा आणि धैर्याचा प्रभाव हिंदूंत आत्मविकास उत्पन्न करण्यास कारणीभूत झाला. आतांपर्यंत दक्षिणेंत सर्वत्र विजय मिळाल्यामुळें गर्वानें ताठरलेले आणि आपल्या शौर्याविषयीं फाजील अभिमानानें फुगलेले मुसलमान एकदम गडबडून गेले. त्यांचा सारा अभिमान सपशेल कोलमडून पडला. हिंदू जनमनावरला मुसलमानांच्या क्रूरपणानें बसलेला धाकही नाहींसा झाला.

हिंदूंच्या विजयानें त्यांना नवोत्साह प्राप्त झाला. तशांत द्वारसमुद्राचें सिंहासनही त्यांजकडे चालून आलें; यामुळें राज्यांत सगळीकडे आनंदी आनंद बहरला. या विजयोत्सवाप्रीत्यर्थ विजयनगर येथें हरिहर वडेयर याला मोठ्या थाटानें आणि वैभवानें राज्याभिषेक केला, आणि या विजयानंतरच तो विजयनगरचा पहिला आणि स्वतंत्र राजा म्हणवून घेऊं लागला. आतांपर्यंत तो महामंडलेश्वर लोकनायक असेंच आपणास म्हणवीत असे. माधवाचार्यानींच हा सारा महोत्सव घडवून आणिला. या मंगलमहोत्सवानिमित्त पुढील श्लोक रचिला होता असें दिसतें. हा श्लोक अकुमल शिलालेख यांत आढळतो.

**यत्पादः परराजरत्नमुकुटी संघात जांघालिको ।**
**यत्पाणिर्नव पारिजातसुषमा पांडित्य वैतंडिकः ॥**
**यन्मूर्तिःकरुणापयोदधिलहरी माधुर्यसूर्योदयः ।**
**तस्मै हरिहरभूपते रणविदे तिष्ठेत कःपार्थिवः ॥**

परराजांनीं आपलीं मस्तकें पायावर लवविल्यामुळे त्यांच्या मुकुटांतील रत्नांनीं ज्याचे पाय चमकत आहेत, ज्याचे हात नवीन उमललेल्या पारिजाताप्रमाणें सुंदर दिसत आहेत, ज्याची देहयष्टि करुणासागरावर उठलेल्या लाटांचें माधुर्य वाढविणाऱ्या सूर्योदया-प्रमाणें आहे. त्या रणकुशल हरिहरराजासमोर कोणता राजा उभा राहील ?

ज्यांच्या आशीर्वादानें, मार्गदर्शनानें आणि प्रत्यक्ष मदतीनें हरिहरराजाला राजेपण प्राप्त झालें त्या थोर पुरुषांचे म्हणजे श्रीमत्-जगद्गुरु शंकराचार्यांचे उपकार तो कधीं विसरणें शक्यच नव्हतें. प्रत्येक क्षणाला त्याला त्यांच्या उपकारांची जाणीव होत होती. राज्यसिंहासन, सत्ता, वैभव, राजवाडा, सेना सारीं सारीं त्याला त्यांच्या महदुपकारांची आठवण करून देत होतीं. राज्याभिषेक झाल्यावर ' राजा ' म्हणून शंकराचार्यांचें दर्शन घ्यावें असें त्यानें मनांत ठरविलें आणि आपले सारेबंधु, पत्नी, मुलें व इतर नातलग यांस घेऊन राजा हरिहर मोठ्या वैभवांत आणि दरबारी थाटांत श्रीशंकराचार्यांचा आशीर्वाद घेण्यासाठीं शृंगेरी येथें गेला. त्या वेळीं त्या पीठावर भारतीतीर्थ हे स्वामी अधिष्ठित होते सर्व. भावांनीं मिळून स्वामींचें दर्शन घेतलें, त्यांचें यथाविधि यथासांग पूजन केलें. त्या वेळीं राजा हरिहरानें पीठाला मोठी दक्षणा तर दिलीच पण पीठाला कायमची जहागिर इनाम म्हणून दिली.

याबद्दलचें दानपत्र शृंगेरी येथील मठांत आढळतें. तें शासनपत्र कानडींत लिहिलेलें आहे. त्याचा मराठी भावार्थ असा :—

स्वस्ति श्री जयाभ्युदयशके वर्ष १२६८ पार्थिव संवत्सर, फाल्गुन प्रतिपदा, गुरुवार, या दिवशीं स्वामी श्रीमान् महामंडलेश्वर, शत्रूचा कर्दनकाळ, वचनभ्रष्टांचा शासनकर्ता, श्री वीर हरियप्पा वडेयर, कंपण्ण वडेयर बुकण्ण वडेयर, मारप्प वडेयर, मुद्दप्प वडेयर, जामात बल्लप्प दंडनायक, कुमार सोमण्ण वडेयर यांनी मूल्य भारतीतीर्थ श्रीपाद व त्यांचे शिष्य शृंगेरीतीर्थांत वास करून अनुष्ठानार्थ सेवेस राहिलेले ब्राह्मण ४८ यांस दिलेल्या दानाचा शिलाशासनाचा क्रम असा [ यापुढें दान दिलेल्या ग्रामांचीं नांवें व त्यांचें नर्णन आहे. ]

**यस्य यस्य यदा भूमिः तस्य तस्य तदा फलम्**
**तस्याहं करलग्नोऽस्मि मयादत्तं प्रपालय ॥**

मंगल महा ॥ श्री हें शासन लिहणारा चिन्नमल्लोजाचा पुत्र लिंगोजी.

हें शासन पत्र एपि. इंडिया या ग्रंथाच्या ६० व्या खंडांत शृंगेरी १, पृष्ठ १९० वर दिलें आहे. त्यांत स्पष्ट उल्लेख केला आहे कीं, हें दान विजयोत्सवाचे निमित्तानें दिलेलें आहे. " विजयोत्सवं ख्यापयितुं अकरोत् धर्ममुत्तमदम् असे शब्द त्यांत वापरले आहेत. यावरून हरिहर राजाची कृतज्ञता, धर्मनिष्ठपण, दानप्रवृत्ति हीं व्यक्त होतात.

राज्यांभिषेक आणि तदंगभूत विजयोत्सव यामुळें हरिहर राजाचें सामर्थ्य आणि दरारा दक्षिणेंत सगळीकडे वृद्धिंगत झाला आणि पुढेंही राज्य विस्ताराबरोबर वाढत राहिला. या वेळीं त्याच्या राज्याचा विस्तार केवढा झाला होता पहा.

या वेळी विजयनगरच्या राज्यांत पुढील मुलुखाचा अंतर्भाव झाला होता. आनेगोंदी, वरंगळ, द्वारसमुद्र, शिमोगा, दक्षिण कानडा, मलबार आणि मलप्रभेखालचा मुलुख. हीं सारीं स्थळें, राज्यें वा प्रांत आतां विजयनगरच्या अमलाखालीं आलीं होतीं. या राज्याचा नवा राष्ट्रीय ध्वजही तयार करण्यांत आला होता. तो वराहचिन्हांकित होता आणि राज्याभिषेकानंतर तो ध्वज राजवाड्याच्या तटबंदीवर फडकूं लागला.

हरिहरराया हा प्रतापशाली वीर असून मोठा देवभक्त होता. स्वधर्माचे ठायीं तो एकनिष्ठेनेंच वागत असे. देव ब्राह्मणांवर त्याची अपरंपार श्रद्धा व भक्ति होती. हंपीचा विरूपाक्षदेव हें त्याचें कुलदैवत. त्याचें देवालय फार जीर्ण झालें होतें. नवीन धर्तीवर आणि भव्य प्रमाणावर तें बांधावयाचें ठरवून राजानें त्या कामाला सुरुवातही करविली. त्या कामीं किती खर्च येतो इकडे त्यानें पाहिलें नाहीं, इतकेंच नाहीं तर त्या देवालयाची सर्व व्यवस्था नीट व्हावी, देवाची पूजा अर्चा यथासांग व्हावी म्हणून रायानें देवाला जहागीर इनाम करून दिली.

हरिहरराय या साऱ्या गोष्टी त्याचे कुलगुरु व मुख्य प्रधान माधवाचार्य यांच्याच सल्ल्यानें करीत असे. राज्याची भरभराट कशी होईल इकडे त्या दोघांचें लक्ष असे. त्यांनीं विद्वान ब्राह्मण, कलावंत व गुणीजन यांना उदार हातानें देणग्या दिल्या. यामुळें विद्या आणि कला हीं वाढीस लागलीं. राज्यांत व्यापाराची वाढ व्हावी म्हणून त्यांनीं व्यापारी वर्गाला जरूर त्या सवलती दिल्या.

हरिहराचे तीन भाऊ मोठे शूर होते. हरिहराच्या ते आज्ञेंत असल्यामुळें त्यांची राज्याला खूपच मदत झाली. हरिहरानें त्यांना वेगवेगळ्या जागीं राज्यपाल या हुद्द्यावर नेमून त्यांना आपली

कर्तृत्व शक्ति दाखविण्याची संधि दिली. आपल्या पराक्रमानें त्यांनीं लढाया मारल्या, मुलूखही जिंकले आणि ते सारे विजयनगरच्या साम्राज्यांतच प्रविष्ट केले. तिघांही भावांत बुक्क यानें विशेष पराक्रम दाखविला. बहुधा त्यामुळेंच हरिहर राजानें त्याला आपले पश्चात गादीचा वारस ठरविलें असावें.

मोठ्या साम्राज्याचा राजा किंवा सम्राट झाल्यावर साहजिकच हरिहरराजाला अनेक बिरुदें चिकटलीं. शिलालेखांवरून व दान पत्रांवरून त्याची बिरुदावली पुढें दिल्याप्रमाणें होती असें दिसून येतें.

महामंडलेश्वर, चतुःसमुद्राधीश्वर, राजपरमेश्वर, वीरप्रताप, अरिराय विभाड, भाषेके तप्पु रायरगंड, श्रीवीर हरियप्पा वडेअर, हरिहर महाराय. एपि. कर्नाटिका खंड ५ अरसिकेरी यांत या साऱ्या बिरुदांचा उल्लेख आढळतो.

विजयनगर साम्राज्याचें राजचिन्ह वराह असून राजमुद्रेवर व नाण्यांवर त्याचा ठसा उमटविलेला असे. त्याचें कुलदैवत हंपी येथील श्री विरूपाक्ष असें होतें. राजाची सही "श्री विरूपाक्ष" अशी केली जाई.

हरिहर राजाच्या मृत्यूनंतर लवकरच म्हणजे इ. स. १३५५–५६ च्या सुमारास माधवाचार्यांनीं मंत्रिपद सोडलें. त्यांचे धाकटे बंधू सायणाचार्य हे विजयनगरचे महामंत्री झाले. आपलें उरलेलें आयुष्य अध्यात्मविद्या व आत्मचिंतनांत घालवावें म्हणजे जन्माचें सार्थक होईल असा विचार करून ते काशीक्षेत्रीं जाऊन राहिले.

त्यांनीं लिहिलेल्या अपूर्व आणि मौल्यवान ग्रंथांचा विजयनगरच्या राजांकडून तर गौरव झालाच. दरबारांतील पंडित वर्गानेंही यांची वाहवा केली तरी पण सर्व वेदवेदान्त विद्यांचें अधिष्ठान अशा काशीपुरींतील पंडितांनीं ग्रंथांचें श्रेष्ठत्व मान्य करून माना-

डोलविल्याविना माधवाचार्यांचें समाधान होईना. आपल्या भाष्यादि-ग्रंथांची प्रसिद्धि व्हावी, पंडितांची मान्यता मिळावी आणि त्याबरोबर दुर्मतांचें खंडनही व्हावें असें त्यांना सतत वाटत असे.

काशीक्षेत्रीं गेल्यावर त्यांनीं आपल्या भाष्याचें पारायण व्यास महर्षीपुढें केलें. तें ऐकून व्यास मुनि प्रसन्न झालें आणि त्यांनीं म्हटलें, " आपण आपल्या ज्ञानानें विद्यारण्य या पदवीला पात्र अहांत, यात शंका नाहीं. तीच पदवी मी तुम्हाला देतों. "

यावरून असें दिसतें कीं, काशींतील पंडितांकडून माधवाचार्यांच्या ग्रंथांना मान्यता मिळाली. आणि तेथील विद्वद्वर्यांनीं त्यांच्या भाष्यादि ग्रंथांनीं संतुष्ट होऊन त्यांचा बहुमान केला. काशींतील पंडितांकडून आपल्या ग्रंथांना मान्यता मिळाली कीं, तें उत्कृष्ट आहेत असें समजण्याची प्रथा फार पुरातन काळापासून चालत आली आहे. श्री एकनाथ महाराजांनींही आपली श्रीमद्-भागवताच्या एकादशस्कंधावरील टीका काशीच्या पंडितांकडून मान्य करून घेतली होती, ही गोष्ट सर्वांस माहीत आहेच.

माधवाचार्य हे अशा रीतीनें ' विद्यारण्य ' हें नामाभिधान मिळवून पंडितांकडून गौरव करून घेण्यांत गुंग झाले यावेळीं विजयनगरला त्यांच्या गैर हजिरीमुळें बराच त्रास सोसावा लागत होता. त्यांचा अनुभव, त्यांचें कर्तृत्व आणि त्यांचें जनतेवरील वजन यामुळेंच त्यांचा कारभार सुरळीत चालत होता. ते गेल्यानें दरबारांत त्यांच्या लायकीचा मुत्सदी कोणी राहिला नाहीं. यामुळें बुक्क राजांना मोठी काळजी वाटूं लागली.

राजेही नुकतेच राज्यावर बसलेले, मुख्यप्रधान सेवानिवृत्त झालेले या संधीचा फायदा घेऊन कित्येक स्वार्थी लोक नवनव्या भानगडी निर्माण करूं लागले. मांडलिक राजांनीं स्वतंत्र

होण्यासाठीं गुप्त कारस्थानें सुरू केलीं, राजधानींत अनेक कंड्या उठूं लागल्या. बुक्कराज गादीवर आले ते हरिहरराजांच्या इच्छेमुळें हें खरें, पण तसें करतांना त्यांचे वडिल बंधु कम्पराज यांच्यावर अन्याय घडला होता. शिवाय उत्तरेकडील मुसलमानांकडून आक्रमण होणार अशाही गप्पा ऐकूं येऊं लागल्या.

राजा बुक्क शूर होता, अनुभवी होता, तरीही एवढ्या मोठ्या राज्यावर वचक बसवील असा वजनदार आणि प्रभावी मुत्सद्दी त्याच्या दरबारांत नसल्यानें त्याच्या अडचणी वाढूं लागल्या, राज्यकारभरांत कटकटी उत्पन्न होऊं लागल्या, नवनवे कलहाचे मुद्दे काढून दरबारी लोकही राजास सतावूं लागले! यामुळें बुक्क राजे अगदीं बेचैन झाले!

बुक्क राजांनीं मनांत ठरविलें कीं, माधवाचार्यांनाच परत बोलाविल्याशिवाय राज्यकारभाराची विस्कटूं पाहाणारी घडी नीट बसणार नाहीं तेंव्हां त्यांना परत बोलवायाचें. पण आपल्या विनंतीला ते मान देतीलच अशी त्यांना खात्री वाटेना! ते वयानें वृद्ध झाले आहेत, परमार्थ साधनाला लागण्याचें त्यांचें वयही झालें आहे अशा प्रसंगीं काशीसारख्या पुण्य क्षेत्रांतून ते परत फिरतील असें त्यांना वाटेना. पण त्यांनींच लावलेल्या या राज्यरूपी रोपट्याला त्यांच्या हातच्या पाण्याची जरूरी आहे, नाहीं तर तें सुकून जाईल आणि पुन्हा हा दक्षिण भारत यवनाच्या तडाख्यांत सांपडेल हा मुद्दा त्यांना पटेल आणि ते या राज्याचें रक्षण करण्यासाठीं वायुवेगानें धावत येतील अशी त्यांची खात्री होती.

तरी पण माधवाचार्य नक्की परत येतील अशा तऱ्हेचें वजन त्यांच्यावर कोणी घालूं शकेल काय? असा विचार करीत असतां राजाला एकदम सुचलें कीं, श्रृंगेरी मठाधीश श्री भारतीतीर्थ

हे माधवाचार्यांचे गुरु आहेत आणि त्यांनीं जर "माधवाचार्यांना परत येऊन प्रधान पद स्वीकारा" अशी आग्रहाची विनंति केली तर ते नक्की येतील. या विचारानें त्याला समाधान वाटलें आणि श्री. स्वामी भारतीतीर्थ यांचें पत्र मिळविण्याच्या मार्गास तो लागला. राजा बुक्क स्वतः शृंगेरीस गेला आणि तेथील पीठाधीशांना त्यानें आपल्या अडचणी सविस्तर कथन केल्या. त्या ऐकून मठाधीशांची खात्री झाली कीं, या अडचणींतून राजाला आणि राज्याला पार पाडण्यास माधवाचार्यच समर्थ आहेत.

त्यांनीं माधवाचार्यांना आपण परत येऊन बुक्क राजांना मदत करा अशी विनंतिवजा आज्ञाच केली. बुक्क राजाचें विनंतिपत्र आणि आपले गुरु श्री. भारतीतीर्थ यांचें पत्र हीं दोन्ही पोंचतांच माधवाचार्य काशीहून विजयनगरला आले आणि त्यांनीं प्रधानकीचीं सुत्रें हातीं घेतलीं.

माधवाचार्य गेले अशा समजुतीनें कित्येकांनीं राज्यांत अराजक माजविण्याचे प्रयत्न चालविले होते. मलबारचा सुलतान कुर्बेत हसन कांगू हा विजयनगरचा मांडलिक होता. त्यानें राज्याविरुद्ध कोकणांत धांदल माजविली अशी विजयनगरला बातमी येऊन थडकली. माधवाचार्य गेले, आतां राजा असमर्थ झाला असून त्याचें मांडलिकत्व झुगारून देण्यास हीच संधि चांगली आहे, असें त्याला वाटलें.

सुलतानाच्या पुंडगिरीची वार्ता कानीं येतांच हा कांटा कायमचा काढून टाकणें जरूर आहे हें ओळखून माधवाचार्यांनीं राजाला तशीच सल्ला दिली. राजाला हा सल्ला मानवला. त्यानें एकदम मोठी फौज बंडखोर सुलतानावर रवाना केली. या स्वारींत त्यानें

आपला भाऊ मारप्पा याचा मुख्य प्रधान माधवमंत्री याजकडे मुख्य सूत्रें दिलीं. त्यानें मोठा पराक्रम करून सुलतानाचा पराभव केला आणि त्याला मलबार प्रांतांतून हाकून लाविलें. मलबार प्रांत विजयनगरचे राज्यास जोडिला. ही गोष्ट इ. स. १३५८-५९ या सालांत घडली.

माधवाचार्य पुन्हा मुख्य मंत्री झाल्यापासून विजयनगरच्या राजकारणांत नवीन चैतन्य येऊं लागलें. अंतर्गत व्यवस्थेंत कोठें शिस्त बिघडत नाहींना इकडे कांटेकोरपणानें लक्ष देऊन राज्य-व्यवस्थेंत आलेली ढिलाई त्यांनीं नाहींशी केली. फुरसतीच्या वेळीं शहराचें सौंदर्य आणि संरक्षणक्षमता कशी वाढवितां येईल या-संबंधीं राजाजवळ वाटाघाटी करून ठरलेले निर्णय त्वरित अमलांत आणले. विजयनगर शहरावर जणू त्यांचा हात रोजच्या रोज फिरून त्या शहराला नवनवी सफाई आणीत होता. माधवा-चार्यांच्या आगमनानें सारें शैथिल्य नष्ट झालें. जो तो आपलें कर्तव्य करण्याकडे आपलें सारें सामर्थ्य एक केंद्रित करूं लागला. सरकारी अधिकारी, सैनिकच काय पण व्यापारी कारखानदार यांच्याही अंगीं माधवाचार्यांच्या आगमनानें नवा उत्साह संचारला असें दिसलें.

शहराचा विस्तार वाढत होता. स्वास्थ्य आणि संरक्षणाची योग्य तरतूद झाल्यामुळें शहरांत येऊन स्थाईक होण्यासाठी अनेक धनवंत, कलावंत, बडे बडे सरदार जहागिरदार यांची रोजच्या रोज रीघच लागत होती. परिणामीं शहराचा सर्व बाजूंनीं उत्कर्षच होत होता. नवनवीं घरें, हवेल्या, वाडे उठत होती. सुंदर सुंदर शिल्प कलाकुसरींनीं युक्त देवळें, गोपुरें यांची संख्या वाढत होती. नदीचे कालवे बागबगिचे तयार करण्याचीं कामें चालू होतीं

त्यांनाही नवचैतन्य येऊन कामगारवर्ग कामांत गुंग असलेला दिसूं लागला.

विजयनगरचें वैभव सर्व बाजूंनीं सारखेंच वाढत होतें. राजा व प्रधान आपली सर्व बुद्धिमत्ता पणास लावून आपलें राज्य भर-भराटीस आणण्याचे प्रयत्नांत रात्रंदिवस गुंग झालेले दिसत होते. अशा वेळीं एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. विजयनगरचा त्यांत कांहीं दोष नव्हता हें खरें, पण त्या वेळीं राज्याला धोका निर्माण होईल अशी परिस्थिति निर्माण झाली.

इ. स. १३६५ मधली गोष्ट. त्यावेळीं गुलबुर्ग्याच्या गादीवर बहामनी राजा महंमद हा बसला होता. हा गाण्याचा मोठा शोकीन होता. एके दिवशीं उत्तम गाणें ऐकावें अशी त्यास लहर लागली. राजाची लहर ! मग काय विचारितां ! भराभर तीन चारशें गवई गायनासाठीं दरबारांत जमा झाले आणि मजलसीला सुरुवातही झाली. गायना बरोबर मद्यपानालाही आरंभ झालाच. महंमद बहामनि इतका रंगून गेला कीं, त्या गवयांना मोठ्या रकमेची हुंडी इनाम म्हणून द्यावी असें ठरवून त्यानें हुंडी लिहून सहीही केली. मात्र ती हुंडी आपल्या राज्याच्या तिजोरीच्या नांवें न लिहितां विजय-नगरच्या राज्याच्या तिजोरीच्या नांवें लिहिली ! कारण यावेळीं महंमद मद्यपानानें बेभान झाला होता.

ती हुंडी घेऊन राजदूत विजयनगरला गेला व त्यानें ती बुक्क राजाला देऊन पैशांची मागणी केली ! त्याला मोठें आश्चर्य वाटलें आणि रागही आला. हुंडी आणणाराची गाढवावरून धिंड काढून त्याचा अपमान करण्यांत येऊन त्याला घालवून देण्यांत आलें.

ही वार्ता महमद शाहास कळतांच त्यानें रागानें युद्धाची तयारी करून मोटें सैन्य जमा केलें आणि त्या सैन्यानिशीं तो स्वतः

कृष्णा नदी उतरून विजयनगरवर हल्ला चढविण्यास निघाला. बुक्क राजा पुढें काय होणार हें जाणूनच होता. त्यानेंही मोठ्या फौजेची जमवाजमव केली आणि बहामनी राज्यांतील मुदकल शहरावर हल्ला करून त्यानें तें काबीज केलें. त्या शहरांत लुटालूट करून लोकांची दाणादाण उडवून दिली.

ही वार्ता महमद शाहाला कळतांच तो रागानें अगदीं खवळून गेला आणि आपल्या सैन्यानिशीं बुक्क राजावर चालून गेला. दोघांची गांठ आदवानी येथें पडून मोठें तुंबल युद्ध झालें. हजारों सैनिक मारले गेले. महमदशहाची सरशी होते असें दिसतांच बुक्क राजानें माघार घेतली. हें पाहून महमदशाहानें जवळजवळ एक लाख हिंदूंची कत्तल केली. आणि तो विजयनगरच्या रोखानें निघाला.

माधवाचार्यांनीं पाहिलें कीं केवढ्या क्षुल्लक कारणानें लाखों माणसांचे बळी घेतले जात आहेत. त्यांनीं सल्ला दिला आणि पंचांमार्फत बुक्क राजानें महमदशाहाकडे तहाचें बोलणें लाविलें.

"हुंडीचे पैसे गवयांना द्यावे" म्हणजे मी माघारी जातों असें महमदशानें कबूल केलें. अशा रीतीनें आलेलें हें अरिष्ट टाळलें. आणि गवयांना हुंडीचे पैसे बुक्क राजाच्या तिजोरींतून मिळाले. शहाणपणानें आणि खुबीनें विजयनगरवर आलेलें संकट टाळून राज्याची अब्रू बचावण्यांत आली.

नवीन साम्राज्य स्थापन झाल्यानंतर त्याला स्थैर्य येईपर्यंतचा काळ मोठा आणीबाणीचा आणि गडबडीचा असतो. राजा आणि त्याचे मुत्सद्दी यांना फार काळजी वहावी लागते. कोणतीही गोष्ट करावयाची म्हटली तरी पाऊल सावधानपणें टाकावें लागतें. तरी-ही कोठें गडबड होतेच, कोठें गोंधळ माजलेला दिसतोच. फार

काय पण कोठें बंडाचाही उद्भव होण्याचा संभव असतो. अशा वेळीं सावधान राहून सगळीकडे लक्ष पुरवावें लागतें.

राजा बुक्कलाही या साऱ्या अडचणींतून जावें लागलें आणि त्यानें हें काम अगदीं चोख पार पाडलें यांत शंकाच नाहीं पहिल्यानें कर्नाटकांत थोडी गडबड उडाली होती. राजानें सैन्य पाठवून त्याचा लागलीच बंदोबस्त केला. त्यानंतर वरंगळच्या कांहीं भागात असंतोष उत्पन्न होऊन बंड झालें. त्याचाही राजानें लागलीच बंदोबस्त केला. त्यानंतर कांचीवरम या भागांतलें स्वास्थ्य बिघडून तिकडे दंगल होण्याची भीति उत्पन्न झाली. तिचाही राजानें ताबडतोब बंदोबस्त केला यामुळें राज्यांत शांतता नांदूं लागली.

दक्षिणेकडील सर्व मुलूख विजयनगर साम्राज्यांत समाविष्ट झाला होता. त्याला अपवाद काय तो मदुरेचा. तेथें अद्याप सुलतान राज्य करीत होता. बाकी सारा मुलूख विजयनगरच्या हिंदू राजाच्या ताब्यांत होता. कृष्णेच्या उत्तरेला विजयनगरला आपला प्रभाव पाडतां आला नाहीं. त्यामुळें कलबुर्ग्याचें मुसलमानी बहामनी राज्य कायमच होतें.

कृष्णेच्या उत्तरेला बहामनी राज्य होतें. तरीही कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील दुआबाबाबत मालकी हक्कासंबंधें त्यांच्या नेहमीं कटकटी चालत. बहामनी राज्याचा जोर महाराष्ट्र, वऱ्हाड प्रांतांत विशेष होता. बुक्क राजाचा दराराही चांगला होता आणि त्याची सावधानता विशेष लक्षांत ठेवण्यासारखी होती! त्यामुळें दोन्ही राज्यांतल्या कुरकुरींना लढाईचें रूप प्राप्त झालें नाहीं.

विजयनगरचें राज्य आतां खूपच मोठें वाढलें होतें. राज्याच्या विस्ताराबरोबर अनेक नवनव्या जबाबदाऱ्या राजावर विशेषत: मुख्य प्रधानांवर येऊन पडतात. माधवाचार्यांचें वय आतां सत्तरीला

पोंचलें. ते कितीही बुद्धिमान मुत्सद्दी असले तरी वाढत्या वयानें आलेल्या दुर्बलावस्थेमुळें हा भार त्यांना एकट्याला सोसतां येईना. म्हणून आपल्या कामांत कोणी मदतनीस घ्यावा असें त्यांनीं ठरविलें आणि ती गोष्ट राजा बुक्काला सांगितली. त्यांचा धाकटा भाऊ सायण हा मोठा मुत्सद्दी आणि रणगाजीच होता. उदयगिरी महाराज्यांत तो प्रधान होता. राजा बुक्क यानें गादीवर बसल्यावर त्याला महामंडलेश्वर या हुद्यावर नेल्लूर येथें नेमून पाठविलें होतें. राजा बुक्कांनी त्याला आपणाकडे बोलावून घेतलें आणि माधवाचार्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं त्याला मंत्रिमंडळांत दाखल करून घेतलें आणि माधवाचार्यांस मदत करण्याचें कार्य त्याजवर सोंपविलें.

ही गोष्ट इ. स. १३६४-६५ या वर्षी घडून आली. त्या पूर्वी जवळजवळ वीस वर्षें सायणाचार्य हे उदयगिरीचे महाप्रधान आणि महामंडलेश्वर म्हणून सुमारें वीस वर्षेंपर्यंत काम पहात होते. ते विद्वान पंडितही होते.

सायणाचार्यांची प्रधान मंडळांत नेमणूक झाल्यावर राजा बुक्क याचे गुण नित्यशः त्यांच्या निदर्शनास येऊं लागले. ते पाहून त्यांनीं राजस्तुतीपर पुढील श्लोक रचिला.

**सत्यैकव्रत पालको द्विगुणधीरस्त्र्यर्थीचतुर्वेदिता**
**पञ्च स्कंद मयी षडन्वयद्रढस्सप्तांग सर्वंसह -**
**अष्ट व्यक्तिकलाधरो नवनिधि पुषद्यशप्रत्ययः**
**स्मार्तोच्छाय धुरंधरो विजयतां श्रीबुक्कणक्ष्मापतिः ॥**

ज्या बुक्क राजानें सत्य याच एका व्रताचें पालन केलें, ज्याची बुद्धि ( इतरांपेक्षां ) दुपटीनें तरी चलाख आहे, ज्याचेपुढे ब्रह्मा, विष्णु, महेश याचक होतात, ज्याला चारहि वेदांतील ज्ञान

उपलब्ध झालें आहे, जो पांच सेनानींनीं समर्थ केला आहे, सहा शास्त्रें ज्याचीं अनुचर-अनुयायी होऊन ज्याचें सामर्थ्य वाढवितात ज्याचीं सात अंगें अवयव सर्व कांहीं सहन करण्याइतखीं बळकट आहेत. जो आठ स्पष्ट दिसणाऱ्या कला धारण करणारा चंद्रच होय. ज्याच्या ठिकाणीं नवरस भरपूर आहेत. ज्याची श्रद्धा किंवा आत्मविश्वास दहाही इंद्रियांनीं पुष्ट केलेला आहे.

# १३ दक्षिणेंतील दिग्विजय

माधवाचार्यांसारखा अलौकिक पुरुष मंत्रीपदाचें काम सांभाळण्यास मिळणें हें विजयनगर राज्याचेंच नव्हे तर अखिल हिंदू जातीचेंच भाग्य होय. माधवाचार्यांच्या रूपानें हिंदूंचें, हिंदुधर्माचें रक्षण करण्यासाठीं परमेश्वरच अवतरला होता असें म्हटलें असतां त्यांत कांहींही अतिशयोक्ति होणार नाहीं.

ते राजकारणी होते, पंडित होते, आणि तपस्वी होते. राजकारणांत त्यांचें अवधान सर्वत्र असून ते सदैव जागृत असत. राज्यांत काय कीं, बाहेर काय, कोठें काय चाललें आहे याची वित्तंबातमी काढण्यांत त्यांचा हातखंडा होता. त्यासाठीं त्यांनीं गुप्त हेरांची योजना केली होती. नाना वेश धारण करून ते हेर सगळीकडे संचार करीत आणि आचार्यांना साऱ्या बातम्या आणून देत.

आपल्या धर्मांत अनेक पंथ आहेत. असें असलें तरी हिंदु या दृष्टीनें आपण एकच आहों आणि तशी एकी आपणांत असेल तरच आपण, आपला धर्म ही या जगांत जिवंत राहूं शकतील सुदैवानें माध्व, वैष्णव, शैव वगैरे वगैरे साऱ्या पंथीयांचें आणि त्यांचे आचार्य अक्षोभ्यतीर्थ, वेदांततीर्थ व इतर प्रमुख आचार्य या सर्वांचें माधवाचार्यांना पूर्ण पाठबळ होतें. या साऱ्यांच्या अभेद्य पाठबळामुळेंच त्यांना विजयनगरासारखें बलाढ्य हिंदू राज्य निर्माण करणें शक्य झालें ! त्यांच्या प्रयत्नाला आलेल्या सुयशाचीं फळें हिंदू जनता पुढें दोन अडीच शें वर्षे उपभोगीत होती.

उत्तरेकडून येणाऱ्या मुसलमानांना कृष्णेच्या पलीकडे रोखून अडविल्यामुळें उत्तरेकडून हल्ला होईल ही भीति राहिली नाहीं, निदान बरीचशी कमी झाली. पूर्वेकडून उदयगिरीचा मार्गही त्यांना आतां बंद झाला होता. त्यामुळें वारंगळहून येणाऱ्या टोळधाडीही बंद पडल्या होत्या. अशा रीतीनें आतांपर्यंत दक्षिणेश्वर मुसलमानांचे घाले पडत त्यांचा बहुतेक बंदोबस्त झाला होता. तरी पण दक्षिणेंतच अजून मदुरेला मुसलमानी सुलतानशाही धुडगूस घालीत होती. तेथला सुलतान माजला असून त्यानें चालू केलेला जुलूम आणि जाच प्रजाजनांना असह्य झाला होता. त्याचें राज्य नष्ट होणें जरूरच होतें. कारण तसे केल्यानें दक्षिणेकडील सर्व प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यांत अंतर्भूत होऊन एका सलंग प्रदेशावर हिंदू राज्य पसरलेलें दिसलें असतें. माधवाचार्यांच्या ही गोष्ट लक्षांत आपल्याशिवाय कशी राहील? पण योग्य संधि सांपडावी अशी ते वाट पहात बसले होते.

सुदैवानें लवकरच ती संधि प्राप्त झाली. इ. स. १७६९–७० सालीं मदुरेच्या गादीवर अल्लाउद्दीन शिकंदर या नांवाचा अत्यंत क्रूर मुसलमान अधिष्ठित झाला. तो कडवा मुसलमान होता. त्यानें हिंदूंचा अनन्वित छळ करण्यास सुरुवात करून जिकडे तिकडे हा हा कार उडविला!

देवळांतल्या देवपूजा बंद पाडल्या, वेदघोष करण्याला प्रतिबंध केला, हिंदूंना सक्तीनें बाटविण्यांत येऊं लागलें. हिंदू जनतेचें जीवन अत्यंत कष्टाचें झालें. देवळें पाडविण्यांत येऊं लागलीं, देवमूर्तींची विटंबना होऊं लागली. सुलतानी छळाला सीमा राहिली नाहीं. छळाच्या आणि जुलमाच्या भयंकर बातम्या माधवाचार्यांचें कानीं येऊं लागल्या. त्यांचा बंदोबस्त करणें जरूर आहे, याची आमात्यांना तीव्र जाणीवही झाली!

याच वेळीं चोल देशच्या शंभुवरायाला अवदसा आठवली. पूर्वी एका प्रसंगीं उदयगिरीचे महामंडलेश्वर यांनीं त्याचा समाचार घेतला होता पण तेवढ्यानें त्याला शहाणपण आलें नव्हतें. त्यानें यावेळीं पुन्हा उठाव केला आणि नजीकच्या विजयनगरच्या प्रदेशांत धुमाकूळ मांडला.

शंभुवरायाचा मित्र वन्यराज यानेंही मित्राला साथ देऊन विजयनगरचे राज्यांत चढाई सुरू केली. माधवाचार्य यांनीं सायणाचार्य व राजा बुक्क यांच्याशीं विचार विनिमय करून या सर्वांना हात पाय पसरण्यास जास्त अवसर न देतां त्यांचा बंदोबस्त करावयाचें ठरविलें. सुलतानाचा सतत सलणारा कांटा तर त्वरित आणि अवश्यच काढला पाहिजे, असा त्यांनीं निश्चय केला.

बुक्क राजाला त्या गोष्टी पटल्या. राजकुमार कम्प याला राजाज्ञा होऊन ह्या कामगिरीवर निघण्याचा आदेश मिळाला. कम्पराय हा कोलार प्रांतीं सुभेदारीच्या जागेवर होता. त्याचें राहाण्याचें मुख्य ठिकाण मुलबागल हें होतें तो मोठा पराक्रमी आणि शूर लढवय्या होता. त्याच्या दराऱ्यानेंच मदुरेचा सुलतान थोडा फार दबून होता. बुक्क राजानें तिघांही बंडखोरांचा बंदोबस्त करण्यास सांगून कंप सुभेदाराच्या मदतीला विजयनगरहून मोठी सेना पाठविली. या मोहिमेच्या प्रमुख स्थानीं कम्प राजकुमार असला तरी तिचीं सारीं सूत्रें विजयनगराहूनच हालत होतीं.

राजकुमार कम्प वडेअर मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणच्या स्वारीवर निघाला. त्यानें प्रथम कांजीवरमच्या शंभुवरायाला गांठलें. आणि त्याच्यावर जोरदार हल्ला चढविला. त्याचा रणांत धुव्वा उडाला आणि नाक मुठींत धरून शरण येणें त्याला भाग पडलें. या वेळीं शंभुवरायाचा इतका नाश झाला कीं, यांतून डोकें वर काढणेंही त्याला बरेंच जड जावें.

यानंतर त्याचा मित्र वन्यराय यावर स्वारी करून त्यास जेरीस आणलें. या दोन राजांची गुंडगिरी बंद पाडून त्यांना कायमचें नेस्तनाबूत करून विजयनगरची विजयी सेना मदुरेच्या रोखानें निघाली. मिळविलेल्या विजयांमुळें त्यांचा उत्साह खूपच वाढला होता. त्यांच्यांत आपल्या सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. आणि मदुरेच्या युद्धांत आपण विजयी होऊं असा भरवसा त्यांना वाटूं लागला होता.

या मोहिमेचा सेनानायक राजकुमार कम्प हा केवळ नरशार्दूल होता. त्यानें आपला पराक्रम यापूर्वीं अनेक युद्धांत प्रगट केला होता. याशिवाय त्याच्या हाताखालीं गोपणार्य व दनायक हे दोन कसलेले योद्धे दिले होते. त्याशिवाय अनेक कसलेल्या रणोत्साही सैनिकांची त्यांच्या सैन्यांत भरती केली होती.

आपल्यावर विजयनगरचें सैन्य चाल करून येत आहे ही गोष्ट लवकरच मदुरेचा सुलतान अलाउद्दीन महंमद याला समजली. त्यानें या सैन्याला तोंड देण्यासाठीं जंगी तयारी केली. आणि मदुरेहून निघाला. मदुरेजवळच त्यांची गांठ पडली. त्या स्थळीं दोघां सैन्यांची गांठ पडतांच भयंकर रणधुमाळी उठली. हाणा, मारा, कापा या शब्दांनीं सारें रणांगण भरून गेलें! तलवारींचा खणखणाट आणि बंदुकांचा ठणठणाट यांची एकच गर्दी उसळली. रक्ताचे पाट वाहूं लागले! भूमातेला असंख्य नरबली वाहिले गेले! या वेळीं हिंदू इतक्या धैर्यानें लढले कीं, मुसलमानांनीं तर आश्चर्यानेंच तोंडांत बोटें घातलीं. रामरावणांच्या युद्धाप्रमाणेंच भयंकर असें हें युद्ध झालें.

तुर्कांनीं मोठ्या निकरानें केलेला हल्ला विजयनगरच्या सैन्यापुढें टिकाव धरूं शकला नाहीं. मोठें भयंकर तणातणीचें युद्ध चाललें

असतां हिंदू सैन्यानें मुसलमानांना सैन्याची फळी फोडून वाघाच्या छातीनें तें आंत शिरलें आणि त्यानें तुर्कांची लांडगेतोड चालविली. या वेळीं हिंदू सैन्याचे अंगांत जगदंबेनेंच संचार केला होता. शेवटीं हिंदूंचा मारा असह्य होऊन मदुरेचें तुर्की सैन्य सैरावैरा पळत सुटलें! मदुरा पडली, विजयनगर यशस्वी झालें. दक्षिणेंतील जुलमी सुलतानशाहीचा अशा रीतीनें अंत होऊन विजयनगरच्या हिंदू साम्राज्याला उधान भरतीच चढली!

सुलतान अल्लाउद्दीन रणांगणापासून दूर उभा राहून लक्षपूर्वक युद्धनिरीक्षण करीत होता. आपला पराजय होत आहे नव्हे झाला आहे, सैन्य बारा वाटा पळत आहे. आपला जीवच धोक्यांत आहे असें पाहून त्यानें पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या पापाचे घडे भरले होते. त्याला पळतांना पाहून मंगप्पा दंडनायकानें त्याचा पाठलाग सुरू केला आणि थोड्याच क्षणांत त्याला गांठून घोड्यावरून खालीं पाडलें आणि आपल्या तलवारीला त्याचा बळी देऊन तिची शांति केली!

ही इतिहास प्रसिद्ध लढाई इ. स. १३७१ सालीं झाली. सुलतान अल्लाउद्दीन जमिनीवर मरून पडला. याच सुलतानानें द्वारसमुद्रच्या वीरबल्लाळ राजाला रणांत कोंडींत पकडून मारलें होतें, त्याचा सूड अशा रीतीनें घेतला गेला. विजयनगरचा विजयी झेंडा मोठ्या वैभवानें आणि समारंभानें फडकवीत मदुरेंत नेण्यांत आला आणि सुलतानाच्या वाड्यावर मोठ्या अभिमानानें लावण्यांत आला. हिंदु प्रजेचा उत्साह काय वर्णावा! त्यांचा आनंद उतास आला होता! नरकवास संपला! मंगल देव देवता आणि धर्म ही पुन्हां स्वस्थानीं आलीं. इ. स. १३२४ मध्यें मदुरा तुर्कांच्या जुलमाखालीं पहिल्यानें चिरडली. त्याच्या जबड्यांत गेलीं सुमारें

पन्नास वर्षे रगडत राहिली आणि पुन्हां इ. स. १३७१ सालीं स्वतंत्र झाली! अशा रीतीनें विजयनगरचा झेंडा रामेश्वरीं पोंचला!

मदुरेंतील शिव व विष्णु यांचीं प्रसिद्ध देवालयें कुलुपें घालून सुलतानानें बंद केलीं होतीं. त्यांची पूजा अर्चा सारेंच बंद. मूर्ति-पूजा करणें गैर असें त्यांचें मत. कम्प रायानें विजयी होतांच देवळांचीं दारें उघडून पुन्हा देवांची पूजा अर्चा पूर्वीप्रमाणें कर-विण्याची व्यवस्था केली. देवदर्शन घेण्याची, मूर्तींची पूजा करण्याची देवळांत प्रदक्षिणादि सर्व भक्तिभावानें केल्या जाणाऱ्या गोष्टी करण्याची सर्वांना मुभा मिळाली. सर्व धार्मिक विधि यथासांग होऊं लागले.

मदुरा काबीज झाली पण अद्याप श्रीरंगपट्टण मुसलमानांच्या हातीं होतें. तें मुक्त होऊन हिंदू राजवटींत आल्याशिवाय विजय-नगरचा संपूर्ण जय झाला असें म्हणतां येणारें नव्हतें. मुसलमान थोड्याशा भागांत राहिले तरी ते हिंदूंना उपद्रव दिल्याविना राहाणार नाहींत हा सर्वांचा अनुभवच होता.

आता श्रीरंगनाथाचें स्थान श्रीरंगपट्टण हें मुक्त केलेंच पाहिजे अशी विजयनगरला तळमळ लागली. श्रीरंगनाथ हा वैष्णवांचा मुख्य देव-कम्प राजाचा मुख्य सेनापति गोपणार्य हा वैष्णव ब्राह्मणच होता. तो मोठा शूर, धाडसी, रणझुंझार होता. जिंजी प्रांताचा सुभेदार म्हणून त्या वेळीं त्याची नेमणूक झाली होती. या मदुरेच्या लढाईंत तो स्वतः हजर होता. श्रीरंगपट्टण हें श्रीवैष्णव धर्माचें आद्यपीठ असल्यानें वैष्णव पंथीयांना तें अत्यंत पूज्य वाटत असे. हें पवित्र क्षेत्र मदुरेच्या सुलतानानें इ. स. १३२७ सालीं जिंकून घेतलें. त्यावेळीं तेथील रंगनाथभक्तांनीं तेथील मूर्ति

उचलून ती तिरुपति येथें सुरक्षित राहण्यासाठीं ठेवून दिली. नाहींतर यवनांच्या हातीं लागून त्यांनीं ती फोडून टाकून तिची विटंबना केली असती.

आतां मदुरेच्या सुलतानाचा पराभव झाला होता. तें शहर विजयनगरच्या हिंदू राजाच्या ताब्यांत आलें होतें. अर्थात अल्पही काळ वायां न घालवितां श्रीरंगपट्टणवर हल्ला चढवून तें हस्तगत करणें जरूरच होतें. ही गोष्ट लक्षांत घेऊन मुख्य सेनापति गोपणार्यानें तेथील तुरकांवर हल्ला चढवला. मोठ्या शौर्यानें लढून त्यांना श्रीरंगपट्टणांतून पिटाळून लाविलें. हिंदूंचा विजय झाला. आणि मुसलमान इतस्ततः पळत सुटले.

गोपणार्य विजयी झाले. त्यांनीं विजयनगरचा विजयी ध्वज श्रीरंगपट्टण शहरांत नेऊन तेथील राजवाड्यावर फडकत ठेवला. मोठ्या समारंभानें त्यांनीं श्रीरंगनाथाची मूर्ति तिरुपतीहून पुनः श्रीरंगपट्टण येथें घरीं आणिली नंतर त्या मूर्तीची धार्मिक विधि-करून पूर्वस्थळीं देवळांत स्थापना केली. हा विजयनगर साम्राज्या-चाच नव्हे तर अखिल हिंदू जातीचा मोठा विजय होय. या विजयानें बुक्क भूपालांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. आपल्या अंगीकृत कार्यांत इतकें घवघवीत यश मिळालें हें पाहून माधवाचार्यांचें अंतःकरण भरून आलें, आपला जन्म धन्य धन्य झाला, आपण कृतकृत्य झालों असेंच त्यांना वाटूं लागलें !

गोपणार्यांनीं दाखविलेलें शौर्य आणि केलेला पराक्रम विस्मृत होऊं नये. पुढील पिढीला तो कळावा म्हणून रंगनाथाच्या देवळाच्या महाद्वारावर श्लोकरूपानें कोरून ठेवला आहे. तो श्लोक असा आहे.

**आनीयानल-शृंगद्युतिरचित-जगद्रञ्जनादञ्जनाद्रेः**
**चेञ्जामाराध्य कंचित् समयमथा निहत्योडवनुष्कान्**
**तुलुष्कान्**
**लक्ष्मीक्ष्माभ्यामुभाभ्यां सहनिजनिलये स्थापयन्**
**रंगनाथम्**
**सम्यग्वर्यां सपर्यां कुरुत निजयशो दर्पणो गोपणार्यः॥**

हा श्लोक एपि. इं. डि. खंड ६ वा नं. ३३ पान ३२३ वर दिला आहे.

गोपणार्य यांची महान कृति अशी अमरामर करून ठेविली आहे.

उगवत्या आणि प्रतिदिनीं वाढत्या साम्राज्याचे पंत आमात्य माधवाचार्य यांनीं राज्याची व्यवस्था अगदीं नियमबद्ध करून टाकिली होती. शिस्तीवर त्यांचा मोठा भर होता. राज्यांत शांतता नांदत आहेना ? प्रजेला कोठूनही विनाकारण अन्यायानें कष्ट सोसावे लागत नाहींतना या विषयीं ते सदैव जागरूक असत. यामुळें प्रजा सुखी आणि निर्भय होऊन विजयनगरचें वैभव वाढलें. जुन्या काळीं ओस पडलेलीं गावें पुन्हा वसूं लागलीं!

वेदविद्येला चांगला राजाश्रय मिळूं लागला गावें पुन्हां बसूं लागलीं. ठिकठिकाणीं पाठशाला स्थापन होऊं लागल्या, देशी भाषेलाही प्रोत्साहन मिळूं लागलें; नाना विषयांवर ग्रंथरचना होऊन कानडी, तामील, तेलगू या भाषांचीं भांडारेंही वृद्धिंगत होऊं लागलीं. राज्यांत व्यापार वाढूं लागला. रस्ते, विहिरी, तळीं कालवे यांत नित्यशः भर पडत चालली. प्रजानुरंजनाला आगळेंच महत्त्व प्राप्त होऊन राजा, पंतप्रधान, प्रजा यांचे संबंध एकाच कुटुंबांतील माणसासारखे आपले

पणाचे झाले. देशावर परचक्राची वा अंतर्गत बंडाळीची भीति नाहींशी होऊन त्यामुळें देश संपन्न होत गेला. आणि त्यांत शांततेचें वातावरण निर्माण झालें.

एकंदररींत माधवाचार्यांच्या जागरूकपणानें राज्याची घडी व्यवस्थित बसली. त्यामुळें बुक्क भूपालाची कारकीर्द मोठी भाग्याची, सुखाची आणि प्रजेला महानंदाची गेली. त्यांना या वेळीं राम-राज्याची आठवण झाली असल्यास त्यांत फारसें नवल नाहीं. बुक्क भूपाल लोकप्रिय झाले. त्यांचा यशोदुंदुभि दाहीं दिशांत दुमदुमूं लागला. कर्नाटक राज्यलक्ष्मी सौभाग्यानें तळपूं लागली. लोक-कल्याण आणि प्रजावात्सल्य हींच त्यांच्या राज्यकारभाराचीं दोन मुख्य सूत्रें होतीं!

बुक्क राजांच्या राज्यकारभाराचें अत्यंत गौरवपर वर्णन पुढील श्लोकांत केलेलें आढळतें. हे श्लोक मुलबागल येंथील शिला-लेखांतून उतरून घेतले आहेत.

आसन् हरिहरःकम्पो बुक्करायमहीपतिः
मारपो मुद्दपश्चेति, कुमारास्तस्य भूपतेः ॥
पञ्चानांमध्यगस्तेषां प्रशास्ते बुक्कभूपतिः
प्रचण्ड विक्रमोमध्ये पाण्डवानामिवार्जुनः ॥
भंगा कलिंगाऽमित–शौर्य–वृत्तिः .
वंगा विभन्नांग–विघूर्णनेत्राः ।
आन्ध्राश्च रन्ध्राणि विशान्ति यस्य
बाहूग्रखडगेण विशीर्यमानाः ॥
तुरुष्काः शुष्कवदनाः पाण्ड्यभूपाः पलायिता :
स्वभुजार्जित–वीर्येण तस्मिन राज्यं प्रशासति ॥

बुक्करायो भवेत् श्रीमान् भुजार्जितपराक्रमः
मेदिनीच प्रजा येन स्वपुत्रा इव रक्षिताः॥
राजाधिराजतेजस्वी यो राज परमेश्वरः
भाषालंधितभूपाल–भुजंग–विहंगमः॥
राजराजभुजंगो यः परराय भयंकर
हिंदुराय सुरत्राण इति एतैरुपशोभितः॥
विद्याभिदाननगरी, बिजयोन्नत शालिनी
विद्यारण्यकृता तस्थां रत्नासिंहासने स्थितः॥
यस्मिन् षोडशदानानां धरायां परिशोभितम्
दानाम्बुधारया तस्य वर्धते धर्मपादपः॥

हे श्लोक एपिग्राफिका कर्नाटिका खंड १० मुल बागल, १५८ पृष्ठ १३५ वर दिले आहेत. यांचा अर्थ:—

यदु वंशांतील संगम राजाला हरिहर, कम्प, बुक्क, मारप व मुद्दप असे पांच मुलगे होते. पांच पांडवांमधला जसा अर्जुन तसा या पांच भावांमधला बुक्क थोर आणि पराक्रमी होता. यानें आपल्या हातांतील भयानक खडगानें अतुलनीय पराक्रम करून कलिंग देशाचा पाडाव केला; वंगलोकांची हड्डी नरम केली व त्यांचे डोळे दिपवून टाकले; छिन्नविच्छिन्न झालेले आंध्र त्याच्या राज्यांत मिळलेल्या जागेंत राहिले. तुर्कांचीं तोंडें सुकून गेलीं, पांड्य राजे पळून गेले. तो राज्य करीत असतां त्याच्या बाहुबलाचा असा परिणाम जाणवला. असा हा पराक्रमी राजा लौकरच वैभवास चढला. त्यानें पृथ्वी व प्रजा यांचे पालन आपल्या स्वतःच्या मुलांप्रमाणें केलें. राजाधिराज, राजेश्वर बुक्क नित्यशः पराक्रम गाजवूं लागला. आपल्या गोड बोलण्यानें राजेच काय पण साप व पक्षीही यानें मोहित केले. इतर राजांना हा कर्दनकाळ वाटे

पण हिंदूराय-सुरत्राण अशी त्यानें कीर्ति मिळविली. राजानें मिळविलेल्या विजयांनीं वैभव शिखरावर चढून गेलेली ती विद्यानगरी राजधानी विद्यारण्यांनीं विस्तारपूर्वक समृद्ध, सुंदर आणि नीटनेटकी केली. त्या या राजधानींत बुक्कराज रत्नजडित सिंहासनावर शोभूं लागला. हा राजा राज्य करीत असतां पृथ्वीवर सोळा प्रकारचीं दानें देत असे. त्याच्या दान देते वेळीं सोडलेल्या उदकानें धर्मवृक्ष निरंतर फोफावतच राहिला.

# १४ माधवाचार्यांची धार्मिक कामगिरी

हिंदुधर्म एक असला तरी त्यांत अनेक देवता मानल्या असल्यानें त्यावरून कांहीं पंथ निर्माण झाले. शिवाची आराधना करणारे ते शैव आणि विष्णूची आराधना करणारे ते वैष्णव. दक्षिणेंतील बहुतेक राजे शैवपंथी होते. शैवपंथ हा अद्वैत मतवादी आहे म्हणजे ईश्वर व आत्मा किंवा जीव यांचें अंतीं ऐक्य होतें असें मानतो. शृंगेरी हें त्यांचें कर्नाटकांतील मुख्य पीठ-याची स्थापना आद्य शंकराचार्यांनीं केली. कर्नाटकांतील बहुजन समाज हा शैवपंथी होता.

द्वार समुद्राचे राजे वीरबल्लाळ, विजयनगरचे हरिहर, आनेगुंदीचे जंबुकेश्वर, चोलचे शंभुवराय हे सारे शैवमंथी असून शृंगेरी मठाचे अनुयायी होते. हरिहर बुक्क यांचें कुलदैवत हंपी येथील विरूपाक्ष हें होतें. विरूपाक्ष हेंही शंकराचेंच नांव असून त्याकाळीं हंपी या क्षेत्राला फार मोठें महत्त्व प्राप्त झालें होतें. तेथील भुवनेश्वरी देवी ही माधवाचार्यांची कुलदेवता. त्यांच्या तपश्चर्येनें ती त्यांना प्रसन्न झाली आणि तिनें त्यांना प्रत्यक्ष दर्शन ही दिलें.

शैव मताप्रमाणेंच वैष्णव पंथही त्या वेळीं अस्तित्वांत होता. हा पंथ श्रीमदानंदतीर्थ मध्वाचार्य यांनीं स्थापन केला. उडपी येथें त्यांचें मुख्य पीठ स्थापन झालें होतें व त्या पंथाचा प्रचार आणि प्रसार हीं दोन्ही कार्यें तेथूनच चालत !

शंकराचार्यांचें अद्वैत मैत त्यांना मान्य नव्हतें. हे अस्सल

कर्नाटकी असून संस्कृत भाषेवर त्यांचें चांगलेंच प्रभुत्व होतें. पुष्कळ लोकांनीं या मताची दीक्षाही घेतली होती. त्यामताचे प्रख्यात द्वैताचार्य अक्षोभ्यतीर्थ हे सायण माधवीय कालांतच होऊन गेले. वेदांतभूषण जयतीर्थाचार्य हे त्यांचे जोडीदार. हे दोघेही द्वैतमताचे आग्रही पंडित असून विद्यारण्य व अक्षोभ्यतीर्थ यामध्यें वेदांतदेशिक या पंडितांचें अध्यक्षतेखालीं मोठा कडाक्याचा वाद झाला. अक्षोभ्यतीर्थांनीं विद्यारण्यांस पराजित केलें असें म्हणतात, पण तें नक्की बरोबर कीं चूक हें ठरविणें कठीण आहे.

हा वाद विवाद मुलबागल शहरीं झाला. या प्रसंगाचे स्मरणार्थ तेथील एका खांबावर पुढील श्लोक कोरलेला आढळतो.

**असिना तत्त्वमसिना परजीव प्रभेदिनः**
**विद्यारण्यं महारण्यमक्षोभ्यमुनिरच्छिनत् ॥**

पण हा मजकूर खरा नाहीं असें अद्वैत वाद्यांचें म्हणणें असल्यानें त्यांनीं आपलाच विजय झाला हें दाखविण्यासाठीं पुढील ओळ लिहिली " अक्षोभ्यंक्षोभयामास विद्यारण्यो महामुनिः । नक्की काय झालें हें कोणालाच कळलें नाहींसें दिसतें.

या द्वैत मताचार्यांनींहीं आपल्या मताचा बराच प्रचार केला आणि तेही अलौकिक बुद्धिमान असल्यानें त्यांचाही अनुयायी वर्ग वाढत गेला. उडपी हें क्षेत्र म्हणजे वैष्णव पंथाची काशी मानलें जाऊं लागलें. त्याकाळीं हा पंथही मोठ्या जोरांत होता.

विशिष्टाद्वैत नांवाचा तिसरा एक पंथ होता व आहे. या मताचे जनक श्रीरामानुजाचार्य हे होत. हें मत श्रीवैष्णव मत या नांवानेंच ओळखलें जातें. या मताचा मुख्य विरोध द्वैत मताला आहे. शंकराचार्यांचें मत पूर्णतया मान्य नाहीं. त्यांना शंकराचार्यांचा मायावाद मान्य नाहीं. शांकरमताप्रमाणें जीव व शिव यांचें ऐक्य

घडतें, तादात्म्य होतें तसें या मताप्रमाणें होत नाहीं. जीव हा प्रत्यक्ष शिवरूप होत नसून तो त्या शिवाच्या शरीर स्थानीं असतो, तादात्म्य पावत नाहीं.

शांकरमत असें आहे कीं, शिवस्वरूप म्हणजेच ब्रह्मस्वरूप हें निराकार निर्गुण आहे. वेदांतांत आणि उपनिषदांत जीं निर्गुणवाचक वचनें आढळतात त्यांना आचार्य प्राधान्य देतात. सगुणवाचक वचनांना त्यांनीं गौणस्थान दिलें आहे. श्रीवैष्णव मतांत म्हणजे विशिष्टाद्वैत मतांत याच्या अगदीं उलट मांडणी केली आहे. त्यांनीं सगुणवाचक वचनांना प्राधान्य दिलें असून निर्गुणवाचक वचनांना गौणत्व दिलेलें आढळतें.

द्वैत मतानें या दोन्ही मतांचा इन्कार केला असून त्या मताप्रमाणें जीव व शिव हे कधींही तादात्म्य पावत नाहींत; ते भिन्न आणि स्वतंत्र आहेत आणि तसेच ते राहतातही. याचाच सरळ अर्थ जीव हा विष्णुस्वरूप न होतां केवळ त्याचा दास बनून वेगळेपणांतच विष्णुसन्निध राहतो.

विशिष्टाद्वैत मताचे स्थापक व पुरस्कर्ते श्रीरामानुजाचार्य हे मूळचे चोल देशांत राहणारे त्या देशाचा राजा शैवपंथी होता. त्याच्या भीतीनें आणि त्रासानें त्यांनीं चोल देशांतून पलायन केलें. त्यांनीं म्हैसूर प्रांतांत आपलें नीट बस्तान बसूं शकेल असें पाहून श्रीरंगपट्टण येथें आपल्या पीठाची स्थापना केली. अर्थात श्रीरंगपट्टण हें त्यांचें आद्यपीठ बनलें. त्यानंतर तेथें श्रीरंगनाथाची मूर्ति स्थापन करण्यांत येऊन त्या स्थानाला वैष्णवपंथाचें तीर्थक्षेत्र बनविण्यांत आलें.

सायण माधवांचें काळीं या पंथाचे पीठस्थ लोकाचार्य वेदांत-देशिक हे होते. त्यांचे वादविवाद द्वैतमताच्या आचार्यांशीं मोठ्या

चुरशीनें होत असत. या मताचे लोकही विजयनगरांत नांदत होतेच.

याशिवाय जैन मताचे लोकही या राज्यांत नांदत होते. असें सांगतात कीं, विक्रमपूर्व तिसऱ्या शतकांत उत्तरेंत फार मोठा दुष्काळ पडला. त्या वेळीं तिकडील जैनांचा पुढारी भद्रबाहु याच्या नेतृत्वाखालीं दुष्काळपीडित जैनधर्मीयांची एक बरीच मोठी तुकडी तो प्रदेश सोडून दक्षिणेंत उतरली. तिकडून पुढें सरकत सरकत ती कर्नाटकांत आली. या ठिकाणीं वसती करण्याला योग्य अशी भूमि त्यांना आढळली. तेव्हांपासून दक्षिणेंतच राहून त्यांनीं आपल्या धर्मप्रसाराचें काम सुरू केलें. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन त्या पंथाच्या अनुयायांची संख्या दिवसेंदिवस वाढूं लागली. कर्नाटकांत म्हैसूर प्रातांतील श्रवणबेळगोळ हें त्यांचें मुख्य ठिकाण असून त्यांचा पुढारी भद्रबाहु या ठिकाणीं राहात असे. थोडाफार राजाश्रयही यांना लाभला होता असें दिसतें.

एपि. कर्नाटिका खंड २ यावरून आपणास याला पोषक अशी थोडीशी माहिती मिळते. होयसळराजा भीमराय याची प्रथम पत्नी राणी भीमदेवी ही प्रसिद्ध पंडित जैनाचार्य, अभिनव चारुकीर्ति यांची शिष्या होती. तिनें जैन तीर्थंकर शांतिनाथ याची मूर्ति बेळगोळ येथें स्थापन केली.

जैनाचार्यांनीं कन्नड भाषेंत उत्तमोत्तम ग्रंथ लिहून वाङ्मयाची मोठी सेवा केली यांत शंकाच नाहीं. कानडी भाषेंत ग्रंथलेखनाचा पहिला मान त्यांचाच. संस्कृत वाङ्मयांतही त्यांनीं प्रशंसनीय श्रेष्ठ दर्जाची कामगिरी केली आहे. विद्याचक्रवर्ती, विद्यानाथ, मल्लिनाथ, वगैरे अनेक पंडितांचें कानडींतील ग्रंथलेखन फार उच्च दर्जाचें असून भाषेला प्रौढपणा देणारें आहे. जैन पंडितांचे हे कन्नड भाषेवर महदुपकार आहेत यांत शंकाच नाहीं.

याशिवाय वीरशैवपंथही उदयास येत होता. हा पंथ बसवेश्वर यानें स्थापन केला. त्या पंथाचा तो प्रमुख प्रचारक होता. हा पंथही कर्नाटकांत हातपाय पसरीत चालला होता. म्हैसूर प्रातांत श्री शैल्य येथें त्या पंथाचें मुख्य पीठ आहे. हा पंथ फक्त आचार धर्मावरच व नीति वचनांवर अधिष्ठित आहे. जैन आणि हिंदुसमाजावर हल्ला चढवून आपल्या पंथाला अनुयायी मिळविण्याची वीरशैव आचार्यांची कारवाई सदैव चालत असते. गळ्यांत नेहमीं लिंग धारण करणें हें या पंथाचें मुख्य आणि पवित्र कर्तव्य मानलें जातें.

विजयनगरचें साम्राज्य हिंदूंच्या रक्षणासाठींच असल्यामुळे तेथील राजांना या धर्मांतील सर्वच पंथांचा परामर्ष सारख्याच रीतीनें घ्यावा लागे. ते स्वतः जरी शैवपंथाचे होते, श्रृंगेरीच्या शंकराचार्यांचे शिष्य किंवा अनुयायी होते, तरी राजे या नात्यानें ते समदृष्टि होते. म्हणजे सर्व पंथीयांना ते समानतेनेंच वागवीत.

एकदां जैन व वैष्णव या दोन समाजांत कांहीं कारणावरून वाद उपस्थित झाला. प्रकरण दिवसेंदिवस जास्त जास्त चिरडीस जाऊं लागलें. जैनांवर अत्याचार होऊं लागले. विविध प्रकारांनीं त्यांच्या छळासही सुरुवात झाली. वैष्णवांशीं टक्कर देण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य नव्हतें. पण स्वस्थ बसूनही भागत नव्हतें. आपलें व आपल्या पंथाचें रक्षण करण्यासाठीं त्यांनीं बुक्क भूपालाकडे धांव घेतली. बुक्क भूपालानें त्यांचें म्हणणें मोठ्या सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतलें.

बाब अत्यंत क्षुल्लक होती, तरीही तिच्यावर रण माजलें. धार्मिक बाब असल्यानें बुक्क भूपालानें साहाजिकच आपले कुलगुरु माधवाचार्य आणि बंधु सायणाचार्य यांचा सल्ला विचारला.

हिंदूंच्या देवळांत जैनांच्या पूजाअर्चा करण्याच्या वेळीं कांहीं

वाद्यें वाजविण्याची प्रथा होती. ती नवीन नव्हती, तर प्राचीन काळा-पासूनच चालत आलेली होती. पंचवाद्यें ही फक्त वैष्णवांचीच मिरासदारी असून त्यांचा उपयोग करण्याचा हक्क इतरांना म्हणजे जैनांना नाहीं असें वैष्णवांचें म्हणणें होतें. जैनांचें म्हणणें असें कीं, आमच्यांतही हीं वाद्यें वाजविण्याची पूर्वापार वहिवाट चालत आलेली आहे."

बुक्क राजांनीं दुसऱ्याही बाजूचें म्हणणें ऐकून घेतलें. कुलगुरूंचा सल्ला घेतला आणि त्यांनीं अखेर निर्णय दिला. तो असा:—

निकाल सांगण्यापूर्वीं राजांनीं जैन व वैष्णव प्रमुखांना जवळ बोलावून बसवून घेतलें. मग जैनांचा हात वैष्णवांचे हातीं देऊन म्हटलें, आमच्या राज्यांत जैन, वैष्णव असा न्यायदानांत पंथभेद नाहीं. सर्व पंथ आम्हांस सारखेच पूज्य व आदरणीय आहेत. त्या साऱ्यांचें रक्षण करणें हें आमचें ब्रीद म्हणून आम्ही अशी आज्ञा करितों कीं, जैनांच्या पूर्वापार पद्धतीप्रमाणें सात वस्तीमध्यें पांचही वाद्यें वाजविण्याचा त्यांचा अधिकार आहे. त्याला कोणीही अडथळा आणूं नये. किंवा भांडण, तंटे, मारामाऱ्या करूं नये. त्या पंथावरील आक्रमण हें वैष्णव पंथावरील आक्रमणासारखेंच आहे. आमचें हें शासन वैष्णवांनीं आमच्या राज्यांतील जैनांच्या सर्व वस्त्यांत लावून जाहीर करावें."

इतकेंच नव्हे तर यावच्चंद्रदिवाकरौ श्रीवैष्णवपंथी लोकांनीं जैनपंथीय लोकांचें व धर्माचें रक्षण केलें पाहिजे. वैष्णव व जैन हे आमच्या मतें भिन्न नाहींत! ते एकाच देहाचे घटक आहेत! त्यांच्या त्यांच्यांत धर्ममूलक भिन्नभाव मानण्याचें कारण नाहीं. तिरुपतीचा तातय्या यानें आमच्या राज्यांतील जैनांच्या घरांतून वसूल केलेल्या कराच्या रकमेंतून वीस धर्मरक्षक नेमून त्यांची

योजना श्रवण बेळगोळ येथील देवाच्या रक्षणाकडे करावी. आणि जैनांची जीं जीं धर्ममंदिरें अर्थात वस्ती उध्वस्त करण्यांत आलीं असतील, त्यांची पूर्ववत दुरुस्ती करून देण्यांत यावी. जो या आमच्या शासनाचा वा हुकुमाचा भंग अगर अतिक्रमण करील तो राजद्रोही समजला जाईल व तसाच तो संघाचा व समुदायाचाही दोषी ठरेल."

[ म्हैसूर गॅझेटिअर खंड २ भाग ३ प्रकरण ११ पृष्ठ १४८३ एपि. कर्नाटिका. खंड २ श्रवण बेळगोळ नं १३६ मधून ]

याप्रमाणें हिंदूंचें राज्य हें धर्मराज्य असूनही सर्व धर्मांना वा पंथांना समानतेनें वागवीत होतें. कुलगुरु माधवाचार्य यांचें असें शिक्षण होतें. हिंदुराज्य हें खरोखर धर्म समतेचें व परधर्म सहिष्णुतेचें सुराज्य असतें व आहे ही.

## १५ स्वामी विद्यारण्य

विजयनगरचे पंत अमात्य श्री माधवाचार्य हे आतां ऐशीं ब्यायशीं वर्षांचे झाले. त्यांच्या या उतारवयांत आतां त्यांना वाढत्या साम्राज्याच्या पंत प्रधानकीचें काम झेपणें कठीण वाटूं लागलें. शिवाय त्यांनीं ज्या उद्देशानें हें कार्य अंगीकृत केलें तो उद्देशही आतां सिद्धीस गेला होता यांत शंका नव्हती. हिंदुधर्म रक्षण, हिंदु जाति रक्षण, हा त्यांचा मूळ उद्देश असून त्या साठीं स्वतंत्र हिंदू राज्याची जरुरी होती. तेंही कार्य त्यांनीं केलें होतें. तें राज्यही आतां समर्थ झालें होतें, त्याचा विस्तारही कल्पनेबाहेर वाढल असून तें मजबूत पायावर उभें राहिलें होतें यांत शंका नाहीं.

हरिहर, बुक्क, दुसरा हरिहर असे पराक्रमी, न्यायी राजे सिंहासनावर बसून प्रजानु रजन आणि धर्म रक्षणाचें काम यथा योग्य चाललें होतें. या सांसारिक जीवनाचा त्यांना आतां कंटाळाही आला होता शिवाय ब्राह्मण या नात्यानें चतुर्थाश्रम स्वीकारून अध्यात्म, ज्ञान, योगसाधन हीं करणें त्यांचें कर्तव्यच होतें; त्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. अर्थात ते त्या विचाराला लागले.

राजे बुक्क यांनीं सुमारें पंचवीस वर्षें राज्यभार पाहिला. तत्पूर्वीं पहिले हरिहर यांनीं सुमारे सतरा वर्षें राज्य केलें. राजे हरिहरांना राज्य स्थापून त्यांत शांतता उत्पन्न करण्याचें कार्य करावें लागलें. सैन्य, कारभार, मंत्री आणि राजे सारेच नवीन, त्यांत मुसलमानांनीं चालवलेली धांदल, गडबड आणि त्यामुळें उत्पन्न झालेला गोंधळ

या साऱ्याचा बंदोबस्त करून राज्य चालवावयाचें होतें. त्यांनीं राज्याचा थोडा फार विस्तारही केलाच.

पण राजे बुक्क यांनीं राज्याचा खूप विस्तार केला. अनेक पराक्रम गाजविले आणि शत्रूंना नामोहरम केलें. विजयनगराचाही विस्तार वाढविला तोही दोन दृष्टींनीं. एक सौंदर्य दृष्टि आणि दुसरी संरक्षण दृष्टि-अशारीतीनें राज्यकारभार करून बुक्क राजे लोकप्रिय झाले. ते इ. स. १३७६ यावर्षीं शिवलोकीं गेले. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव हरिहर ( दुसरे ) हे गादीवर आले. त्यानंतर थोड्याच दिवसांत पंत आमात्य माधवाचार्य यांनीं मंत्रीपद सोडलें आणि त्यांचे जागीं त्यांचे धाकटे बंधु सायणाचार्य हे पंत आमात्य झाले. माधवाचार्य हे शृंगेरीपीठांत जाऊन राहिले. तेथें त्यांनीं संन्यास दीक्षा घेतली. त्यांचे गुरु भारतीतीर्थ यांच्याजवळ ते राहिले. संन्यासाश्रमांतलें त्यांचें नांव विद्यारण्य हें होय. हें नांव त्यांना त्यांच्या गुरूनें दिलें.

यानंतर स्वामीविद्यारण यांनीं आपलें आयुष्य आत्मचिंतन आणि वेदान्त पर ग्रंथलेखन यांत घालविण्याचें ठरवून आपला निर्णय कृतींतही उतरविला. आतां त्यांचा राजकारणाशीं कांहीं संबंध राहिला नव्हता. तरीही राजे हरिहर यांचे अध्यात्मगुरु या नात्यानें त्यांनीं महत्त्वाची कामगिरी केली.

हिंदुधर्म, त्याचें उदार स्वरूप, विशाल हृदय, याची जाणीव करून देऊन आपला धर्म सत्य, अहिंसा, दया, क्षमा आणि सर्व मांगल्य यांवर कसा आधारलेला आहे याची जाणीव त्यांनीं राजांना वेळोवेळीं करून दिली.

इ. स. १३८० सालीं शृंगेरीपीठाचे स्वामी भारतीतीर्थ हे ब्रह्मीभूत झाले, आणि त्यांच्याजागीं श्री विद्यारण्यमुनि यांची

योजना झाली. मोठ्या थाटानें समारंभपूर्वक धार्मिक विधींसह त्यांचा पीठारोहण समारंभ साजरा झाला. तेव्हांपासून ते शंकराचार्य म्हणून पुढील बिरुदावळीनें मंडित झाले. त्यांना प्राप्त झालेली प्रदीर्घ विरुदावळी अशी होती:—

"श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य पदवाक्य प्रमाण पारावार पारीण–यम नियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यान धारणा समाध्यष्टांग योगानुष्ठान निष्ठागरिष्ठ–तपश्चक्रवर्त्यनाद्य विच्छिन्न गुरु परंपराप्राप्तषडदर्शनस्थापनाचार्य – व्याख्यानसिंहासनाधीश्वर – सकल वेदार्थ प्रकाशक--सांख्यत्रयी प्रतिपालक-सकल निगमागम सारहृदय वैदिक मार्ग प्रवर्तक-स्वतंत्रतादि राजधानी-श्रीमद्विद्यानगर महाराजधानी-कर्नाटक सिंहासन प्रतिष्ठापनाचार्य-तुंगभद्रातीर निवास-ऋष्यशृंगपुराधीश्वर:

आपल्या हिंदुधर्मायांचें वैशिष्ट्य हेंच कीं, स्वामी जरी कट्टर हिंदुधर्माभिमानी व कट्टर हिंदुत्व निष्ठ धर्मगुरु असले तरी इतर धर्माविषयीं ते सहिष्णु आणि उदार वृत्तीचे होते. विजयनगरच्या सर्व राजांना त्यांनीं हीच शिकवण दिली आणि म्हणूनच विजयनगर हें धर्मसमतेचें माहेरघरच बनलें.

याचा प्रत्यक्ष पुरावा अगदीं स्पष्ट आहे. मुसलमानांनीं हिंदूंवर केवढेही धार्मिक जुल्म केले तरी हिंदूंनीं वा हिंदूराजांनीं मुसलमानांवर कसलाही धार्मिक जुल्म केला नाहीं. मशीद फोडली नाहीं, कुराणाचा अवमान केला नाहीं कीं, मुसलमानी स्त्रिया' पळविल्या नाहींत.

माधवाचार्य हे शृंगेरी मठावर अधिष्ठित झाल्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे इ. स. १३८७ सालीं ब्रह्मीभूत झाले. त्यांची समाधि हंपी येथें आहे.

याविषयीं त्यांच्या ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करणारे एक विद्वान कै. बापट यांचें असें म्हणणें आहे कीं, शंकराचार्यांचे गादीवर बसल्यानंतर विद्यारण्यस्वामी धर्म प्रसार आणि प्रचारासाठीं त्यांच्या कक्षेंत असलेल्या प्रदेशांत फिरत असत. अशा रीतीनें फिरत फिरत ते वसईकडील भागांत धर्मप्रसार आणि अद्वैत मतप्रचार करीत असतां त्याठिकाणीं त्यांना मृत्यूनें गांठलें. निर्मळ क्षेत्रीं वसईजवळच जी शंकराचार्यांची समाधि आहे असें म्हटलें जातें ती या विद्यारण्य स्वामींचीच. या ठिकाणीं माघ शुद्ध सप्तमीला मोठी यात्रा भरते.

माधवाचार्य यांचे धाकटे बंधु सोमनाथ हे लहानपणापासूनच विरक्त होते. अगदीं तरुणपणींच त्यांनीं संन्यास दीक्षा घेतली होती. माधवाचार्यांना हें बरोबर वाटलें नाहीं ते शृंगेरीला गेले आणि त्यांना संन्यास देणाऱ्या गुरूजवळ त्यांनीं वादविवाद करून म्हटलें, ज्यानें अद्याप वेदांचा अभ्यास पुरा केला नाहीं, ज्यानें गृहस्थाश्रमांत पाऊलही टाकलें नाहीं अशा या कुमार वयस्क भोगनाथाला संन्यासाश्रमाची दीक्षा देणें ही चूकच आहे. संन्यासाश्रमाला तो पात्र नाहीं."

त्या रात्रीं माधवाचार्यांना स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांची कुलस्वामिनी त्यांच्यापुढें प्रकट होऊन म्हणाली, "बा माधवा, तूं वेदविद्या शिकल्यामुळें तुला गर्व झाला आहे, तो व्यर्थ आहे. तो तूं सोडून दे. विरक्तवृत्तीचे बाबतींत तुझा धाकटा भाऊ तुझ्याहून वरचढ आहे. द्रव्य मिळवून आपण धनवंत व्हावें अशी तुला इच्छा होऊन तूं उग्र तपश्चर्या केलीस याची तुला आठवण असेलच. तशा तऱ्हेचा लोभ तुझ्या त्या छोट्या भावाला कधीं शिवलाही नाही. वयानें लहान म्हणून संन्यासदीक्षा घेण्याला तो मुळींच अपात्र नाहीं. तो संन्यासी आहे, त्याला तूं नमस्कार करणेंच योग्य,"

इतकें बोलून देवी अंतर्धान पावली. माधवाचार्यांचा अहंकार नाहींसा झाला आणि त्यांनीं दुसरे दिवशीं सुप्रभातींच सोमनाथ याला नमस्कार केला.

माधवाचार्यांना बालपण दारिद्र्यांतच काढावें लागलें. त्या दारिद्र्याला कंटाळून त्यांनीं आपल्या कुलदेवतेच्या पुढें उग्रतपश्चर्या केली. देवी प्रसन्न होऊन म्हणाली, "तुझ्या गत पातकांमुळें तुझ्या गृहांत देवी लक्ष्मी राहूं इच्छित नाहीं. हा मार्ग तूं सोड."

कालांतरानें माधवाचार्यांनीं विजयनगर साम्राज्य स्थापण्याचें तथा हिंदु धर्म रक्षणाचें महत् कार्य हातीं घेतल्यावर कुलदेवता प्रसन्न झाली. आणि म्हणाली, "आतां पाहिजे तर तुला धन देतें."

माधवाचार्य म्हणाले, देवी जेव्हां संसार करण्याची माझी इच्छा होती तेव्हां तूं मला निराश केलेंस! आतां मला स्वतःला द्रव्याची जरुरी नाहीं. पण पूर्वीं तूं कां नाकारलेंस लाणि आतां कां देत आहेस?" देवी म्हणाली, 'माधवा, पहा पहा ते सात पेटते पर्वत! ते काय सांगतात माहीत आहे तुला! ते सात पर्वत तुझ्या गत जन्मींच्या पापांचे आहेत बरें? तूं चालविलेल्या लोकसेवेमुळें आणि तुझ्या पवित्र आचरणानें तीं पर्वतरूपी पापें जळत आहेत! तूं आतां निष्पाप झालास म्हणून मी तुला धन द्यावयास तयार आहें!

माधवाचार्य म्हणाले, "देवी, मी तुझा आभारी आहें. मी स्थापन केलेलें हें विजयनगर हेंच माझें घर. या नगरीवर चार घटका सोन्याचा पऊस पाड म्हणजे या नगरीचें दारिद्र्य नाहींसें होईल!"

देवीनें 'तथास्तु' म्हणतांच विजयनगरवर सुवर्णवृष्टि होऊं लागली आणि देवी गुप्त झाली.

या झाल्या दंतकथा. विजयनगरचे राजे अत्यंत उदार होते. आणि ते आपले कुलगुरु माधवाचार्य तथा विद्यारण्य यांना फार

फार मानीत असत. ते ब्रह्मीभूत झाल्यानंतर त्यांच्याबद्दलचा आदर कायमच होता. माधवाचार्यांनीं आपल्या गुरूचें स्मारक म्हणून त्यांच्या समाधीवर सुंदर देवालय बांधिलें हें पूर्वी सांगितलेंच आहे. हरिहर ( दुसरे ) यांनीं इ. स. १३८६ सालीं या देवालयांत जाऊन देवदर्शन घेतलें आणि देवालयाच्या पूजा वगैरे कार्यासाठीं व तेथें सेवा करणाऱ्यांच्या अव्याहत चरितार्थासाठीं म्हणून एक मोठें दानपत्र करून दिलें. या गोष्टीवरून हरिहर राजांची दान-शूरता तर कळून येतेच पण त्याशिवाय त्यांच्या मनांत स्वामी विद्यारण्यांबद्दल फार आदर वसत होता हें स्पष्ट होतें.

दानपत्र कानडींत आहे. त्याचा भावार्थ मराठींत असा आहे :—

पूर्वी आमचे परंपरा गुरु वेदभाष्यप्रवर्तक विद्यारण्य श्रीपाद यांनीं लोकानुग्रहार्थ पंपातीरनिवासी श्री विरूपाक्ष प्रासादित तपोबलानें विद्यानगर निर्माण करून तेथें हरिहर महाराय यांस गो-देव—ब्राह्मणांच्या परिपालनार्थ सिंहासनावर पट्टाभिषेक केला.

त्यानंतर श्रीमत् राजाधिराज राजपरमेश्वर शत्रुकुलकुमुदमार्तंड श्रीवीर प्रताप श्रीमत हरिहरराय यांनीं सुखसत्कथा विनोदांत कर्णाटक राज्य प्रस्थापित करून विद्यारण्य श्रीपाद यांच्या चरणा-पाशीं विनंति केली कीं, शृंगेरी येथें शंकराचार्यांनीं निर्माण केलेल्या धर्म पीठस्थानीं मठ व अग्रहार असावा. असा मनोदय व्यक्त करून मल्लिकार्जुन-श्री शंकरस्वामी शारदांबा यांनीं तेथें कार्यार्थ भूस्वास्थ असावें एतदर्थ शृंगेरीपूर–विद्यारण्यपूर–येथें अग्रहार निर्माण करून २५० वृत्ति परिकल्पून त्याचें त्यांनीं विद्यारण्य स्वामींच्या चरणाला समर्पण केलें. ( यापुढें दानपत्र सविस्तर दिलें आहे. )

हें दानपत्र एपि-कर्नाटिका खंड ६ शृंगेरी ११ पृष्ठ १७६ या ठिकाणीं छापलें आहे.

हें दानपत्र विद्यारण्य स्वामी ब्रह्मीभूत झाल्यानंतर केलेलें आहे. हरिहर ( दुसरा ) राजाचे ते अध्यात्म गुरु. त्यांच्या स्मरणार्थ हें दान दिलें असून दानपत्रांतील अग्रहारांना विद्यारण्यपूर असें नांव देऊन त्या नांवानें तें दानपत्र करून दिलें आहे. स्वामी इ. स. १३८६ सालीं ब्रह्मीभूत झाले. त्याच सालीं हें दान करून दिलें असल्यानें त्याचें औचित्य विशेषच वाटतें.

## १६ असें होतें विजयनगर तथा विद्यानगर

ज्या विद्यानगराची वा विजयनगरची आपण कथा वाचली तें नगर होतें तरी कसें हें समजल्याशिवाय ही माधवाचार्यांची गोष्ट कशी पुरी होईल ?

माधवाचार्य यांनीं विद्यानगर शहराची स्थापना केली. त्याची रचना आणि वाढ कसकशी करावयाची याचा आराखडाही त्यांनींच तयार केला होता. हरिहरराय आणि बुक्क या दोघांही राजांनीं त्या शहराचें वैभव वाढविलें. त्याच्या रचनेंत जरूर ते फरक करून त्याचा विस्तार वाढविला. मात्र तो वाढवितांना विजयनगरचें सौंदर्य आणि संरक्षणक्षमता वाढेल इकडे त्याचें पुरेपूर लक्ष होतें.

विजयनगरास एकापुढें एक असे सात प्राकार म्हणजे तट उभारले होते आणि प्रत्येक तटाजवळ पुरेसे विश्वासू नगररक्षक ठेवण्यांत आले होते त्यामुळें कोणत्याही शत्रूला तें शहर अभेद्यच झालें होतें. त्या शहराच्या पहिल्या वेशीपासून शेवटच्या वेशी-पर्यंत जवळजवळ चार कोसांचें अंतर होतें. त्याची रुंदीही कमींत कमी दोन कोस तरी होती. एकंदर घेर बारा कोसांचा अर्थात पंचवीस मैलांचा सहजच होता. एका बाजूस तुंगभद्रा नदीचा खडकाळ तास आणि दुसऱ्या टोंकास पांच कोसावर समुद्रसपाटी-पासून २००० हातांच्यावर उंच असणाऱ्या टेकड्या ह्यांच्यामध्यें असणाऱ्या विस्तीर्ण माळाच्या उत्तर कोणांत हें शहर बसविलें होतें. प्रत्यक्ष शहराची रचना त्यांतील घरें, वाडे बांधलेली जागा साठसत्तर

हातांपासून सहासातशें हात उंचीच्या टेंकड्यावरूनच होती. ह्या सर्व टेंकड्या मोठमोठ्या भिंतीनीं एकमेकींशीं जोडून घेऊन सर्व शहर कोटमय करून सोडलें होतें. ह्या भिंतींची रांग नदीचें पात्र आणि शहर यांच्यामध्यें असणाऱ्या टेंकड्यांच्या रांगेस भिडली होती. त्यामुळें नदीच्या बाजूनेंही शहरांत प्रवेश अशक्यच होता. दक्षिण आणि नैर्ऋत्येकडून काय तो नगरांत प्रवेश होण्यास मार्ग मिळावयाचा संभव. पैकीं नैर्ऋत्येच्या बाजूला एक मोठें तळें बांधून काढलें होतें. ह्यातलावाकरितां बांधलेला फरसबंदीबांध म्हणजे एक अर्ध कोस लांबीची किल्ल्याची भिंतच होय तलावाचें क्षेत्र दोन कोस चौरस असून आंत चार पुरुषांहून जास्त खोल इतकें पाणी असे. दक्षिणेच्या अंगास जो जंगी कोट बांधला होता तो अगदीं आंतील टेंकड्यांस नेऊन भिडविला होता व त्यांत जागजागीं बुरूज आणि माऱ्याच्या जागा केल्या असून त्या ठिकाणीं सतत सशस्त्र रक्षक ठेविले होते. सगळ्यांत बाहेरच्या कोटाच्या आंत भात शेती असे आणि तलावाच्या पाण्याचा वाटेल तसा पुरवठा असल्यानें शेतीचें उत्पन्नही भरपूर होत असे. ह्या शेतीच्या पलीकडे मनुष्य वसतीचे निरनिराळे चौक होते. अगदीं मध्यभागीं एका उंच टेंकडीवर बाले किल्ल्याप्रमाणेंच राजवाडा, सेनापतीचा वाडा आणि टांकसाळ हीं होतीं. ह्या प्रमाणें विजयनगराची रचना मोठी चातुर्यानेंच केलेली होती.

विजयनगर येथें भारतांतीलच नव्हे तर परदेशांतीलही पाहुणे त्या राज्याचा लौकिक ऐकून येथील सौंदर्य व वैभव प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहण्यास मुद्दाम येत असत. परदेशचे प्रतिनिधि म्हणूनही कित्येक मोठे लोक विजयनगरांत येत असत. इराणच्या शहानें राजशिष्ट ( राजाचा प्रतिनिधि ) म्हणून अब्दुररझक याची योजना

केली होती. तो येथें जवळजवळ आठ महिने राहिला होता. त्यानें विजयनगरचें लिहिलेलें वृत्त “ पंधराव्या शतकांतील हिंदुस्थान ” या पुस्तकांत इंग्रजींत भाषांतरित करून प्रसिद्ध केलें आहे.

त्यानें केलेलें वर्णन स्वतःच्या डोळ्यांनीं पाहून केलें असल्यानें त्याला सर्वांत अधिक महत्त्व आहे. तो राजप्रतिनिधि असल्यानें राजाकडून त्याची खास व्यवस्था ठेवली गेली होती राजाची व त्याची प्रत्यक्ष भेटही झाली होती. तो या नगरीचें वर्णन कसें करितो पहा.

या विजयनगरासारखें सुंदर व प्रेक्षणीय असें वैभवशाली शहर साऱ्या दुनियेंत पहावयास मिळेल असें वाटत नाहीं. याची मांडणी व रचना कांहीं विलक्षणच आहे. त्याच्या सभोवार सात कोट असून ते एकाच्या पोटांत दुसरा, दुसऱ्याच्या तिसरा असे उभारले आहेत. आणि त्यांत सात अंतर्दुर्गहि आहेत. सर्वांत बाहेरचा जो कोट आहे त्याच्या भोवतीं पुरुषभर उंचीचे दगड जवळ जवळ उभे पुरलेले असल्यामुळें त्यांत स्वार व सैनिक यांना सहज जातां येत नाहीं. बाहेरच्या कोटाच्या पूर्वपश्चिम महाद्वारांमधलें अंतर सात मैल असून उत्तरदक्षिण द्वारांमधलें अंतरही तितकेंच आहे. या कोटाचा घेर जवळ जवळ साठ मैलांचा असून त्याची उंची पर्वता एवढी आहे !

पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या या तटबंदीमध्यें बागा, बगिचे, शेतें वाड्या व घरें असून तेथें लोकवस्ती विरळ आहे. आणि आंतली वसती फार दाट असून तेथें दुकानें, घरें, बाजार सारखें हारीनें लागलेले आहेत; हा शहराचा मधला भाग अत्यंत गज-बजलेला असतो.

येथें गुलाबाचीं सुंदर आणि सुवासिक फुलें विकावयास ठेवलेलीं असतात. त्या फुलांचे ते इतके शोकीन आहेत कीं, त्या फुलां-

शिवाय त्या लोकांचें जणू चालणारच नाहीं. अन्नपाण्याहून जास्त तीं त्यांना प्रिय असतात आणि जरुरीचीं वाटतात. बाजारांत नानाविध वस्तूंनीं भरलेलीं व्यापारी लोकांची दुकानें एकमेकांस भिडलेलीं दिसतात. जव्हेरी बाजारांत जव्हेरी दुकानदार उघडपणें खुल्या बाजारांत मोतीं, माणकें, पाचू व हिरे इत्यादि मौल्यवान जडजवाहीर व इतर मौल्यवान् पदार्थ राजरोस विक्रीला ठेवतात व उघडपणें खरेदी विक्री चालते.

या सुंदर शहरांत आणि प्रेक्षणीय राजवाड्यांच्या आवारांत जागजागीं दगडी पाट बांधून त्यांतून नदीचें स्वच्छ व गोड पाणी सर्वत्र मुबलक खेळविण्यांत आलेलें दिसतें.

सातवा कोट अगदी आंतला. तो राजवाडा आणि सरकारी इमारती यांच्या सभोंवतीं बांधण्यांत आला आहे. तो गांवाच्या उत्तरेस एका उंचवट्यावर असून, तो दगड व चुना यांनीं भक्कम व मजबूत बांधून काढला आहे. त्याचे दरवाजेही अतिशय भक्कम व मजबूत असून तेथें पहारेकऱ्यांचा रात्रंदिवस खडा पहारा असतो. येथें आंत शिरतांना प्रत्येक मनुष्याची कसून चौकशी, झडती व तपासणी करण्यांत येते.

हा सातवा म्हणजे सगळ्या किल्यांतला आंतला किल्ला उत्तरेकडे असून तो गोलाकृति आहे. त्याच्या आंत राजाचा राजवाडा आहे. राजावाड्याच्या बाहेर उत्तर बाजूला मुख्य देवडी असून तिच्या पुढें सुरेख व प्रशस्त आगाशा बांधल्या आहेत. राजाचा मुख्य दिवाणखाना सर्वांत उंच आहे. देवडीच्या डाव्या बाजूला एक मोठा उंच व भव्य असा मुख्य दिवाणखाना आहे. त्याच्या पुढें साठ हात लांब व वीस हात रुंद व पुरुषाहून उंच असें एक मोठें दालन असून तेथें दफ्तरखाना व कारकून बसण्याची जागा

आहे. त्याच्या मध्यभागीं उंच असा एक चबुतरा आहे. त्याच्यावर सर्व आमल्याचा मुख्य अधिकारी म्हणजे दनायक (न्यायाधीश) हा बसतो. तेथें चोपदार लोक रांगेंत उभे असतात. दिवाण अगर दनायक लोकांच्या फिर्यादी व अर्ज घेऊन त्यांचा निकाल करितो. तो अखेरचाच निकाल असून त्यावर अपील नाहीं. सर्व कामकाज संपल्यावर तो तेथून उठून सात दरवाजे ओलांडून आंत राजाजवळ जाऊन त्या दिवसाच्या कामकाजाची सर्व हकिकत त्याला विदित करितो.

राजवाड्याच्या मागच्या बाजूला दनायकाचा म्हणजे सेनापतीचा महाल व दिवाणखाना आहे. त्याच्या डावीकडे टांकसाळ आहे. दिवाणखान्याच्या समोरच हत्तीशाळा असून प्रत्येक हत्तीसाठीं तेथें वेगवेगळी व्यवस्था करण्यांत आली आहे. टांकसाळीच्या समोरच मुख्य किल्लेदाराचा वाडा आहे. तेथें बारा हजार सैनिकांचा जागता पहारा असतो. टांकसाळी मागें बाजार आहे. त्याच्या दोन्ही बाजूला वाडे व चौक आहेत. त्यांच्या पुढें बसण्यासाठीं म्हणून खोदींव दगडी अशी उंच व सुरेख सुखासनें केलेलीं आहेत. या राजमार्गाच्या दोन्ही बाजूला सिंह, वाघ, चित्ते वगैरेचीं दगडी चित्रें कोरून जागोजाग उभीं करण्यांत (ठेवण्यांत) आलीं आहेत. पुढील चबुत्रे, गच्च्या, व ओटे यांच्यावर सुंदर बैठका घालून त्यांवर वेश्या नटून थटून सुंदर वेशभूषा करून बसलेल्या असतात.

ही झाली नगररचना आणि व्यवस्था. आतां राजे सैन्य वगैरे किती बाळगीत तें वाचा.

या राजाजवळ एक लाख दहा हजार फौज असून शिवाय तीस हजार घोडेस्वार व एक हजार हत्ती आहेत. राज्याचा विस्तार

सिलोन म्हणजे लंका तेथपासून कलबुर्ग्यापर्यंत आहे. राज्यांत दोनशें सरदार व मांडलीक आहेत. त्यांचेंपाशीं सुमारें एकुणीस हजार स्वार, एक लक्ष एकाहत्तर हजार पायदळ व सहाशें तेहतीस गजराज आहेत.

राजाकडून साजरा केला जाणारा सार्वजनिक उत्सव कसा साजरा होई याचें मनोरंजक वर्णन ऐका.

प्रवासी अबदुलरझाक सांगतो " मी तेथें गेल्यावेळीं एक मोठा उत्सव साजरा केला जात होता. त्या प्रसंगीं एके दिवशीं मला राजे साहेबांकडून निमंत्रण आलें; म्हणून मी सायंकाळचे सुमारास दरबारांत गेलों. राजे एका मोठ्या प्रशस्त दिवाण खान्यांत बसले होते. त्यांच्या दोन्ही बाजूला दरबारी लोक आपापल्या दर्जाला अनुसरून ठराविक आसनावर बसले होते. राजेसाहेबांनीं साटिणीचा हिरवा पायघोळ झगा पहेरला होता. गळ्यांत पाणीदार मोतीं व रत्नें लावलेला गळपट्टा होता. राजा शरीरानें सड पातळ पण उंच असून चेहरा मनोहर दिसत होता.

त्या वेळीं महानवमीचा उत्सव चालला होता. सारे मांडलीक, सेनापति व इतर प्रमुख अधिकारी आणि लोकप्रतिनिधि राजवाड्यांत उपस्थित होते. त्यांच्याबरोबर दोन हजार गजराज आले होते. हत्तींच्या अंगावर चकचकीत सुरेख चिलखतें होतीं. पाठीवर अंबारी व हौदे होते. सारे हत्ती एका प्रशस्त आणि भव्य मैदानांत रांगेनें उभे करण्यांत आले होते. तीन दिवसपर्यंत हत्तींच्या चिलखतांच्या लखलखाटानें आणि त्यांच्या चीत्करानें तें सारें विस्तीर्ण मैदान खवळलेल्या महासागरासारखें दिसत होतें.

त्या विशाल पटांगणांत सुंदर व भव्य मंडप उभारण्यांत आले होते. त्यांवर बाहेरून सुंदर चित्रें लावून ते सजविले होते. त्यांतील

नवव्या मंडपांत सिंहासन ठेविलेलें असून माझी बसण्याची व्यवस्था सातव्या मंडपांत करण्यांत आली होती. मांडव व राजवाडा यामधील मोकळ्या जागेंत नटनर्तक, मांड, कथक वगैरे लोकाच्या कार्यक्रमांची सोय केली होती. राजाच्या समोर अप्रतिम वस्त्रलंकारांनीं विभूषित अशा रूपवती कलावंतिणींचें नृत्य गायन चाललें होतें. राजेशाही उत्सव सतत तीन दिवस मोठ्या अपूर्व थाटानें चालला होता. रात्रीं प्रेक्षणीय दारूकाम, नाचरंग करमणुकीचे कार्यक्रम चालत असत.

तिसऱ्या म्हणजे उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं माझी व राजाची भेट झाली. तेथें राजाचें सिंहासन होतें. तें सुवर्णाचें असून रत्नजडित होतें. त्याचें मूल्य किती असावें याची कल्पना करणेंही कठीण. त्याच्या पुढें एक चौकोनी गादी घातली होती. तिच्यावर एका बाजूला मोत्यांचे तीन सर गुंफलेले होते. या उत्सवांत तीनही दिवस राजेसाहेब या सिंहासनावरच बसत असत.

उत्सव आटपल्यावर संध्याकाळीं मला एका चौकांत बोलावून नेलें. त्या चौकाच्या चारी बाजूंना चार चांगले सुशोभित आणि भव्य मंडप घातले होते. तो चौक व मंडप यांच्या बाजूवर व छतावर सुमारें तलवारीच्या पात्याइतका जाड सोन्याचा पत्रा खिळे ठोकून बसविण्यांत आला असून त्याच्यावर जडावाचें सुंदर नक्षी काम केलेलें होतें. त्या चौकांतच राजाचें सिंहासन मांडलें होतें. आजपर्यंत माझ्या या दृष्टीला कधींच पडले नाहीं असें हें सुंदर शहर आहे. माझे डोळे ह्या शहराचें सौंदर्य पाहून तृप्त झाले माझ्या डोळ्यांचें जणूं पारणें फिटलें असें मला वाटलें! याच्यासारखें शहर साऱ्या दुनियेंत कोठें असल्याचें ऐकिलें नाहीं!

लुइव्हिको डि वर्थेमा हा प्रवासी इटलींतून विजयनगर पाहण्यास आला तो म्हणतो :— या राज्यांत कोठें ही हिंडण्या फिरण्यास

प्रतिबंध नाहीं कीं कसलें ही भय नाहीं. राजमार्ग रुंद आणि चौक ऐसपैस आहेत. व्यापार फार मोठा चालतो. या शहरांत सर्व राष्ट्रांचे व सर्व धर्मांचे अनेक लोक पहाययास सांपडतात. न्यायदान पद्धति कडक असून सत्यान्वेषणाकडे अधिकाऱ्यांचा विशेष कल व रोख असतो.

अशा तऱ्हेचें अवर्णनीय स्वरूप कालक्रमानें विजयनगरला प्राप्त झालें. सौंदर्य, वैभव, कला, विद्वत्ता या सर्वच बाबतींत त्या शहराला नव चैतन्य लाभलें.

विजयनगरच्या राजसिंहासनावर बसण्याचा पहिला मान कुणाला मिळाला ?

विजयनगरच्या सिंहासनाची स्थापना आणि त्या सिंहासनावर पहिल्यानें आरूढ होण्याचा मान कोणाला मिळाला याबद्दल अनेक दंतकथा प्रचलित आहेत.

एक दंतकथा अशी आहे कीं वरंगळच्या राजाचे पदरीं हरीहर आणि बुक्क या नांवाचे दोन शूर बंधु मोठ्या हुद्यावर कामें करीत होते. वरंगळच्या राज्यावर मुसलमानी आक्रमण होऊन तें राज्य मुसलमानांनीं जिंकलें त्यावेळीं ते कसे तरी तेथून निसटले आणि थोड्याशा घोडेस्वारांनिशीं जवळच्या डोंगराळ प्रदेशांत जाऊन राहिले. यावेळीं त्यांच्याबरोबर माधव तथा माधवाचार्य या नांवाचा एक ब्राह्मणही होता. ही गोष्ट इ. स. १३२४ मध्यें घडली. या बंधूनीं तो डोंगराळ प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला आणि त्या प्रदेशांतच त्यांनीं विजयनगराची स्थापना केली.

दुसऱ्या एका दंतकथेवरून असें दिसतें कीं, हरिहर आणि बुक्क या नांवाचे दोन भाऊ वरंगळच्या मुसलमानी राज्यपालाचे नोकरींत होते. हें राज्य इ. स. १३०९ सालींच मुसलमानी अमलाखालीं

गेलें होतें. त्यांना इ. स. १३१० सालीं मलिक काफूरच्या स्वारींत होयसळ बल्लाळ यांचेवर पाठविण्यांत आलें होतें. हे ज्या तुकडींत होते त्या तुकडीचा होयसळच्या सैन्यानें पराजय केला. जरी मलिक काफूरच्या सैन्यानें होयसळच्या सैन्याचा पराजय करून त्यांची राजधानी द्वारसमुद्र काबीज केलें. तरी त्या दोघांच्या तुकडीचा पराजय झाल्यामुळें ते डोंगराळ प्रदेशांत पळून गेले. त्या ठिकाणीं त्यांची माधवाचार्यांशीं गांठ पडली आणि त्यांच्या मदतीनें त्यांनीं विजयनगरची स्थापना केली आणि मोठें साम्राज्य स्थापन केलें.

तिसरी दंतकथा अशी आहे कीं कांहीं कारणानें दोघे बंधु वरंगळहून पळून आनेगोंदीला आले. त्यांना मुसलमानांचे हाताखालीं नोकरी करणें भाग पडलें; पण नंतर साहजिक धर्माभिमानानें त्यांना त्याची लाज वाटून त्यांनीं तीं नोकरी सोडून दिली. आणि शेवटीं त्यांना जयही मिळाला.

चौथी दंतकथा अशी आहे कीं, माधवाचार्यांना भूमींतील गुप्त धनाचा ठेवा सांपडला. त्या धनाचे साह्यानें त्यांनींच विद्यानगरी उभी केली. व आपणच तेथें राजे झाले. आपल्या मरणानंतर ती एका धनगर कुटुंबाला मिळावी अशी त्यांनीं व्यवस्था केली. त्यानंतर त्या धनगरांनींच राज्य स्थापिलें आणि तेच वंशपरंपरेनें राजे झाले.

कूटो नांवाच्या प्रवाशानें आणखी एक दंतकथा लिहून ठेविली आहे. तिला आपण पांचवा क्रमांक देऊं. तपस्वी माधव हे डोंगराळ भागांत तपश्चर्या करीत असतां बुक्क नांवाचा धनगर त्यांना दररोज दूध, फळें पुरवीत असे. एके दिवशीं ते प्रसन्न झाले आणि म्हणाले, तूं राजा होशील आणि मोठें राज्य जिंकशील" त्या धनगराचे भाईबंद, ज्ञातिबंधु यांना हें कळतांच ते त्याला मान देऊं लागले आणि आपणापेक्षां श्रेष्ठ समजूं लागले. त्यानंतर राजा होऊन त्यानें

आजूबाजूचा मुलुख जिंकण्यास सुरुवात केली. त्यानें जवळपासचे पांच विभाग जिंकून घेतले व स्वतःला तो बोकाराव म्हणवूं लागला. दिल्लीच्या बादशाहानें त्याजवर स्वारी केली पण बोकारावानें दिल्लीच्या बादशाहाचा पराभव करून त्याला हाकून लाविलें. या यशामुळें त्याला विशेष स्फूर्ति येऊन त्याने विजयनगर शहराची स्थापना करून तें शहर आपली राजधानी केलें.

आपण विजयनगरचें साम्राज्य म्हणतों पण त्याचे भाईबंद व तिकडचे लोक " कर्नाटकचें राज्य " असें म्हणत.

आणखी एक दंतकथा अशी आहे कीं, हरिहर व बुक्क हे होयसळ राज्यांतले मांडलिक होते.

निकिटिन नांवाचा एक रशियन प्रवाशी येथें आला होता. त्याच्या मतें हे दोघे कदंब वंशांतले राजे असावे, हें राजघराणें वनवासी येथें राज्य करीत होतें.

वरच्या कोणत्या दंतकथेवरून पांच भावांची माहिती होत नाहीं पण इतिहासांत मात्र या पांचही भावांचे पराक्रम वर्णिलेले आढळतात. यावरून या पुस्तकांत स्वीकारलेली विचारसरणीच युक्त दिसते. ते संगम या यदु कुलोत्पन्न मांडलिक राजाचे मुलगे होत हेंच परिस्थितीला जुळून दिसतें. त्यानंतर हरिहर माधवाचार्यांची भेट आणि विद्यानगरची स्थापना हें क्रमप्राप्त सत्य होय; पुढील सारा इतिहास लोकमान्य आहेच.

यावरून संगमराजाचा मुलगा हरिहर यालाच सिंहासनावर बसण्याचा पहिला मान विजयनगर विद्यानगर येथें मिळाला.

# १७ माधवाचार्यांचीं ग्रंथ संपत्ति

माधवाचार्यांनीं अध्ययन पूर्ण झाल्यापासून ग्रंथ रचनेला सुरुवात केली आणि ती पुढील आयुष्यांत शेवटपर्यंत चालू ठेविली होती असें दिसतें. पुढील आयुष्यांत त्यांनीं विजयनगरच्या मुख्य प्रधानकीचें कार्य हातीं घेतलें. तो काल आणि शेवटीं संन्यास दीक्षा घेऊन शृंगेरी मठाचे गादीवर बसून जगद्‌गुरु म्हणून काम केलें तो काल असे दोन विभाग स्पष्ट दिसतात. यावरून ग्रंथ लेखनाचे दृष्टीनें त्यांच्या लेखनाचे तीन वर्ग पडलेले दिसतात आणि ते त्यांच्या ग्रंथांतील प्रस्तावनांवरून सहज लक्षांत येतात.

पहिल्या वर्गांत अध्ययन पूर्ण झाल्यापासून विजयनगर स्थापने पर्यंतच्या काळांत केलेली ग्रंथरचना अंतर्भूत होते. याकाळीं केलेली रचना बहुतेक काव्यात्मक असलेली दिसते. शिवाय या ग्रंथांत आरंभीच फक्त गुरूचे नांवाचा उल्लेख मोठ्या आदरपूर्वक केलेला आढळतो. या काळांत त्यांचा संबंध इतर कोणा मोठ्या व्यक्तीशीं आलेला नाहीं. आणि तो संबंध इतका घनिष्ठही नाहीं कीं त्यांचीं नांवें या आपल्या ग्रंथांत उल्लेखावीं असें त्यांना वाटावें.

विजयनगरचे प्रधानमंत्री हें पद स्वीकारल्यावर जी ग्रंथरचना केली तिच्या प्रस्तावनेंत गुरुस्मरण तर केलें आहेच पण त्या शिवाय ज्या भूपतीच्या आज्ञेनें वा इच्छेला मान देऊन ग्रंथ रचना केली त्या भूपतीचें मोठ्या आदरपूर्वक स्मरण केलें असून त्याच्या गुणांचाही उल्लेख केलेला आढळतो. हे ग्रंथ बहुतेक धर्मशास्त्र

विषयक म्हणजे श्रुतिस्मृति पुराण व्याख्यारूप आहेत. कारण त्या काळांत त्यांना काय कीं राजाला काय प्रजापालनासाठीं धर्मशास्त्र समजून घेण्याची आणि प्रजेला तें समजून देण्याची जरुरी पडली. आणि या जरूरीला अनुसरून त्यांनीं स्वतःच्या प्रेरणेनें वा राजाच्या आज्ञेनें प्रसंगविशेषीं राजदरबारांतील वा इतर सुप्रसिद्ध पंडितांचें साहाय्य घेऊनच ती ग्रंथरचना केली. कारण ही ग्रंथ-रचना सर्वांना मान्य व्हावयास पाहिजे होती. आणि ती विद्वन्मान्य असेल तरच लोकमान्य होऊन प्रजेला मार्गदर्शन करू शकेल ही दृष्टी पुढें ठेवूनच त्यांनीं या काळांतील ग्रंथ रचना केलीं असली पाहिजे.

प्रधानपदाचा त्याग करीपर्यंतचें लेखन दुसऱ्या वर्गांत येतें. त्यानंतर संन्यास ग्रहण करून ते जगद्गुरु झाले आणि शृंगेरी मठाच्या पीठाचे स्वामींचें कार्य केवळ पारमार्थिकच, त्यामुळें या पुढील कालांतील रचना तत्त्वज्ञानपर असून त्यांत ज्ञानदात्या गुरूंचें सादर स्मरण केलें आहे. असे हे तीन वर्ग पडतात. त्या तिन्ही वर्गांमिळून माधवाचार्य विद्यारण्य यांनीं सुमारें वीस ग्रंथ लिहिले असें मानतात. त्यांचीं हीं नावें :—

( १ ) पराशर माधव ( २ ) कालमाधव ( ३ ) जैमिनीय न्यायमाला विस्तर ( ४ ) पंचदशी ( ५ ) जीवन्मुक्ति विवेक ( ६ ) विवरण प्रमेय संग्रह ( ७ ) अनुभूतिप्रकाश ( ८ ) बृहद् दिग्विजय ( ९ ) उपनिषद्दीपिका ( १० ) शंकरग्विजय ( ११ ) सर्वदर्शन संग्रह ( १२ ) संगीत सार ( १३ ) गोत्रप्रवर निर्णय ( १४ ) चक्रव्यूह भाष्य ( १५ ) पाणिनी शिक्षाभाष्य ( १६ ) गोभिल गृह्यसूत्र भाष्य ( १७ ) दर्शपूर्ण मासप्रयोग ( १८ ) भगवद्गीता भाष्य ( १९ ) महावाक्य निर्णय ( २० ) आत्मानात्म विवेक.

या ग्रंथांची थोडक्यांत ओळख करून घेऊं. मंत्रीपद स्वीकारण्या-पूर्वीं त्यांनीं लिहिले ते दोन ग्रंथ (१) सर्वदर्शन आणि (२) शाङ्कर दिग्विजय हे होत. पहिल्या वर्गांत ज्या ग्रंथांचा अंतर्भाव करितां येतो त्यांतला सर्वदर्शन संग्रह हा पहिलाच ग्रंथ असावा असें वाटतें. हा ग्रंथ वेदभाष्यें वगैरे ग्रंथांचे आधींच लिहिला असावा असें दिसतें. या ग्रंथांत विद्यातीर्थ या गुरूंस त्यांच्या गृहस्थाश्रमांतील सर्वज्ञ विष्णु या नांवानें माधवाचार्यांनीं सादर वंदन केलें आहे. कदाचित् ते गुरू बिल्वारण्यांत रहात असतां त्यांच्या घरीं दोघेही बंधु माधव व सायण विद्याभ्यासार्थ गेले असण्याचा संभव आहे गुरुगृहीं जाऊन अध्ययन करावें ही आर्यांची फार प्राचीन काळापासून चालत आलेली रीति सुप्रसिद्धच आहे. सर्वज्ञ विष्णु हे आपल्या नांवाप्रमाणेंच दर्शन शास्त्रांतील ज्ञानाचे सागरच मानले जात. "पारंगतं सकलदर्शनसागराणाम्" असें त्यांचें वर्णन सर्वदर्शन संग्रहांतच केलेलें आहे. या ग्रंथांत चार्वाक मताला आरंभ करून शांकरदर्शनापर्यंत उत्तरोत्तर सोळा चढत्या दर्शनांचें व्याख्यान (विवरण) केलें आहे. त्या त्या मतवाल्या पंडितांच्या ग्रंथांतून अवतरणें देऊन विवेचन केलें असल्यामुळें हा ग्रंथ सहजच गद्यपद्यात्मक असा झाला. यांतील शेवटलें प्रकरण माधवा-चार्यांचे धाकटे बंधु सायणाचार्य यांचें आहे, असा शेवटीं खुलासा केला आहे. हें शेवटचें प्रकरण म्हणजे शांकरमत विवरण हें होय.

बाकीच्या प्रकरणांत तसा कांहीं खुलासा नसल्यानें तीं सारीं प्रकरणें बहुधा माधवाचार्यांचीच आहेत असें मानण्यांत कांहीं चूक होणार नाहीं. हा ग्रंथ इतका श्रेष्ठ प्रतीचा आहे कीं, या एकाच ग्रंथानें त्यांचें पांडित्यश्रेष्ठत्व सिद्ध झाल्याविना राहात नाहीं. या ग्रंथानें त्यांची कीर्ति सर्व पंडितवरांत नक्कीच पसरली असावी.

महेशचंद्र न्यायरत्न यांनीं लिहिलेल्या काव्यप्रकाश या ग्रंथांत माधवाचार्य यांनीं हा सर्वदर्शनसंग्रह ग्रंथ इ. स. १३३७ या वर्षी लिहिला असें सांगितलें आहे. पण या त्यांच्या विधानाला त्यांनीं कसलाही आधार दिला नाहीं. पण वरील हकीकतीवरून त्यांचें म्हणणें योग्यच आहे असें वाटतें. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावरच विजयनगरच्या राज्याची स्थापना झाली व त्या राज्याचे ते मुख्य मंत्रीही झाले. ( २ ) शांकर दिग्विजयः—हा ग्रंथही पहिल्या वर्गांतच अंतर्भूत केला पाहिजे. माधव सायण दोघेही सर्वज्ञविष्णु या गुरूंकडे शिकत असतां आद्य श्री शंकराचार्यांच्या विद्वत्तेविषयीं, थोरपणाविषयीं आणि कर्तृत्वाविषयीं त्यांनीं अनेक गोष्टी ऐकिल्या असतील. त्यांच्या कामगिरीविषयीं लिहिलेले अनेक ग्रंथ त्यांच्या वाचनांतही आले असतील. त्यामुळें त्यांच्या प्रचंड कामगिरीबद्दल त्यांच्या मनांत आचार्यांविषयीं विशेष पूज्य बुद्धि निर्माण झाली. आणि साहाजिक या पूज्य बुद्धीची परिणति त्यांच्याविषयीं हा ग्रंथ लिहिण्यांत झाली असावी. हा ग्रंथ लिहितांना त्यांनीं त्यांच्या काळापर्यंत आचार्यांच्या विजयाबद्दल जे ग्रंथ झाले, प्रबंध लिहिले गेले, त्या सर्वांचा थोडक्यांत परामर्श घेतला आहे. त्यांतील सारांश थोडक्यांत दिला आहे असें प्रारंभींच लेखकानें नमूद केलें आहे. त्यामुळेंच मोठमोठ्या हत्तींच्या किंवा पर्वतांच्या ओळींचें प्रतिबिंब लहानशा आरशांत जसें दिसेल तसाच प्रकार माझ्या या दिग्विजयांत झालेला आढळेल.

भाष्यकारांचें यश अंतःकरण शुद्ध करणारें समजून मी गात आहें अशा रीतीनें मोठ्या चातुर्यानें आपलाही उल्लेख केला आहे. ते म्हणतात नवकालिदासाच्या कवितारूपी कल्पलतेस आलेला हा फुलांचा बहर गुरुचरणीं अर्पण असो आणि त्याचा सुगंध पंडितांस आनंद देवो, या नवकालिदास नामक ब्राह्मणाच्या पवित्र धेनूस

निष्कारण दुष्कवितुरुष्क खुशाल पीडा करोत. त्यांचें पाप त्यांनाच भोगावें लागेल.

कालिदासानें रघुवंशारंभीं "क सूर्यप्रभवोवंशः कचाल्पविषयामतिः" असें स्वतःविषयीं म्हटलें आहे. या दिग्विजय काव्याच्या आरंभीं वाग्देवी माधवाचार्यांना म्हणते, "शंकर सद्गुरूंचें चरित्र कोठें आणि मी गरीव बिचारी कोठें. त्यांचें वर्णन अत्यंत दुर्घट. दुर्घट कामाला मला कां लावतोस ? त्यामुळें आतांपर्यंत जगांत जें कांहीं यश मिळविले तें मात्र सारें धुवून जाईल ? असें म्हणून वाग्देवी पळून जाऊं लागली. पण सर्व कविमंडळानें तिला मोठ्या प्रयत्नानें मागें फिरवून गुरुस्तुतीविषयीं प्रेरणा दिली. गुरूचें माहात्म्य असें अलौकिक अतएव विलक्षण आहे.

तात्पर्य, मनांत काव्य रचण्याची इच्छा व सामर्थ्य नसतांही मी केवळ पंडितांच्या आग्रहानें आणि गुरुमहिमा गावयास मिळेल या लोभानें हें धारिष्ट करीत आहें. हा कवीच्या सांगण्यांतला मुख्य आशय आहेसें दिससें.

या पहिल्या वर्गांत आणखी कोणते ग्रंथ घालतां येतील हें निश्चित ठरवितां येणें कठीण कारण त्यासाठीं जरुर ती माहिती निदान आजतरी उपलब्ध नाहीं. म्हणून या वर्गांत दोनच ग्रंथांचा अंतर्भाव केला आहे.

यापैकीं पहिल्या ग्रंथांत सर्वज्ञ विष्णु या नांवानें गुरूस प्रणाम केला आहे आणि दुसऱ्यांत विद्यातीर्थ या नांवानें केला आहे. या दोन्ही ग्रंथांत श्रीबुक्क राजाचें नांव नाहीं. सर्वदर्शन संग्रह व शांकर दिग्विजय या दोन्ही ग्रंथांत प्रत्येकीं सोळा सोळा प्रकरणें आहेत. दिग्विजयांतील मंगलाचा श्लोक तंतोतंत जैमिनीय व वैयासिक न्यायमाला यांतील मंगल श्लोकासारखाच आहे. यावरून हे तिन्ही ग्रंथ एका लेखकानेंच लिहिले हें स्पष्ट होतें.

वर्ग दुसरा—माधवाचार्य विजयनगरचे प्रधान मंत्री झाल्यावर स्वत:च्या प्रेरणेनें वा राजाच्या प्रेरणेनें रचिलेले धार्मिक व तदंगभूत ग्रंथ :—

राज्याचें काम पाहूं लागल्यावर माधवाचार्यांस चारी वर्णांच्या आचारविचारांविषयीं निर्णय करण्याचे प्रसंग येऊं लागले असतील, यासाठीं त्यांनीं प्रथम स्मृतिग्रंथ—धर्मप्रतिपादक ग्रंथ—हातीं घेतले असतील. या दुसऱ्या वर्गांत मोडणाऱ्या ग्रंथांत श्रीबुक्क राजाच्या कृपेचें स्मरण कृतज्ञतापूर्वक केलेलें आढळतें. ते ग्रंथ राजाच्या केवळ प्रोत्साहनानेंच नव्हे तर आज्ञेनें आणि साहाय्यानें निर्माण झाले; यामुळें त्यांत आश्रयदात्या राजाची स्तुति आणि त्याचें अभीष्टचिंतन करणें आवश्यकच होतें.

१ पराशर माधव :— अशा तऱ्हेच्या या द्वितीय वर्गांत मोडणाऱ्या ग्रंथांत पराशरस्मृति व्याख्यान किंवा पराशर माधव ही पहिली वाङमय कृति होय. कलियुगांत इतर स्मृतींपेक्षां पराशर-स्मृतीला विशेष महत्त्व दिलें जातें आणि असें असूनही माधवा-चार्यांपर्यंत त्या स्मृतीवर कोणाही पंडितानें व्याख्या वा भाष्य ( स्पष्टीकरणात्मक निबंध ) न लिहिल्या कारणानें या आचार प्रधान ग्रंथावर जनतेला उपयुक्त होईल आणि सर्वांनाच मार्गदर्शक होऊन आचार धर्माचें ज्ञान देऊं शकेल असें साधार व सविस्तर भाष्य आपण लिहावें असें माधवाचार्यांस, विजयनगरच्या नव्यानें उदयास येणाऱ्या राज्याच्या मुख्य प्रधानांना वाटणें अगदीं साहजिकच होतें. कारण राजा आणि प्रजा या उभयतांना योग्य मार्गाला लावण्याची जबाबदारी पंतप्रधानांचीच असते. ही आपली जबाब-दारी ओळखून जनतेला स्मृति आणि पुराणें यांचें सामान्य ज्ञान देण्यासाठीं त्यांनीं ह्या स्मृतिग्रंथावरील टीकेस प्रारंभ केला.

या ग्रंथाचे टीकेंत प्रारंभींच ते म्हणतात :—

**पाराशरस्मृति : पूर्वैर्न व्याख्याता निबंधृभि :**
**मया ऽतो माधवाचार्येण तद्व्याख्या यां प्रयत्यते ॥ ६ ॥**

परशरस्मृति उपक्रमणिका

या श्लोकांत त्यांनीं आपण हा ग्रंथ कां लिहीत आहोंत हें स्पष्टपणेंच सांगितलें आहे. हा ग्रंथ धर्मशास्त्राच्या क्षेत्रांत अप्रतिम मानला जातो आणि या ग्रंथानें त्यांना अजरामर केलें असल्यास नवल नाहीं. या पहिल्याच ग्रंथावरून त्यांची विद्वत्ता अगाध होती, शास्त्राध्ययन उत्कृष्ट होतें हें दिसून येतें. त्यांतील विवेचनावरून त्यांचा बहुश्रुतपणा प्रत्ययास येतो. ग्रंथ वाचतांना त्यांचें भाषेवरील प्रभुत्व आणि प्रतिभा यांची साक्ष पटते. हा ग्रंथ "बॉम्बे संस्कृत सिरिझ" मध्यें पंडित वामन शास्त्री इसलामपूरकर यांनीं चार भागांत छापून प्रसिद्ध केला आहे. तो पाहावा म्हणजे वरील विधानांची सत्यता पटल्यावांचून राहणार नाहीं.

या ग्रंथाचे प्रारंभीं त्यांचा नांदी प्रमाणें सर्व ग्रंथारंभी येणारा "वागीशाद्या०" हा श्लोक असून त्यानें, त्यांनीं विघ्नेशाची प्रार्थना केली आहे. त्यानंतर त्यांनीं गुरुस्मरणार्थ पुढील श्लोक लिहिला आहे त्यांत त्यांनीं आपल्या अंगीं हें काम करण्याची योग्यता कशी आली हें मोठ्या मार्मिकपणें दाखविलें आहे. त्या श्लोकांत त्यांनीं तीर्थ सप्तकाचें वर्णन करून अगदीं विशेष प्रकारें हें कार्य साधलें आहे.

**"सो ऽहं प्राप्य विवेकतीर्थ पदवीमाम्नायतीर्थे परम्**
**मज्जन् सज्जनसंगतीर्थनिपुणः सद्वृत्ततीर्थश्रयन्**
**लब्धामाकलयन् प्रभावलहरीं श्रीभारतीतीर्थतो**
**विद्यातीर्थमुपाश्रयन्हृदि भजे श्रीकंठमव्याहतम्**

वेदवाक्यांचें विवेचन करून निश्चितार्थ ठरविण्याच्या पूर्वोत्तर मीमांसातीर्थांचा मार्ग मिळाल्यावर तो मार्ग अतिक्रमण करून आम्नाय म्हणजे श्रुती या तीर्थांत यथेच्छ डुंबून त्याचे तळाशीं असलेलीं शुद्ध व अमूल्य रत्नें मला प्राप्त झालीं. त्यानंतर आम्नाय म्हणजे श्रुति अथवा वेद याचें मंथन करून अर्थ रूपी रत्नें बाहेर काढणाऱ्या दुसऱ्या सज्जनांच्या सहवासतीर्थांत स्नान करून मी वेदरहस्यांत निष्णात झालों. त्यामुळें मला सद्वृत्ततीर्थाचा लाभ घडला. तेथेंच मला माझे गुरु भारतीतीर्थ यांपासून श्रुतींचा गूढ असा अर्थ लावण्याचें बुद्धिसामर्थ्य प्राप्त झालें. हे सारे अलौकिक लाभ मला केवळ गुरुश्रेष्ठ विद्यातीर्थ यांच्या चरणाच्या दिव्य आश्रयानें प्राप्त झाले. महेश्वरतीर्थांच्या कृपेबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणी आहे. म्हणून त्या महेश्वरचरणांचें मी सदैव भजन करितों.

याचे पुढील श्लोकांत बुक्कणराजाची स्तुति केली आहे तींत राजाविषयीं " स्मार्तोच्छ्राय धुरंधरो विजयतां श्रीबुक्कणक्ष्मापतिः असे महत्त्वाचे उद्गार त्यांनीं काढले आहेत. या चरणावरून राजा बुक्कण यानें स्मार्तधर्म रक्षणाचें जणुं यज्ञकंकणच हातीं बांधलें होतें असें दिसतें. राजाच्या धर्मरक्षणाच्या जोरदार इच्छेची परिणती सायण माधवांच्या प्रचंड ग्रंथरचनेला कारणीभूत झाली असें म्हणणें यथार्थच होईल. त्यापुढील श्लोकांत आपण कुलगुरु असून आतां जरुरीनुसार मंत्रीपद स्वीकारलें असें सांगून आपलें कुलवृत्त संक्षेपानें कथन केलें. यानंतर पराशरस्मृतीला आपल्या ग्रंथ लेखनांत पहिला क्रम कां मिळाला हें पुढील श्लोकांत त्यांनीं सांगितलें आहे.

**स माधवः सकल पुराणसंहिता–**
**प्रवर्तकः स्मृति सुषमां पराशरः**

**परावरस्मृत जगदी हितात्तये**
**पराशर स्मृतिविवृतौ प्रवर्तते ॥**

या श्लोकाचा भावार्थ हा कीं जो पुराणसंहितांचा प्रवर्तक असून स्मृति वैभवाचा प्रकाशक आहे तो माधव ऐहिक व पारलौकिक जें स्मृतीनें सांगितलेलें जगताचें इष्ट त्याच्या प्राप्तीकरितां पराशर स्मृतीच्या विवरणास आरंभ करीत आहे.

या ग्रंथांत धर्माचें सोपपत्तिक विवेचन असल्यामुळें हा ग्रंथ प्रमाणभूत मानला जातो. धर्मशास्त्रविषयक असा हा पहिलाच ग्रंथ. यास्तव ग्रंथकारानें आपली स्वतःची बरीच माहिती यांत दिलेली आढळते. इतकी माहिती पुढील ग्रंथांत नाहीं. या माहितीं-तील थोडा थोडा भाग कांहीं ग्रंयांत दिलेला आढळतो.

( २ ) या वर्गांत मोडणारा त्यांचा दुसरा ग्रंथ म्हणजे "काल माधव" हा होय. पराशरस्मृतीवरील टीका निबंध पूर्ण झाल्यावर धर्माचरणाचा काल—निर्णय करण्यासाठीं त्यांनीं या ग्रंथाची रचना केली. ग्रंथारंभीं ते म्हणतात :—

**व्याख्याय माधवाचार्यो धर्मान् पराशरानथ**
**तदनुष्ठानकालस्य निर्णयं वक्तुमुद्यत: ॥**

या कालमाधव ग्रंथाची पांच प्रकरणांत विभागणी केली असून पहिल्यांत कालविषयांची व्याख्या केली आहे. दुसऱ्या प्रकरणांत वर्ष म्हणजे कांय याची विस्तृत माहिती देऊन चंद्र सायन व सौर वर्ष यांचा परस्पर संबंध व त्यांतला भेदही सांगून अयन, ऋतु, मास यांची माहिती दिली आहे. तसेंच त्यांत वर्ज्य असलेल्या कर्माचें विस्तृत विवरण केलेलें आहे. तिसऱ्या प्रकरणांत तिथी म्हणजे काय, त्यांचा काल, सीमा हीं सांगून तद्वविषयक मानवी कर्तव्य कर्म कोणतें हें स्पष्ट केलें आहे. चौथ्या प्रकरणांत प्रतिपदा,

द्वितीया वगैरे तिथींचें विवेचन करून पांचव्या प्रकरणांत धार्मिक कृत्यें करण्याला योग्य 'नक्षत्र' कोणतें यांचें विस्तृत मार्गदर्शन केलें आहे. याशिवाय योग म्हणजे काय, 'करण' कशाला म्हणावें याचें अत्यंत उपयुक्त आणि सहज समजेल असें वर्णन या पांचव्या प्रकरणांत आहे. 'धर्मशास्त्र' या विषयाबाबतचे हे दोन्ही ग्रंथ – पराशर माधव आणि काल माधव हे त्या क्षेत्रांत अग्रगण्य मानले जातात. पंडितांनाही ते मान्य झाले आहेत.

हे दोन ग्रंथ लिहून झाल्यावर त्यानीं जैमिनीच्या मीमांसाशास्त्रावर न्यायमाला हा श्लोकबद्ध ग्रंथ लिहावयास आरंभ केला हें पुढील श्लोकांवरून स्पष्ट होतें.

**श्रुतिस्मृतिसदाचारपालको माधवो बुध :**
**स्मार्तं व्याख्याय सर्वार्थं द्विजार्थं श्रौतउद्यतः ॥ ५ ॥**
**प्रणम्य परमात्मानं श्री विद्यातीर्थरूपिणम्**
**जैमिनीयन्यायमाला श्लोकैः सगृह्यते स्फुटम् ॥ ६ ॥**

वैदिक आचार धर्माचें सांगोपांग सविस्तर विवेचन केल्यावर त्यांची दृष्टि साहजिकच यज्ञयागादि कर्मकांडांत अंतर्भूत होणाऱ्या विषयाकडे वळली. कर्मकांडालाच दुसरें नांव न्यायकांड असें आहे. "जैमिनीप्रोक्तानि धर्मनिर्णयकान्यधिकरणानि न्यायः, या वचनावरून कर्मकांडाला न्यायकांड हें नांव जैमिनीनेंच रूढ केलें असें दिसतें. यालाच मीमांसाकांड असें तिसरें नांव असून तेंच सुशिक्षितांत विशेष प्रसिद्ध असल्याचें आढळून येतें.

वेदाचे मुख्य भाग दोन. पहिला भाग म्हणजें कर्मकांडाचा यांत यज्ञयागादि कर्में कशीं करावीं याचें संपूर्ण विवेचन केलेलें आढळतें. दुसऱ्या भागांत उपासना व ज्ञान याची माहिती देऊन

मार्गदर्शन केलें आहे. पहिल्या भागाला मीमांसा तर दुसऱ्याला शारीरिक या नांवानें संबोधिलें जातें.

याविषयीं न्यायमालाविस्तार या ग्रंथांतील पुढील उतारा वाचकांना उद्बोधक होईल.

"तत्र च वेदे पूर्वापर विरोधादिना वास्तवार्थ–विचिकित्सायां. प्रसक्तायां तद् वारणाय मीमांसाशास्त्रं रचितम् । तत्र कर्म साधिकानां श्रुतीनां विचाररूपोभागः पूर्वकांड – प्रथमतंत्र शब्द व्यवहृतो मीमासत्वेन ख्यातिं गतः । उपासना ज्ञान सांधिकानां श्रुतीनां विचाररूपो वेदान्तत्वेन प्रसिद्धोभाग शारीरक शब्दवाच्यो वैयासिकत्वेन ख्यातिंगतः

या उताऱ्यावरून मीमांसा व वेदान्त या दोन्ही शास्त्रांची कल्पना स्पष्टपणें वाचकांपुढें मांडल्याचें दिसतें.

हा ग्रंथ लिहून तयार झाल्यावर तो बुक्क भूपालापुढें ठेवण्यांत आला. आधीं लिहिलेल्या पराशरमाधव व कालमाधव या दोन्ही ग्रंथांची त्यांना माहिती होतीच. त्यानंतरचा हा ग्रंथ पाहून राजे खूष झाले आणि त्यांनीं भरदरबारांत त्या ग्रंथांची तर स्तुति केलीच पण असे विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिणारे माधवाचार्य आपल्या राज्याला प्रधान लाभल्याबद्दल विजयनगरची जनता खरोखर भाग्यशाली आहे इतकेंच नाहीं तर राजेही भाग्यशालीच आहेत असे उद्गार त्यांनीं काढले.

पण राजे पुढें म्हणाले. "ग्रंथ उत्कृष्ट तर आहेच पण सर्व सामान्य जनतेला आकलन होण्यासारखा नाहीं. या साठीं थोडी विस्तृत टीका जोडून अधिक सुलभ व स्पष्ट करावा. असें केल्यानें ग्रंथाला टीकेच्या कोंदणांत बसवून अधिकच शोभा आपल्यासारखें होईल."

राजाच्या ह्या सूचनेला मान देऊन माधवाचार्यांनीं न्यायमाला

या ग्रंथावर विस्तृत टीका लिहिली आणि ती पहिल्यानें लिहिलेल्या निबंधाला जोडून आपल्या ग्रंथाला जैमिनीय—न्यायमाला–विस्तार हें नांव दिलें ही गोष्ट ग्रंथारंभीच पुढील श्लोकांत स्पष्ट केली आहे.

**स खलु प्राज्ञजीवातुः सर्वशास्त्रविशारदः**
**अकरोज्जैमिनिमते न्यायमालां गरीयसीम्**
**तां प्रशस्य सभामध्ये वीरश्रीबुक्क भूपतिः**
**कुरु विस्तरमस्यास्त्वमिति माधवमादिशत्**
**निर्माण माधवाचार्यो विद्वानानंददायिनीम्**
**जैमिनीयन्यायमालां व्याचष्टे बालबुद्धये ॥ ७ ॥**

बुक्क भूपालाच्या इच्छेला मान देऊन न्यायमाला या ग्रंथावर विस्तृत टीका करण्यास माधवाचार्यांनीं आरंभ केला पण ग्रंथाच्या शेवटच्या भागांतील पुढील उताऱ्यावरून असें दिसतें कीं, तें कार्य बुक्क भूपतीच्या ह्यातींत पुरें झालें नाहीं.

**वेदानांस्थितिकृत्पुरो हरिहरोऽभूत्सूत्रकृज्जैमिनि**
**स्तद्भाष्यं शबरोऽभ्यधाद्भादितवांस्तद्विस्तरं माधवः**

बुक्कानंतर गादीवर आलेल्या हरिहर राजांच्या कारकिर्दींत तें पुरें झालें.

या ग्रंथांत एकंदर बारा अध्यास आहेत. त्यांत नऊशें अधिकरणें व सत्तावीसशें सूत्रें दिसतात. ग्रंथाचा विषय 'यज्ञ' हाच आहे अर्थात हा ग्रंथ कर्मकांडपरच आहे. हा ग्रंथ पुणें येथील आनंदाश्रम मुद्रणालयांत छापला असून तो ७०४ पृष्ठांत विस्तारला आहें.

यानंतर माधवाचार्यांनीं लवकरच, प्रधानपद सोडून संन्यासदीक्षा घेतली. या पुढचे त्यांचे ग्रंथ वेदान्तपर पण अत्यंत महत्त्वाचे आहेत. यापुढें माधवाचार्य हें नांव जाऊन संन्यास देतांना त्यांच्या गुरूंनीं

त्यांना दिलेलें नवें नांव जें विद्यारण्य त्या नांवानेंच त्यांनीं पुढील ग्रंथरचना केली आहे. यानंतरची ग्रंथरचना संन्यासाश्रमाला शोभेल अशाच वेदान्तपर विषयांवर केली आहे.

वेदान्तावरील त्यांचा अत्युत्कृष्ट ग्रंथ म्हटला म्हणजे पंचदशीं हा होय. याचे एकंदर पंधरा अध्याय आहेत. ते तीन प्रकरणांत विभागले आहेत. अगदीं आरंभीं विवेक हें प्रकरण असून त्यांत तत्त्वविवेक, पंचभूतविवेक, पंचकोशविवेक, द्वैतविबेक व महावाक्य-विवेक, असे पांच अध्याय आहेत. दुसरें दीपकरण त्यांत चित्रदीप, तृप्तिदीप. कूटस्थदीप ध्यानदीप आणि नाटवदीप असे पांच अध्याय आहेत. तिसरें आनंद प्रकरण यांत साहजिकच विविधानंदांचें वर्णन आहे. त्याचेही पांच अध्याय असून योगानंद. आत्मानंद, अद्वैतानंद, विद्यानंद, विषयानंद या पांच अध्यायांचा त्यांत समावेश केला आहे.

हा वेदान्तपर ग्रंथ प्राचीनकाळापासून विद्यारण्यांचा म्हणून मानला जातो. यांतील सहा अध्याय विद्यारण्यांनीं लिहिले व बाकीचे त्यांचे गुरुदेव भारतीतीर्थ यांचे असें विद्वानांचें मत आहे. हा ग्रंथ वेदांताची आवड असलेल्या लोकांत आणि जगांत अत्यंत प्रिय झाला असून भारतांतील अनेक भाषांत या ग्रंथाचे अनुवाद केले गेले आहेत. इतका तो प्रसिद्ध आहे.

या ग्रंथावर टीका ग्रंथ झाले आहेत. त्या ग्रंथांत टीकाकारांनीं म्हटलें आहे " नत्वा श्री भारतीतीर्थ विद्यारण्य मुनीश्वरै. अशा तऱ्हेचें नमन करण्याचा टीकाकारांचा हेतु उघडच आहे कीं हा ग्रंथ भारतीतीर्थ व विद्यारण्य या दोघांचा आहे. मात्र भारतीतीर्थांचें नांव पहिलें आहे तें केवळ आदरार्थीं. त्याचा अर्थ ग्रंथारंभींचा भाग त्यांनीं केला असा नव्हे. भारतीतीर्थ कदाचित विद्यारण्यापेक्षां वयानें ज्येष्ठ असण्याचा संभव आहे. या ग्रंथारंभीं श्रीशंकरानंद गुरूंस वंदन केलें आहे.

या पंचदशी ग्रंथावर तात्पर्यदीपिका नांवाची टीका श्री. रामकृष्ण पंडित यांनी लिहिली आहे. तृप्ति दीप या प्रकरणावर व्याख्यान लिहितांना त्यांनी प्रारंभींच म्हटलें आहे.

**तृप्तिदीपाख्यं प्रकरणमारभमाणः श्री भारतीतीर्थ गुरुस्तस्य श्रुतिव्याख्यानरूपत्वात् तद्व्याख्येयां श्रुतिमादौ पठति ।**

यावरून तृप्तिदीप हा भाग एकट्या भारतीतीर्थांनींच लिहिला असें सुचविण्याचा यांत उद्देश दिसतो.

या ग्रंथाचा मराठी अनुवाद कै. बापट शास्त्री यांनीं केला असून तो त्या विषयाची म्हणजे वेदांताची आवड असणारांना अत्यंत वाचनीय आणि मननीय असा झाला आहे यांत शंका नाहीं. कै. बापट शास्त्री यांचा ग्रंथ दुर्मिळ झाल्यामुळें त्यांनीं काढलेल्या दोन्ही आवृत्तींतील गुण घेऊन सोप्या भाषेंत विवरण शक्य तितकें स्पष्ट होईल असा मराठी अनुवाद उपनिषत्तीर्थ द. वा. जोग यांनीं लिहिला आहे.

या मूळग्रंथांतील पहिले सहा अध्याय विद्यारण्यमुनींचें असून बाकीचे नऊ भारतीतीर्थांचे असें मानलें जातें. कित्येकांचे मतें हे भारतीतीर्थ म्हणजेच विद्यारण्यांचे छोटे बंधु भोगनाथ हेच असावेत कारण तेही मोठें वेदान्ती होते.

२ जीवन्मुक्ति विवेक हा या तिसऱ्या वर्गांत मोडणारा अद्वैत वेदांत विषयक ग्रंथ आहे. जीवन्मुक्तीचें अद्वैत वेदांताच्या दृष्टीनें सांगोपांग विवेचन यांत केलें असून तें इतकें सुंदर आणि समर्पक आहे कीं, तें ऐकून तत्त्व जाणणारांचें समाधान होऊन ब्रह्मानंदानें ते डोलूं लागतात. या ग्रंथाचे चार अध्याय असून पहिल्यांत जीवन्मुक्तीचें लक्षण विशद करण्यांत आलें आहे. दुसऱ्यांत वासनाक्षय तिसऱ्यांत मनोनाश आणि चौथ्यांत जीवनमुक्तीचें प्रयोजन अशी

याची रचना केली असून त्या त्या अध्यायांत त्या त्या विषयांचें विवेचन वा स्पष्टीकरण केलें आहे. वेदान्त विषयावर लिहिलेला हा एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे असें मानितात.

३ विवरण प्रमेय संग्रह ऊर्फ विवरणोपन्यास हा त्यांचा तिसरा ग्रंथ. ब्रह्मसूत्र भाष्यावरील हा ग्रंथ विवरण पद्धतीनें लिहिला आहे. या ग्रंथावरून त्यांचें वेदान्त विषयांतील विशाल पांडित्य आणि त्या विषयाचा प्रदीर्घ अभ्यास याची कल्पना येते.

सदर ग्रंथाचे वर्णनात्मक असे नऊ विभाग पाडले आहेत. पहिल्य भागांत " श्रोतव्यः श्रुतिवाक्येभ्यः " याचा नियमनिधि, तसेंच जीव व ब्रह्म यांच्या ऐक्याचें प्रतिपादन आणि, अध्यास याचें सविस्तर विवेचन केलें आहे. दुसऱ्या भागांत वेदांतशास्त्राचें प्रयोजन, व तिसऱ्यांत "अथातो ब्रह्मजिज्ञासा" या वाक्याचा साकल्यानें उहापोह केला आहे. ज्ञान व कर्म समुच्चयाचें निराकरणही केलें आहे. चौथ्या विभागांत पहिल्या विभागाला अधिकारी असणाऱ्या व्यक्तीचें विवेचन आणि विषय, प्रयोजन अनुबंधचतुष्टय यांचें स्पष्टीकरण केलें आहे. पांचव्या विभागांत ब्रह्मस्वरूप व त्याचें लक्षण स्पष्ट केलें आहे. सहावा व सातवा या विभागांत ब्रह्मसिद्धि हा विषय स्पष्ट केला असून शेवटल्या दोन म्हणजे आठव्या व नवव्या विभागांत सगळ्या वेदान्त वाक्यांचा ब्रह्मांतच समन्वय करून दाखविला आहे. याप्रमाणें या ग्रंथांत वेदान्त प्रमेयांचा संग्रह आणि विवेचन हीं अत्यंत सुलभ रीतीनें दाखविलीं आहेत. ब्रह्मविद्येचें रहस्य व महत्त्व हीं या ग्रंथाच्या अभ्यासानें सहज कळून येतात.

४ अनुभूतिप्रकाश हाही एक महत्त्वाचा ग्रंथ विद्यारण्य स्वामींनीं रचिला. या ग्रंथांत उपनिषदांतील प्रतिपादित सिद्धांताचें सुंदर विवरण केलेलें आढळतें. कारिकांच्या द्वारा तें अगदीं सुबोध केलें

आहे. यांत ऐतरेय उपनिपदाचा सारांश दिला आहे. या ग्रंथावर मितवृत्ति नांवाचा टीकाग्रंथ पंडित काशीनाथ शास्त्री यांनीं लिहिला आहे.

५ बृहदारण्यक वार्तिकसार हाही एक महत्त्वाचा ग्रंथ यांनीं रचिला. सर्व उपनिषदांत बृहदारण्यक हें अग्रगण्य मानलें जातें. त्यावर सुरेश्वराचार्यांनीं वार्तिक लिहिलें आहे. सामान्य वाचकास तें समजण्यास बरेंच कठीण जातें म्हणून विद्यारण्यांनीं हें वार्तिकसार लिहिलें. यावरून वार्तिकाचें गूढ रहस्य समजून घेण्यास बरीच मदत होते.

गहन अशा वेदान्तविषयावर स्पष्ट व सुबोध ग्रंथ रचना करून वेदांताच्या इतिहासांत माधवारण्यस्वामींनीं आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे.

याशिवाय दुसरेही अनेक ग्रंथ त्यांनीं लिहिले वा मार्गदर्शन देऊन [illegible] आणले. विद्यारण्यस्वामींनीं जिवापाड मेहनत करून हिंदु माणसांची जरुरी काय आहे तें लक्षांत आणून त्यांना उपयुक्त होतील, योग्य मार्गदर्शन करितील, आपल्या संस्कृतीला पोषक होतील असेच हे सारे ग्रंथ लिहिले. त्यांचे बंधु सायणाचार्य यांनींहिं वडिल बंधूचें अनुकरण करून अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

त्यांचें कर्तृत्व, विद्वत्ता यांनीं हिंदुधर्म नष्ट होण्याच्या पंथास लागला असतां त्याला सावरून धरलें, संकटांतून सोडविलें, अन वाढविलें. भगवंतच स्वामीच्या रूपानें अवतरले आणि त्यांनीं दिलेलें आश्वासन या रूपानें पुरें केलें. हें त्यांचे आश्वासनः पुनः एकवार आपण त्याचें स्मरण करूं या.

**यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवतिभारत**
**अभ्युत्थानधर्मस्य तदात्मानंसृजाम्यहम् ॥**

**शुभं भवतु ॥**